
१४ डिसेंबर १९६

किंमत : चाळीस पै



साप्ताहि

# माणू

झुल्फिकारखान भुट्टो

अध्यक्ष आयूब यांच्या मूलभूत लोकशाही पध्दतीव
भुट्टो कडक टीका करीत आहेत पण दोन वर्षांपूर्व
पर्यंत याच पध्दतीचा ते पुरस्कार करीत होते, तेव्ह
त्यांच्या आताच्या भूमिकेमागे लोकशाहीबद्दलच्य
खऱ्या प्रेमापेक्षा लोकांची मते मिळवून निवडणू
जिंकण्याचाच उद्देश मुख्यत: आहे, हे उघड आहे.

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकुणतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

## गंमतीची चूक

'माणूस'चा वाचक वर्ग विविध प्रवृत्तीचा व आवडीचा. कुणास काही, कुणास काही आवडते नावडते. आपण मात्र संपादक ह्या नात्याने दोन्ही गोष्टींना अनुकूल व विरोधी विचारांच्या त्या पत्रांना स्थान देता; त्याबद्दल आपलं अभिनंदन. आता 'राजू'ची पत्रे न आवडणारा एक माणूस (श्री. निंभोरकर) निघाला; उलट धोपेश्वरकर यांना ती आवडली; कुणालाही आवडतील अशीच ती आहेत.

कित्येक लेखकांच्या लेखांत किंवा गोष्टींत काही किरकोळ पण महत्त्वाच्या चुका राहून जातात. एवढ्या अफाट विस्तारात त्या फारशा कुणाच्या लक्षात येत नाहीत. एक अशीच गंमतीची चूक आढळली. श्री. मोहन कुंटे यांची 'माणूस' २३-११-६८ मधली 'सवाल' गोष्ट पाहा. पान ४६ पॅराग्रॉफ ३, ओळ २ व ३ "माझ्या नावाचे रजिस्टर्ड पार्सल. कोणाकडून तर नाव पत्ता काहीच नाही." यावरून लेखकाला पोस्टाचे नियम फार कमी माहीत आहेत असेच म्हणावे लागेल. रजिस्टर्ड पार्सल असो वा पत्र, पाठविणाराचे नाव असावे लागतेच. आहे की नाही गोड गंमत. लांब कादंबरीसारख्या लिखाणात अमावास्येची पौर्णिमा होऊन जाते त्या मानाने ही कमीच म्हणावे लागेल. पण चूक ती चूक.

— वि. वा. जोशी, चंद्रपूर

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मु. ल. सोमण

# बौद्ध धम्म परिषद

नोव्हेंबर, २२ ते २४ ला मुंबईला चैत्यभूमीवर, भारतीय बौद्ध धम्म महासभेतर्फे आयोजित, बौद्ध धम्म परिषद दलाई लामांच्या उपस्थितीत पार पडली. दलाई लामा बौद्धांचे धर्मप्रमुख मानले जातात. त्यांच्या व लडाखचे प्रमुख लामा खा. कुशकबकुल ह्यांच्या उपस्थितीमुळे परिषदेला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले. ह्या परिषदेचे निमंत्रक होते बौद्ध महासभेचे अध्यक्ष श्री. भैय्यासाहेब आंबेडकर व रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख श्री. गायकवाड. वास्तविक एक महिन्यापूर्वीच प्रा. भंडारे ह्यांच्या नेतृत्वाखालील भारतीय बौद्ध सभतर्फे असाच एक बौद्ध मेळावा मुंबईतच भरलेला होता. आणि त्या वेळी प्रमुख पाहुण्या होत्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ! दोन्ही धम्म परिषदांनी कै. आंबेडकरांचाच वारसा सांगितला आणि दोन्ही परिषदांनी काही विशेष मौलिक कामगिरी बजावली असेही नाही. बहुसंख्य निरीक्षकांना दोन्ही परिषदा दोन्ही संचालकांनी एक दुसऱ्यावर राजकीय आघाडी मिळविण्यासाठीच भरविलेल्या असाव्यात असं वाटलं ते ह्याचमुळे. श्री. दादासाहेब गायकवाडांनी आपल्या भाषणातून त्यांची नेहमीचीच राजकीय व्याख्यानं श्रोत्यांना ऐकवली व बौद्धजनमंडळींना सवलती न मिळाल्यास राष्ट्रव्यापी आंदोलनाची भाषा ऐकवली. वास्तविक ह्या तऱ्हेच्या भाषणासाठी त्यांना रिपब्लिकन पक्षाचं व्यासपीठ मोकळं होतं ! बाबासाहेबांचं 'बुद्ध आणि त्याचा धर्म' हे पुस्तक भारतीय बौद्धांनी प्रमाण मानावं व आदल्याच दिवशी श्री. वसंतराव नाईकांनी उद्घाटन केलेल्या 'आंबेडकर विचार पीठा'मार्फत बौद्ध धम व बाबासाहेबांचे विचार ह्यांवर चिंतन व मनन होऊन त्यांचा प्रसार सर्वत्र करावा हेच काय ते थोडेबहुत धर्मविषयक ठराव ह्या परिषदेत पसार झाले. श्री. दलाई लामांच्या उपस्थितीमुळे व बौद्धांमधील श्री. दादासाहेब गायकवाडांच्या प्रभावामुळे चैत्यभूमीवर धम्म परिषदेला गर्दी लोटली होती हे मात्र खरं ! जवळ जवळ चार-पाच हजारांवर प्रतिनिधी संपूर्ण देशांतून ह्या परिषदेला उपस्थित होते. आदल्या दिवशीच्या 'आंबेडकर स्तूप' व 'आंबडकर विचार पीठ' ह्यांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही भव्य स्वरूप आलं होतं. तरीही, धार्मिक व सांस्कृतिकदृष्टया जे कार्य ह्या धम्म सभेतर्फे अपेक्षित होतं ते मात्र झालं नाही हे निश्चित ! परिषदेच्या आदल्या दिवशी बौद्ध शासन सभेतर्फे आयोजिलेल्या सभेत श्री. बी. सी. कांबळे ह्यांनी जे उद्गार

काढले, ते बरेचसे बोलके आहेत; कारण, श्री. कांबळे हे भाडमीड न बाळगणारे आणि तत्त्वाबाबत तडजोड न स्वीकारणारे आहेत. श्री. कांबळे म्हणतात, " दलाई लामांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन, यशवंतरावांच्या परवानगीने काँग्रेसचं राजकारण दामटण्याच्या दृष्टीनं टाकलेलं हे एक पाऊल आहे....गल्या महिन्यात झालेली व उद्या सुरू होणारी, ह्या परिषदा ही बौद्धांची शुद्ध फसवणूक आहे. "

कै. बाबासाहेब आंबेडकरांनी, महानिर्वाणापूर्वी काही दिवसच स्वत: बौद्ध धर्म स्वीकारला होता व अनुयायांनाही त्यांनी तीच दीक्षा दिली होती. बाबासाहेब स्वत: गाढे व्यासंगी, विद्वान पंडित होते. हिंदुधर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला होता. ज्ञानेश्वरी हा त्यांचा आवडता ग्रंथ. त्यात व वारकरी भक्तिपंथात ते तल्लीन होऊन जात. आणि इतकं असूनही देशभर विखुरलेल्या, कुत्र्या-मांजराहूनही हीन जिणं जगणाऱ्या त्यांच्या असंख्य ज्ञातिबांधवांच्या दुर्दशेकडे पाहून हिंदू धर्माविषयी त्यांना एक प्रकारचा तिटकारा आला. ह्या तिटकाऱ्याच्या भरात त्यांनी खूप वर्षांपूर्वी जाहीर केलं, " मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार मात्र निश्चित नाही. " त्याचबरोबर त्यांनी हेही ताडलेलं असणार की, अस्पृश्योद्धार, झुणकाभाकर, पतित-पावन मंदिर, इत्यादी चळवळींतून वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेल्या आपल्या समाजाला क्वचित काही अधिकार मिळाले, तरी त्या समाजातली न्यूनगंडाची भावना नाहीशी होणं कठीण आहे. आणि त्यासाठी बाबासाहेबांना धर्मांतर हाच खात्रीचा तोडगा वाटला. जवळ जवळ तीस वर्षांच्या विचारमंथनानंतर त्यांनी पर्यायी धर्म म्हणून, बौद्ध धर्मच निवडला! बाबासाहेबांचा पिंड भारतीय होता हेच खरं, नि म्हणूनच धर्मांतराची दिशा दाखवून देतानाही, आपला समाज मूळ भारतीय प्रकृतिपासून दुरावणार नाही ह्याची त्यांनी काळजी घेतली. बौद्ध धर्माची दीक्षा देऊन दलित समाजाच्या मनातला न्यूनगंड नाहीसा करणं व त्याला स्वत:च्या पायावर उभं करून अन्य प्रगत समाजांच्या बरोबर आणणं हे बाबासाहेबांचं पुढचं कार्य होतं! परंतु त्या कार्याला नीट चालना मिळण्यापूर्वीच हा दलितांचा कैवारी, त्या समाजाला पोरका करून निघून गेला!

बाबासाहेबांनंतर त्या तोलाचा नेता, त्या समाजाला मिळाला नाहीच, पण त्याचबरोबर, जे आघाडीवर होते त्यांनी नेतृत्वासाठी भांडणं आरंभली. रिपब्लिकन पक्ष गायकवाड, भंडारे आणि कांबळे गटांत विभागला गेला आणि त्याचबरोबर नवीनच जन्माला आलेल्या बौद्धसमाजाची, गायकवाडांची बौद्ध सभा, भंडाऱ्यांची बौद्ध सभा आणि कांबळ्यांची बौद्ध शासन सभा—ह्या तीन तथाकथित धार्मिक सभांमध्ये रस्सीखेच सुरू झाली. अर्थात, तीन्ही ठिकाणी, रिपब्लिकन पक्षाप्रमाणेच, वर्चस्वासाठी राजकारण सुरू झालं. ह्या सगळ्या वावटळीत, बौद्ध समाजाचे आर्थिक, सामाजिक प्रश्न, त्यांचं जीवनमान उंचावण्याचा प्रश्न वगैरे मूलभूत प्रश्न

बाजूलाच राहिले. ह्या पुढाऱ्यांच्या भांडणात दलित समाज, बौद्ध धर्माची दीक्षा घेऊनही प्रगती करूच शकला नाही आणि झोपडपट्टीतला हा समाज, काही बोटांवर मोजण्याइतके अपवाद वगळता (आणि असे अपवाद पूर्वीही होतेच !) होता तिथेच आहे. इतक्या वर्षांनंतरही आजच्या ह्या नेत्यांनी शासनापाशी सवलतींची भीक मागावी हे खरोखरच बाबासाहेबांनीदेखील सहन केलं नसतं !

पण बौद्ध तरुण जागा होतोय्. मुंबईच्या वरळी येथील जपानी बुद्ध मंदिराचे श्री. वाय्. एच्. कांबळे ह्यांचे पुढील उद्गार ह्या दृष्टीने, उद्बोधक आहेत– "बौद्ध समाजाची आजची ही अवस्था फार वाईट आहे. त्यासाठी बौद्ध समाजाचं धार्मिक संघटन आवश्यक आहे......ही दुरवस्था जर दूर करावयाची असेल, हे वेगवेगळे पंथ आणि गट नको असतील तर बौद्ध तरुणांनी पुढे सरसावले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या जीवन तत्त्वज्ञानाच्या ठिकऱ्या होत असलेल्या उघड्या डोळ्यांनी बघत बसणे किंवा तसे न होऊ देण्यासाठी जीवन समर्पणास तयार असणे ह्यापैकी एक मार्ग तरुणांनी पत्करला पाहिजे...त्रिकुटीपैकी कुणातरी एकाच्या नादी लागून विघटनास मदत करायची की त्रिकुटीला बौद्ध समाज एकसंघ करायला सांगायचे हे ठरवले पाहिजे......बौद्ध तरुणांनी हे आव्हान स्वीकारलं पाहिजे."

## लंडन ते सिडने

राजकीय सभा, नवनवीन नाटकं, परिसंवाद, चित्रपट इत्यादींनी मुंबईचा नेहेमीचा रविवार गाजतो. परंतु परवाच्या एक डिसेंबरच्या रविवारी मुंबईकरांना न भूतो असा प्रकार पाहायला मिळाला. वास्तविक खुल्या ताडी विक्रीचा तो पहिलाच रविवार ! पण मुंबईकरांनी त्या रविवारी गर्दी करून सोडली ती ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर आणि शीव-मुंबई रस्त्यावर ! प्रेक्षकांच्या आरोळ्यांत नि जयघोषांत लंडन-सिडने कार–मॅरॅथॉन रेसच्या मोटारी दुपारी पावणेतीनच्या सुमारास मुंबईत रोरावत शिरल्या. त्या नवीन परदेशी बनावटींच्या मोटारी, त्यांच्यावरचे नंबर्स, त्यांचे संगीतमय हॉर्न्स ह्या साऱ्याच गोष्टी मुंबईकर नवलाईने पाहत होता. ह्या मोटारींच्या स्वागतार्थ जमलेल्या मेळाव्याची तुलना एका पत्रकाराने ख्रुश्चेव्ह–बुल्गानिन स्वागतावेळच्या किंवा पोप-पॉल आगमनावेळच्या जमावाशी केली. ब्रिटनच्या मायकेल टेलरची मर्सिडीज सर्वप्रथम मुंबईत शिरली. तेव्हा हजारोंच्या जमावाने तिचे उत्स्फूर्त स्वागत केलं.

लंडनचा 'डेली टेलिग्राफ' व ऑस्ट्रेलियातील एक वृत्तपत्र ह्यांच्या सहकार्याने ही शर्यत आयोजित केलेली आहे. १०,००० मैलांची मोटारींची अशा तऱ्हेची ही पहिलीच शर्यत. ब्रिटनचे लाखोपती व एक क्रीडापटू श्री. टॉमी सॉपविथ हे ह्या शर्यतीचे मूळ प्रवर्तक ! लंडन, पॅरीस, तुरीन, बेलग्रेड, इस्तंबूल, सिवास, इरझिन्कन,

तेहेरान, काबूल, हुसेनीवाला, दिल्लीमार्गे मुंबई असा ह्या शर्यतीचा ६,६०० मलांचा पहिला टप्पा. मुंबईला दोन-तीन दिवस विश्रांती घेऊन 'चुसान' ह्या बोटीतून ह्या गाड्या ऑस्ट्रेलियाला रवाना होतील व फ्रीमॅन्टल बंदर ते सिडने ही शेवटच्या टप्प्याची (साडेतीन हजार मैल) धाव १४ डिसेंबरपासून सुरू होईल. शर्यतीत सातत्याने कोण पुढे राहील, राहतो किंवा नेहमीच्या शर्यतींच्या कल्पनेप्रमाणे जो शेवटी सर्वांत पुढे राहील तो पहिला हे सूत्र नाही. प्रत्येक गाडीला त्या त्या टप्प्या-पर्यंत जाण्यास विशिष्ट कालमर्यादा ठरवून दिलेली आहे. त्या मर्यादेपेक्षा जेवढी जास्त मिनिटे त्या गाडीला लागतील तेवढे त्या गाडीचे 'वजा गुण' जास्त. हे 'वजा गुण' ज्या गाडीचे कमी ती गाडी पहिली! ह्या गुणवत्तेनुसार मुंबईपर्यंतच्या शर्यतीतील इंग्लंडचे श्री. क्लार्क व श्री. अँडरसन (गाडी-फोर्ड कॉर्टिना) हे आतापर्यंत प्रथम आहेत. (११ मिनिटे). जर्मनीचे श्री. सीपलेअर व लाम्पिनेन (फोर्ड २०) हे दुसरे आहेत. अर्थातच मुंबईच्या मोटार क्लबतर्फे देण्यात येणारे पारितोषिक श्री. क्लार्क व अँडरसन ह्यांना जाणार आहे. सिडनेपर्यंतच्या अंतिम शर्यतीत विजयी होणाऱ्यास १०,००० पौंडांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे.

ह्या शर्यतीसाठी अफाट पैसा खर्चण्यात आला आहे व येत आहे. भारतात आल्यापासून दिल्ली व मुंबईला आलिशान हॉटेलांतून स्पर्धकांची सोय करण्यात आली होती. संपूर्ण वाटेत ठिकठिकाणी वायरलेस सेट्स्, मेगॅफोनस सातत्याने राबत होते, पोलीस व मिलिटरी रस्ते चोख ठेवण्यासाठी सज्ज होती, विमानांतून स्पर्धकांवर सतत नजर ठेविली जात होती, ठिकठिकाणी गाड्यांच्या सर्व्हिसिंग पेट्रोलिंगची सोय ठेवण्यात आली. आणि हीच व्यवस्था जवळजवळ सर्वत्र होती. केवळ एवढ्यावरूनच ह्या शर्यतीसाठी पैसा कसा पाण्यासारखा उधळला जात होता ह्याची कल्पना येईल. ह्या स्पर्धेत १५ राष्ट्रांच्या एकूण ९८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यांतल्या १४ गाड्या दिल्लीपर्यंतच्या शर्यतीतच बाद झाल्या होत्या. मुंबईत मध्यरात्री (रविवार) पर्यंत ६७ गाड्या आल्या होत्या. मुंबईहून चुसान बोटीवर मात्र ७० गाड्याच चढणार आहेत. भारतातून दोन स्पर्धकांनी ह्या शर्यतीत भाग घेतला होता. त्यांपैकी डॉ. वाडिया ह्यांच्याविषयी कुठलीही खबर उपलब्ध नाही. त्यांच्याविषयीची शेवटची बातमी आली आहे ती अफगाणिस्तानातून. दुसरे स्विस नागरिक, मुंबईचे श्री. बॉम्बेली तेहराननंतर बाद झाले.

ह्या प्रचंड शर्यतीत गाड्यांना अपघातही बरेच झाले. विशेषत: तुर्कस्तानातल्या खडकाळ रस्त्यांनी स्पर्धकांना त्रास दिला. खुद्द भारतातही चार अपघात झाले आहेत. एकंदरीत स्पर्धकांचं सर्वत्र उत्साहानं स्वागत झालं असलं तरी काही ठिकाणी प्रेक्षकांनी गाड्यांवर दगड फेकल्याचे व काही ठिकाणी मार्ग रोखून धरल्याचं स्पर्धकांनी सांगितलं. एकंदरीत आतापर्यंतच्या वृत्तावरून स्पर्धा यशस्वी होत आहेसं दिसतं. स्पर्धकांचा जोम व गतीही उत्तम आहे. मायकेल टेलरच्या गाडीने दिल्ली-

मुंबई अंतर अवघ्या चौदा तासांत तोडलं आहे. शेवटच्या टप्प्यात स्पर्धकांना व स्पर्धेला सुयश चिंतूया !

ही शर्यत प्रचंड खर्चाची खरीच, पण तिनं जाहिरातबाजीचं काम छान पार पाडलं आहे. ९८ मोटारींपैकी जवळजवळ निम्म्या 'फोर्ड' बनावटीच्या आहेत. जवळजवळ ८०% मोटारींना 'डनलॉप'ची टायर्स आहेत. फोर्ड व डनलॉप कंपन्या ह्यांची ह्यापेक्षा प्रचंड नि भव्य जाहिरात होणं कठीणच !

## लालचीन आणि अमेरिका

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे रंग नेहमीच बदलते असतात. स्वहितानुसार प्रत्येक राष्ट्र आपले अन्य राष्ट्रांबरोबरचे संबंध बदलत असते. कालचे मित्र आज शत्रू ठरतात तर आजचे शत्रू उद्याचे मित्र ठरण्याची शक्यता नसतेच असं नाही ! चीन-भारत, चीन-रशिया, पाक-रशिया, इंग्लंड-अमेरिका, फ्रान्स-जर्मनी, फ्रान्स-इंग्लंड अशी अनेक उदाहरणं देता येतील ! दुसऱ्या महायुद्धानंतर, एका मेजवानीच्या प्रसंगी एक ज्योतिषी विदूषीने अमेरिकन प्रे. रूझवेल्ट ह्यांना सांगितलं की, लवकरच चीन ही अमेरिकेची सर्वांत मोठी डोकेदुखी ठरणार आहे. त्या वेळी त्या विदूषीला सर्वजण हसले; कारण त्या वेळी चीनमध्ये चँग-कै-शेक ह्याचा अंमल चालू होता. परंतु, १९४८ साली चँग-कै-शेकची हकालपट्टी करून माओ-त्से-तुंगची कम्युनिस्ट राजवट चीनमध्ये प्रस्थापित झाली आणि त्या विदूषीचं भविष्य तंतोतंत खरं ठरू लागलं; किंबहुना त्यानंतर अमेरिका-चीनचं कधीच जमलं नाही. कोरिया, व्हिएटनाम प्रकरणी जवळजवळ ती राष्ट्रं एकमेकांविरुद्ध प्रत्यक्षच उभी ठाकली. नाही म्हणायला, पाकिस्तानला शस्त्रसज्ज करताना आणि कश्मीर प्रश्नावर पाकिस्तानच्या पदरात झुकतं माप टाकताना एकाच दिशेनं त्यांनी कार्य केलं; पण तेदेखील एकमेकांना पाकिस्तानात शिरकाव मिळू नये ह्याच इच्छेने !

अशी ही अहिनकुलवत संबंध असणारी राष्ट्रं. एकमेकांशी बोलणी करण्यास, एकमेकांशी राजकीय संबंध प्रस्थापित करण्यास संधी शोधत आहेत, ही बातमी वाचली आणि एक प्रकारचा धक्काच बसला. श्री. निक्सन ह्यांच्या निवडणुकीनंतर अवघ्या थोड्याशाच कालावधीत माओ राजवटीनं अशा तऱ्हेच्या प्रत्यक्ष बोलण्यांचं सूतोवाच केलेलं आहे आणि अमेरिकन पदाधिकारीही ह्या सूचनेचं स्वागत करतील, असं दिसतंय. जिनीव्हा करार आणि पंचशील तत्त्वे ही मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारून बोलणी सुरू व्हावीत असं चीननं सुचवलं आहे. मावळते राष्ट्राध्यक्ष आणि उप-राष्ट्राध्यक्ष ह्यांच्या मानाने श्री. निक्सन ह्यांची चीनविषयक मतं अधिक धारदार आहेत. व्हिएटनाम युद्धप्रकरणी जरी त्यांनी जॉन्सनविरोधी आघाडी उभारली, तरी चीनविषयक बोलताना आपण कडक धोरण स्वीकारू असं त्यांनी वेळोवेळी

सांगितलेलं आहे. श्री. हम्फ्रे त्या मानाने, चीनविषयक उदार दृष्टिकोण स्वीकारणारे होते. ह्याचमुळे, चीनच्या पंचशील तत्त्वावर आधारित चिनी-अमेरिकन कराराच्या सूचनेला, श्री. निक्सन ह्यांचे सेक्रेटरी श्री. मर्फी ह्यांनी फारसं महत्त्व देऊ केलेलं नाही. परंतु चीनची परिस्थिती वेगळी आहे. भारत-चीन युद्धानंतर आणि रशियनांबरोबर निर्माण झालेल्या तेढीनंतर चीन जागतिक राजकारणात बराचसा एकाकी पडलेला आहे. मध्यपूर्वेतलं आणि आफ्रो-अरब राष्ट्रांतलं त्याचं वजनही खूपच कमी झालं आहे. मुट्टोंच्या उचलबांगडीनंतर आणि पाक-रूसो मैत्रीच्या नव्या वातावरणात पाकिस्तानही चीनच्या बाजूने ठाम उभा राहीलसा दिसत नाही आणि त्याचबरोबर, दिवसेंदिवस वाढत चाललेल्या रूसो-अमेरिकन सहकार्यामुळे, कदाचित् ही युती पुढेमागे चीनवरच उलटू शकेल. ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितीला काटशह देण्यासाठीच माओ राजवटीने, निक्सन राजवटीशी बोलणी करण्याचा घाट घातला आहे आणि तोही रशियन नेते व निक्सन सरकार ह्यांच्यांत काही बोलणी होण्यापूर्वीच !

कदाचित् पुढे त्यांच्यात बोलणी होऊन काही करार होतीलही आणि आशियातील चिनी-अमेरिकन स्पर्धेला काही प्रमाणांत आळा बसू शकेल !

## ह्या प्रवृत्तीला आळा घाला !

परवा मुंबईतील वृत्तपत्रांतून एका नाटकाची जाहिरात प्रसिद्ध झाली. ' नाटय-ज्योत्स्ना ' ही नाटय-संस्था रंगभूमीवर सादर करणार असलेल्या " मोचीराम मोगरे " ह्या नाटकाची ही जाहिरात पुढीलप्रमाणे होती : " नाटक मंडळीतील मुख्य नटीच्या संसाराची धुळधाण करून स्वतः नामानिराळ्या राहणाऱ्या, महाराष्ट्रातील थोर लोकांची नाटयात्मक बदनामी करणाऱ्या, ज्याच्या हिडीस जीवनाचे ' सारे कसे गुपचूप ' हेच सूत्र आहे अशा एका दुष्ट आणि बिलंदर नाटय निर्मात्याचे दर्शन घडविणारे भयानक संगीत नाटक. " गेल्या काही वर्षांत अशा तऱ्हेच्या नाटकांची एक मालिकाच मराठी नाटयसृष्टीत निर्माण होत आहे. " तो मी नव्हेच, " " डॉ. लागू, " " बुवा तेथे बाया " ही सुरुवातीची नाटकं काही अर्थानं योग्य होती, आवश्यक होती. कारण त्यांचे खलनायक समाजातल्या दुष्ट प्रवृत्तींचे प्रदर्शन करीत होते. " मी मंत्री झालो "ने मान्यवर नेत्यांवरील वैयक्तिक टीकेचं आणि वैयक्तिक उखाळ्या पाखाळ्यांचं एक नवीन दालन मराठी नाटयसृष्टीत उघडलं. ह्या प्रवृत्तीचा पूर्ण आविष्कार झाला तो " आचार्य " ह्या नाटकाद्वारे, आणि " आचार्य " चे बेफाम प्रयोग चालू असतानाच, " मोचीराम मोगरे " रंगभूमीवर येत आहेत. ह्या हिडीस प्रवृत्तीला वेळीच आळा घातला गेला पाहिजे, नाहीतर मराठी रंगभूमीला वैयक्तिक उखाळ्या-पाखाळ्या, लाथाळ्या, दुगाण्यांच्या अड्ड्याचं स्वरूप येईल. ○

# शुभंकरोति

'गारंबीचा बापू 'मध्ये राधेची भूमिका करण्याचे आपण ठरवल्यापासून भोवतालची माणसे अनेक प्रकारच्या शंका उपस्थित करीत होती, या कामाला तू फार प्रौढ आणि पोक्त दिसणार नाहीस का ? डॉ. काशीनाथ घाणेकरसमोर नायिका म्हणून तुम्ही कशा पटणार ? तालमी सुरू झाल्या तशा या शंका वाढतच चालल्या. दिग्दर्शक पुरुषोत्तम बाळ यांना आपल्या निवडीविषयी समाधान वाटत होते. खुद्द नाटककार श्री. ना. पेंडसे यांना तालमी पाहून आपल्या भूमिकेची आणि नाटकाची चिंता वाटू लागली. तसेच विश्वास पण वाटत होता. भूमिकेसाठी बांधा आटोक्यात ठेवण्याचा कसोशीचा प्रयत्न आपण चालवला होता; परंतु भोवतालच्या शंका-कुशंकांचे वातावरण आपल्याला बेचैन करीत होते. तालमीत आपले उत्तम ते आपल्याला देता येत नव्हते. निर्णायक क्षणीच भूमिका अंगात घेण्याचे आपलेच तंत्र आपल्याला आता जाचक ठरत होते. आपण कुणाचेही समाधान करू शकत नव्हतो. आणि यात रोज सर्वांगावर पित्ताच्या दादींसारख्या दादी उठू लागल्या. सर्वांग नुसते फुलून येऊ लागले. भूमिकेच्या ताणात हा नवाच शारीरिक आजार उद्भवला. मन बेचैन, त्यात शरीरही बेचैन. डॉक्टर तर घरचाच होता. उपचार सुरू झाले. पण गुण येईना. रोज हा पित्तासारखा 'रॅश' न चुकता उठे. अनेक प्रकारचे उपाय चालले होते पण यात काही कमी म्हणून नव्हते. 'ॲलर्जी' असेल म्हणून विशिष्ट पदार्थ टाळून झाले, विशिष्ट वस्तू वर्ज्य केल्या पण न चुकता 'रॅश' उठतच होता आणि नाटकाच्या ताणात ह्या ताणाने नको जीव होत होता. तालमीत आपल्या-विषयी चौफेर असमाधान व्यक्त होत होते. दिवसा तालमी. संध्याकाळी रॅश. रात्री भूमिकेचे पाठांतर आणि अंगाची तल्खी. झोप उडाली होती. अखेर नाटकाचा पहिला प्रयोग झाला तेव्हा सर्वांचे जीव भांड्यात पडले. आपण भूमिकेत काही कमी पडू दिले नव्हते. पेंडश्यांची राधा आपण त्यांच्या मनाजोगती साकार केली होती. लोकांना ही राधा पटली होती. राधेच्या महत्त्वाच्या प्रसंगांना दाद मिळाली होती. वृत्तपत्रांनीही अनुकूल लिहिले. गंमत म्हणजे अंगावरचा 'रॅश' नाटक झाल्याबरोबर आपोआप पळाला. जादू व्हावी तसा तो कोठल्या कोठे गेला. डॉक्टर मनोहर त्याला गंमतीने 'गारंबीचा रॅश' म्हणे !

## विजय तेंडुलकर । लेखांक सात

घेतल्या भूमिकेला आपण नेहमीच आपले सर्वस्व दिले. त्यात ती आपल्याला जमणार नाही असे कोणी म्हटले की तो आपल्याला अपमान वाटे, आव्हान वाटे. डिवचल्या जाऊन आपण त्या भूमिकेचा सार्‍या शक्तीनिशी पाठपुरावा करीत असू. मग त्यात फक्त तालमींपुरतेच काही उरत नसे. तालमीत, घरी-दारी, जागृतीत-झोपेत, कुठे जाऊ तिथे आणि असू तिथे ती भूमिका आपला पाठपुरावा करीत असे. 'पहिला पेशवा'मधली मस्तानी, 'गारंबीचा बापू'मधली राधा या भूमिका आपण केल्या त्या अशा एका ध्यासाने आणि जिद्दीने.

पण आपल्याला न पटलेली भूमिका आपल्याला कधीही समाधानाचा क्षण देऊ शकली नाही. सुखाचा घासही अशा काळात आपल्याला अशक्य होई. आपण मस्तानी दिसूच शकणार नाही अशी खूणगाठ एकदा मनाशी बसल्यावर मस्तानी म्हणून रंगमंचावर उभे राहणे हा एक छळ होता; तरीही, ते आपल्याला जमणार नाही असे म्हणून माघार घेणे नामुष्कीचे वाटत होते. आपला कलावंत म्हणून अहंकार त्याआड येत होता. मग जी चाले ती एक झटापट असे. आपला सारा आनंद त्यात बळी जाई आणि कोणी किती धीर दिला किंवा कौतुक केले तरी सुख म्हणून वाटत नसे, उलट राग येई. वाटे की हे सगळे तोंडापुरते आणि खोटे बोलतात !

अगदी आरंभीच्या काळातले 'लग्नाच्या बेडी'चे उदाहरण अजून मनात ताजे राहिले आहे. चित्रपटातून तेव्हा नाव होत होते. वसंत जोगळेकरांच्या आग्रहावरून आपण 'रश्मी'ची भूमिका पत्करली. पहिल्या तालमीलाच आत–आत कळले की हे काहीतरी आपल्यापासून फार लांबचे आणि न पोचण्याजोगे आहे. आपला पिंडच या बहुरंगी आणि मुक्त भूमिकेचा नाही. मग जिद्द पणाला लागली. भूमिकेची आणि आपली झटापट तालमी–तालमीला आणि एरवीही मनोमन सुरू झाली. त्या भूमिकेला आवश्यक ते आपण कसून आत्मसात् केले. आणि प्रयोगाला रंगमंचावर गेलो. प्रथम परत आत आलो तेव्हाच आपल्याला अगदी पुरते कळून चुकले होते की आपल्याला न जमणारे प्रयास काय ते आपण करतो आहोत, भूमिकेचे आपले काहीएक नाते नाही. रंगमंचावरचा प्रत्येक क्षण छळवादी झाला होता. नको

रंगमंचावर राहणे असे वाटण्याइतका हा त्रास वाढला आणि प्रथम आत आलो त्या आपण मेकपच्या खोलीत जाऊन ढसढसा रडलो. पुन्हा रंगमंचावर जाणे नको असे वाटत होते पण जाणे भागच होते. नाटक चालू होते आणि ते रीतसर पार पडणे जरूर होते. मनावरचा ताण मग सारखा वाढतच गेला, वैफल्याने आपण खचत गेलो आणि रंगमंचावर जे जे काही केले ते शिस्तशीर होते, प्रेक्षक ते मन लावून पाहत होते, मनमुराद हसत होते, पण सारे निर्जीव आणि यांत्रिक होते. रश्मीपासून वेगळी होऊन उषा केव्हाच रंगमंचावरून आत गेल्यात जमा होती. रंगमंचावर होते ते शरीर.

नाटक संपले आणि एखाद्या मोठ्या तापातून उठावे तशा आपण आत येऊन मेकपरूम बंद करून घेऊन मेल्यासारख्या पडून राहिलो. कोणी भेटू नये, बोलू नये असे वाटत होते: आणि मेकपरूमचे दार जोरजोराने वाजू लागले. नाइलाजाने ते उघडले तेव्हा कोणीतरी म्हणाले, आचार्य अत्रे आले आहेत. तुम्हांला बोलावले आहे. वाटले की काय करायचे भेटून ? नाहीतरी ते निर्भर्त्सनाच करणार ! स्वत:लाच मनाने विचारले, कुठल्या मुहूर्तावर या भूमिकेला तू होय म्हटलेस, उषा ! कसला हा तुझा मूर्खपणा ! तशाच, एखाद्या सजवलेल्या मढ्यासारख्या आपण आचार्यांसमोर जाऊन उभ्या राहिलो. ते म्हणाले, फार चांगले केले काम तुम्ही. आपल्याला ते वाक्यही असह्य झाले. काहीशा उसळून आपण म्हणून गेलो, उगीच तोंडापुरते म्हणू नका ! त्यासरशी आचार्य रागावले आणि त्यांनी आपली चांगलीच हजेरी घेतली. ते म्हणाले मी कधीच कुणाला उगीच बरे म्हणणारा नाही. त्यासाठी ती गोष्ट मला पटावी लागते. माझ्या नाटकांतून कामे करणाऱ्या मोठमोठ्या नटांना मी खरे मत बिनदिक्कत सांगून टाकत आलो आहे. अगदी प्रेक्षागृहात जागचे उठून मी माझ्या नटांना खरे मत ऐकवण्याला कचरणारा नव्हे ! आणि मी तुझी भूमिका चांगली म्हणतो ते तुला तोंडापुरते वाटते ?

आपण हे सारे पत्करले पण मानले नाहीच. त्या प्रयोगानंतर पुन्हा ती भूमिका आपण कधीच केली नाही. इतरांच्या मताआधी प्रथम एखादी भूमिका—नाटकातली, चित्रपटातली, आयुष्यातली—आपल्याला पटावी लागते. त्या भूमिकेत आपण आपल्याला सापडलो तरच त्या भूमिकेला आपण न्याय देऊ शकतो; एरवी घडते ती यांत्रिक वेठबिगार. चित्रपटांतून अशा अनेक भूमिका आपल्याला कराव्या लागल्या. मद्रासला ‘नजराना’ चित्रपटात आपण भूमिकेसाठी गेलो तेव्हाचे आपले हाल आठवणीत राहिले आहेत. चित्रपट विस्मृतीत गेला आहे. तिथली व्यवस्था आणि शिस्त वाखाणण्यासारखी पण सारे काम एखाद्या फॅक्टरीमध्ये चालते तसे होते. कलेचा कुठे संबंधच नव्हता. सारे भडक, बटबटीत, कलाहीन, गंगाजमनी. दिग्दर्शकाची ही अपेक्षा; ती आपल्याला पुरविता येईचना. हे इतके झाले की, आपल्याला भूमिकेतून काढून टाकण्याच्या विचारापर्यंत पाळी गेली ! शेवटी आपण

भूमिका केली पण मारून मुटकून. आज त्या भूमिका आणि ते ढीगभर चित्रपट यांतले काहीही स्मृतीत शिल्लक नाही. करता करताच ते सारे कसे विसरलेच गेले. स्मृतीत थोडीफार आहे ती दूधभातमधली नायिका, जशास तसे मधली भिंगरी, वासुदेव बळवंत मधली राही, बिमल रॉय यांच्या परिवार मधली (मधली जाऊ) आणि काबुलीवाला मधली मीनीची कोमा. या साऱ्याच भूमिका अभिनयाच्या दृष्टीने समाधानकारक होत्या असे नव्हे–किंबहुना आज ह्याबद्दल असमाधानच जास्त आहे–तरीही त्यांनी काही जगण्यासारखे, जीव ओतावा असे, आयुष्याचे काही क्षण वेगळे व्हावेत असे दिले.

चित्रपटसृष्टीत तुम्हांला भेटलेल्या माणसांबद्दल तुम्ही काय म्हणाल? पत्रकार चष्म्याआडून डोळे किलकिले करीत विचारतो.

चित्रपटसृष्टीत आपल्याला भेटलेली माणसे आपल्याबद्दल काय म्हणत असतील....? उषा काहीशा तंद्रीत स्वतःला विचारते.

कदाचित् काहीच म्हणत नसतील. तेवढ्या महत्त्वाच्या आज आपण त्यांच्या लेखी राहिलो नसू. किंवा पुष्कळ काही म्हणत असतील .... तुसडी, शिष्ट, बनचुकी, हट्टी, वाद घालणारी, झालेच तर तालमीत नको तेव्हा हसून खिदळून सगळा मूड बिघडविणारी.....

चित्रपटसृष्टीत कलावंत कमी, कारागीर जास्त. त्यांचाच रुबाब जास्त. यश आणि समजूत यांचा हिशेब कित्येकदा व्यस्त. नामवंत नटी आपल्याआधी दुय्यम नटीकडे चित्रपटासाठी केलेले खोटे दागिने निवडीसाठी पाठविले म्हणून थैमान घालते. नामवंत नट ऐन चित्रीकरणात बरोबरीच्या नटीने आपला गळा दाबण्याचा प्रयत्न केला म्हणून गवगवा करून आपल्या अभिनय-दारिद्र्यावर केविलवाणे पांघरूण घालू बघतो. अनुभवी अभिनेता भूमिकेतल्या बारकाव्यांची दखल घेण्याचे टाकून, विहिरीत चाळीस फूट खोल उडी, बदली माणूस न घेता स्वतः मारण्याचे वेडे शौर्य गाजवून धन्यता मानतो. यशस्वी आणि त्रिखंड कीर्ती गाजणारा नट दिग्दर्शकाला समोर उभे करून स्वतः चित्रपट दिग्दर्शित करू लागतो आणि दिग्दर्शक यात कृतार्थता मानतो. नट लेखकाच्या संवादांना स्वतःची विद्वत्ता जोड-

तात. निर्माते दिग्दर्शकाचा जो हुकूम गुलाम बनवतात, धंद्याचा जरा प्रतिष्ठित प्रकार म्हणून पोटार्थी माणसे आपल्या मुली इथे सोडून देतात. यश आणि कीर्ती नटांना लाभून त्यांच्या कलेतले वाटेकरी असलेले कुशल तंत्रज्ञ मात्र कष्टांत, दारिद्र्यात एक खडतर आयुष्य जगत रखडत राहतात. अत्यंत अनैतिक माणसे इथे ध्येयवादी, उदात्त, दिव्य म्हणून सर्व सुखोपभोग यथेच्छ घेत जगतात तर गुणी कलावंताच्या फक्त दुर्गुणांचीच या सृष्टीत जाहिरात होत राहते आणि गुण उपेक्षिले जातात. ही सृष्टी बाहेरून पाहिली तर तिच्या प्रसिद्धीवरून कित्येकदा एखाद्या भल्या थोरल्या कुंटणखान्यासारखी वाटते आणि तिच्या अंतरंगात बावन्नकशी कलागुण आणि कलावंत कधी मानाने तरी कधी उपेक्षित फिरत असतात. सुंदर जीवन मागणारांना इथे यातना मिळतात तर केवळ जीवन मागत आलेली कंगाल बुभुक्षित माणसे हां हां म्हणता वैभवात लोळतात. उगवत्या सूर्याला इथे अर्घ्य मिळते आणि मावळतीकडे नेहमीच पाठ फिरविली जाते. हा सूर्यही व्यावसायिक यशाचा असतो. तो बहुधा उशीरा उगवतो आणि फार लौकर मावळतो. त्याची उगवती मावळती शपथेवर सांगणारे कुडमुडे आणि द्रष्टे इथे कळपांनी वावरत असतात. त्यांची नेहमीच चलती असते. कुणाचा सूर्य उगवो की कुणाचा मावळो, त्याचे सुखदु:ख न मानता हे चतुर महात्मे उगवते सूर्य हेरीत सदा धावत असतात. निर्दोष पटकथेपेक्षा इथे जोरदार मुहूर्तावर अधिक भर असतो, आत्मसंशोधनाऐवजी दुसऱ्याचे उणेदुणे शोधण्यात आणि बोलण्यात भल्याभल्यांचे उसंतीचे क्षण इथे सुखाने व्यतीत होतात. इथे मुळी माणसे क्वचित आणि त्यांच्या नकळत भेटतात. रोज आणि प्रत्यही भेटतात ते मुखवटे...रंगीबेरंगी...दिमाखदार...हसरे...त्यांच्याआतली माणसे अनेकदा रडत नाहीतर झिजत असतात...नाहीतर एखाद्या अतृप्त भुकेने जळत असतात. या सृष्टीतील कुणीतरी आत्महत्या करतो तेव्हा या साऱ्याच मुखवट्यांना जणू एकच एक सूक्ष्म, सामायिक तडा जातो आणि पुन्हा गडबडीने तो सांधून हे मुखवटे मिरवत राहतात...मोठमोठ्या पोस्टरांसारखे वैभवशाली, खोटे आणि तकलादू वाटत...आतली गुदमरली, जखमी जीवने लपवीत...

तगमगून उषाला वाटते की हे सारे बोलणे अत्यंत आवश्यक आहे; तरीही हे बोलणे निरर्थक आहे. याचे पुढे काय होईल? हे छापले जाईल—बहुधा चुकीचे. निदान आपल्याला ते आपल्यासारखे वाटणारच नाही. कोणी ते वाचतील—किंवा वाचणारही नाहीत. वाचणारे विसरून जातील. पुन्हा सारे पूर्वीसारखेच चालेल. कुणाला मुखवट्यांमागचे सत्य नकोच आहे. जगणारे

मुखवट्यांसाठीच जगताहेत आणि पाहणारे मुखवट्यांपुरतेच पाहत आहेत. सारे काही छान चालले आहे–निदान सुरळीत तरी नक्कीच.

स्वत:ला सावरत ती उत्तर देते, बाकीच्या जगातल्यासारखीच चित्रपटसृष्टीतलीही माणसे असतात. बरी, वाईट....सुष्ट, दुष्ट....रोगट, सुदृढ....वेडी–शहाणी....सुखी आणि दु:खी.... ती वेगळी असतात हा एक गैरसमज आहे. वेगळा असतो ज्याचा त्याचा पोटाचा व्यवसाय.

तिचे मन भरकटू लागलेले असते.

१९५४. बापूंच्या, आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या पोटाच्या व्यवसायात उगवला दिवस कसा मावळला तेही कळत नव्हते. दिवस मावळताच घराकडे वळण्यासाठी घर होते पण पंख नव्हते. ते केव्हाच छाटून खुरटे केलेले होते. रात्रीही जिवापाड कामात, प्रखर भगभगीत प्रकाशात रंगल्या चेहऱ्याने आणि विटल्या मनाने जात. दिवस ज्वरात असल्यासारखे उलटत. पोस्टातली मुलगी, बादशहा, हुस्न का चोर, समाज, यांची चित्रीकरणे चालू होती. एका आवर्तात फिरावे तसे आयुष्याचे चालू होते. बरोबर बापू असत पण ते फार फार लांब भासत. आधार होता, पण तो केव्हातरी सोडावा लागणार हे आता स्पष्टपणे दिसू लागले होते. त्याचे आपले आयुष्य एक असूच शकत नव्हते. मधली दरी एखाद्या क्षणी जाणवून जिवाचा थरकाप उडे. त्या दरीत जायचे नाही एवढे पक्के होते. कारण त्या दरीला अंत नव्हता आणि परतीची वाटही नव्हती. परंतु होती ती परिस्थितीदेखील मनावर सतत एक ताण ठेवून होती. पूर्वीचा दिलासा आता 'दिलासा' राहिला नव्हता आणि आयुष्याची अनिश्चिती विसरता येत नव्हती. काहीतरी घडायला हवे होते; मग ते काहीही असले तरी चालणार होते.

आणि कसे, का, कुणास ठाऊक; पण मनात एकदम काहीतरी आले. असे आणि इतक्या वळाने आले की आपण ते रोधू शकलोच नाही. रोधणे पाप वाटले. आपण आपल्या उपकारकर्त्यापुढे गेलो. त्यानेच आपल्याला आपले बळ दिले होते. आज हे बळ त्याला दूर लोटण्यासाठी सिद्ध झाले होते. आजवर त्याने आपल्याला घडवले. आज आपल्या हातून कोणीतरी, काहीतरी फार महत्त्वाचे, फार निर्णायक घडवीत होते. आपण म्हणालो, यानंतर मी भेटणार नाही. आपली भेटही पुन्हा कधीच होणार नाही. हे म्हणताना आत कुठेतरी कळ उठली ! डोळे भरले ! कंठ गदगदला ! हे सारेच झाले आणि काहीच झालेही नाही. वरपांगी आपण शांत, निश्चयी होतो.

कुठूनतरी, केवढेतरी बळ आपल्यात आले होते. आपण निरोप घेतला. आयुष्यातल्या एका महत्त्वाच्या सर्गाची समाप्ती स्वतःच्या मनाने, इच्छेने केली. इतरांनी विरोध दर्शविला तेव्हा, ज्या नात्याला जिवाच्या कराराने चिकटलो, ते नाते आज स्वखुषीने स्मृत्यर्पणस्तु म्हटले आणि तोडले. कशासाठी ? पुढे काय घडणार होते ? काहीच माहीत नव्हते. नटीच्या पेशाचा लौकिक पाठ धरून होताच. बापूही होते. धाकटी भावंडे होती, त्यांची जबाबदारी होती. पण मनाने एक गोष्ट पक्की घेतली होती.

एक मुलगा पूर्वापार आपल्या घरी येता जाता असे. तो स्वभावाने खूप ऋजू आणि सदा हसतमुख असे. लहानपणीदेखील आपल्या घरी तो येता जाता असे. आपले आजोबा आणि त्याचे आजोबा यांचा म्हणे फार लोभ होता. तो म्हणे फार फार हुशारदेखील होता. डॉक्टर झाला होता. घरी माणसे बरीच होती आणि परिस्थिती गरिबीची होती. त्याच्या डोक्यावर त्यांची जबाबदारी होती. पण तरी त्याचे हसणे कसे प्रसन्न असे. आपण त्याला फोन केला. पुढे काय होईल याचा हिशेब नव्हता, क्षितीही नव्हती. विचारण्याचा निश्चय होता, आपण भेट मागितली. मला तुमच्याशी बोलायचे आहे...तो तयार झाला. वाटले की, एवढे तर घडले. हेही कमी नाही. पुढचे पुढे.

भेट झाली तेव्हा त्याचा समज होता, प्रकृतीचे काही काम असणार. डॉक्टरची आवर्जून भेट सिनेमा नटी एरवी कशासाठी मागणार ? काहीशा धडधडत्या उराने आपण बोललो ते त्याला अनपेक्षित होते. तसे ते आपल्यालाही नवेच वाटत होते. काहीच विचारांती घडत नव्हते. घडत होते एखाद्या प्रचंड स्रोतासरशी विशिष्ट दिशेलाच खेचले, रेटले जावे, तसे. आपण बरेच बोललो. फार स्पष्टपणे, संकोच टाकून बोललो. आपल्याविषयी सारे-सारे सांगता आले तसे सांगितले. काही म्हणून बाकी राहता कामा नये, असे एकसारखे आवेगाने वाटत होते. बरे सांगितले, वाईट सांगितले. खरे सांगितले आणि जे बोलले जात होते, तेदेखील सांगितले. त्याने शांतपणे, मुद्रेवरची प्रसन्नता ढळू न देता, सारे एकाग्रतेने ऐकून घेतले. अखेर आपण प्रश्न केला, माझ्याशी लग्न कराल का ? तुमची इच्छा असल्यास माझी आहे.

तो किंचित्काळ स्तब्ध राहिला. अपेक्षा होतीच की नाही म्हणेल. म्हणाला तर म्हणाला. हा आणखी एक नकार. पण निदान स्वतःच्या इच्छेने घेतलेला. असा नकारसुद्धा चालेल; तोही जपून ठेवू. नकार देणारा वेगळा आहे. चांगला आहे. मोठा आहे. या नकारात वर्मी जखम व्हावी असे काही नाही. उलट तीच तर अपेक्षा आहे. उरेल ते एक शर्थ केल्याचे, आपल्या खुरटचा पंखांनी एक झेप घेतल्याचे सार्थक. तेवढेही नंतर आयुष्यभर पुरवू. पंखात बळ नसणे, नशिबाचा आधार नसणे, हा गुन्हा नव्हे, हे दुर्दैव. त्याची कशाला शरम ?

बोललो आणि हलके वाटले. तो किंचित्काळाने म्हणाला, विचार करून उत्तर देतो. चालेल ? (पान ६० पाहा)

# कापडधंद्याची गंभीर परिस्थिती

खासदार श्री. के. के. मोहता यांच्या प्रश्नास लेखी उत्तर देताना केंद्रीय उपव्यापार-मंत्री श्री. महंमद शफी कुरेशी यांनी असे स्पष्ट केले की १९७० सालापर्यंत आपल्याला निर्यात व अंतर्गत वापर या दोहोंसाठी मिळून १००० कोटी मीटर कापडाची गरज भासेल. १९७३ पर्यंत ही गरज प्रतिवर्षी १२०० कोटी मीटर एवढी होईल.

सध्या आपले कापडाचे उत्पादन प्रतिवर्षी सुमारे ७२० कोटी मीटरच्या आसपास आहे. कापडधंदा हा भारताच्या औद्योगीकरणाचा प्रारंभ व मूळ आधार आहे असे म्हणण्यास हरकत नाही. एकूण ४६ लाख कामगारांपैकी सुमारे २० टक्के कामगार म्हणजे ९ लाख कामगार या धंद्यात आहेत. आपल्या औद्योगिक क्षेत्राच्या एकूण उत्पादनाची किंमत सुमारे ६००० कोटी रु. आहे. पैकी कापड धंद्याच्या उत्पादनाची किंमत सुमारे १००० कोटी म्हणजे जवळजवळ १६ टक्के आहे. या धंद्यात प्रत्यक्षपणे गुंतलेल्या लोकांखेरीज कित्येक लाख लोक या धंद्यावर अप्रत्यक्षपणे अवलंबून आहेत. उदाहरणार्थ, २८ लाख हातमाग व दीड लाख यंत्रमाग कापड धंद्याच्या एकूण उत्पादनापैकी ४४ टक्के उत्पादन निर्माण करतात. या सर्व मागांना लागणारे सूत कापड गिरण्यांनी पुरविले आहे. गेल्या ३० वर्षांत कापडधंद्याचा एवढा विस्तार झाला आहे की अंतर्गत वापराची गरज भागवून आपण कापड निर्यात करू शकतो. गेल्या पाच वर्षांत आपण प्रतिवर्षी १३८ दशलक्ष रु. किंमतीचे कापड निर्यात केले.

सध्या कापडगिरणी धंदा फार अडचणीत आहे, हे रोज वर्तमानपत्रांतील वार्तांवरून स्पष्ट होते. ३०-९-१९६८ अखेर सुमारे २० लाख चात्यांची उत्पादनशक्ती असलेल्या एकूण ८० कापड गिरण्या बंद होत्या. या गिरण्यांत २० हजार माग असून त्यामध्ये ८३००० कामगार कामावर होते. कापडधंद्याच्या अडचणींची

माहिती देणारी एक पुस्तिका इंडियन कॉटन मिल्स फेडरेशन या संघटनेने प्रसिद्ध केली आहे. तीमधील प्रतिपादनानुसार या धंद्याच्या तीन प्रमुख अडचणी आहेत. त्या म्हणजे वाढता उत्पादन खर्च, अव्यवहार्य किंमतनियंत्रण व जबर अबकारी कर !

१९६३ ते १९६८ या दरम्यान कापडधंद्याचा एकूण उत्पादन खर्च ३७ टक्क्यांनी वाढला, पण कापडाच्या किंमती मात्र केवळ १८ टक्केच वाढल्या. १९६३–६४ मध्ये कापसाचे उत्पादन घटल्याने कापसाच्या किंमतींत प्रचंड वाढ झाली. रुपयाच्या अवमूल्यनामुळे आयात केलेल्या कापसाच्या किंमतींत वाढ झाली व त्याचा देशी कापसाच्या किंमतीवरही परिणाम झाला. वरील काळात कापसाच्या किंमती ३१ टक्के वाढल्या, पगारखर्च ५७ टक्के वाढला, जळणखर्च ४१ टक्के वाढला व याचा संयुक्त परिणाम म्हणून उत्पादनखर्चात सरासरी ३७ टक्के वाढ झाली.

१९६२–६३ मध्ये कापडावरील अबकारी कराचे उत्पन्न ८७ कोटी रु. एवढे होते ते १९६७–६८ मध्ये १०९ कोटी रु. झाले व १९६८–६९ मध्ये ११७ कोटी रु. झाले. १९६५–६६ मध्ये २५६ मोठ्या कापडगिरण्यांपैकी १२३ गिरण्यांना तोटा झाला, यामुळे या गिरण्यांचा एकंदर नफा मागील वर्षी २०·८४ कोटी रु. होता तो ३·२२ कोटी रु. झाला. या आतबट्ट्याच्या व्यवहारामुळे कापडगिरण्या बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे.

ऑक्टोबर १९६४ ते मे १९६८ या दरम्यान ५० टक्के कापड-उत्पादन किंमत-नियंत्रणाखाली होते. मे ६८ नंतर किंमतनियंत्रणाखालील कापडात घट झाली असून एकूण उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादनाच्या किंमती नियंत्रित आहेत.

वेळोवेळी वाढवून दिलेल्या किंमतींमधूनही वाढता उत्पादनखर्च भरून येत नाही. कापडाचे उत्पादन घटत आहे. १९६३–६४ ते . १९६७–६८ या चार वर्षांच्या काळात गिरण्यांमधील कापडउत्पादन ४१०·९ कोटी मीटर्सवरून ३७२·३ कोटी मीटर्सपर्यंत घटले. त्याचप्रमाणे अंतर्गत उपयोगासाठी निर्माण केलेल्या सुताचे उत्पादनही ९५ कोटी किलोवरून ८८ कोटी किलोंवर घसरले. असे असूनही या उत्पादनावरून मिळणारा अबकारी कर वाढत आहे. याचा अर्थ तुलनात्मक दृष्ट्या अबकारी कराचे ओझे जास्त झाले आहे.

रिझर्व्ह बँकेने २५६ कापडगिरण्यांच्या व्यवहाराची पाहणी केली. तीत असे दिसून आले की या गिरण्यांची विक्री १९६०–६१ मधील ६११ कोटी रु. वरून १९६५–६६ मध्ये ९०४ कोटी रु. वर गेली. पण याच काळात करपूर्व नफा ४५ कोटी रु. वरून १७ कोटी रु. वर घसरला. सरकारी कर दिल्यानंतरचा नफा ३० कोटी रु. वरून ३ कोटी रु. वर घसरला. नफाक्षमतेतली ही घसरगुंडी अद्यापही चालूच आहे.

कापडाचा उत्पादनखर्च कमी केल्याखेरीज नफा वाढणार नाही. पण उत्पादन-

खर्चापैकी ७१ टक्के खर्च कापूसखरेदी व कामगारांचे पगार यांवर होतो. याखेरीज २० टक्के खर्च असा आहे की ज्यात कपात करणे अशक्य आहे. उत्पादनखर्च कमी करावयास कापसाच्या किंमती कमी केल्या पाहिजेत व त्यासाठी दर एकरी कापसाचे उत्पादन वाढविले पाहिजे. भारतात दर एकरी ११२ पौंड कापूस पिकतो. हे प्रमाण सर्व जगात कमी असून रशियात दर एकरी ६९२ पौंड, मेक्सिकोत ६१४ पौंड व संयुक्त अरब गणराज्यात ५९१ पौंड कापूस पिकतो. कापूस लागवडीच्या पद्धतीत सुधारणा केल्याखेरीज भारतीय कापसाचे उत्पादन वाढणे शक्य नाही. म्हणजे एका अर्थाने या धंद्याचे भवितव्य कापूस-लागवडीशी म्हणजेच पर्यायाने शेतीविकासाशी निगडीत आहे. शेतीकडे वीस वर्षे दुर्लक्ष केल्याचे दुष्परिणाम औद्योगिक क्षेत्रावरही दिसून येतात. आपल्याकडे ते आता एकामागून एक धंद्यात तीव्रपणे दिसत आहेत.

कापडकामगारांची उत्पादनक्षमताही कमी आहे, असा गिरणी मालकांचा दावा आहे. अमेरिकन कापडगिरण्यांशी तुलना करता, त्याच प्रकारच्या कामासाठी भारतात तीन ते सहा पट कामगार जास्त लागतात असा हिशेब त्यांनी केला आहे. सध्याच्या गिरण्यांची यंत्रसामग्री जुनाट झाली असून तिच्या आधुनिकीकरणासाठी फार मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. हा पैसा कापडगिरण्यांजवळ नाही. सरकारने ही गुंतवणूक करावी, असे त्यांचे म्हणणे आहे. कापडधंद्याच्या हलाखीचे खापर गिरणीमालक सरकारवर व शेतकऱ्यांवर फोडतात व सरकार गिरणीमालकांनी नफ्याची उधळमाधळ केली व त्यामुळे आता नवीन यंत्रासामग्रीस पैसा नाही असा आरोप करते. बंद पडलेल्या गिरण्या ताब्यात घेऊन चालविण्याचे एक नवेच काम सरकारला करावे लागत आहे.

गिरणीमालक, गिरणीकामगार, शेतकरी व सरकार हे कापडधंद्याचे चार आधारस्तंभ आहेत. पूर्वीच्या चुका न उगाळता, परस्पर सहकार्याने कापडधंद्याची सुधारणा करण्याचे काम, जरूर तर गिरणीमालकांवर नियंत्रणे घालून, त्वरित व्हावयास पाहिजे. या धंद्याची स्थिती अशीच खालावत गेली तर त्याचे अर्थ-सामाजिक परिणाम फार गंभीर होतील.

**— चंद्रशेखर मराठे**



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

चमत्काराच्या बातम्या छापल्याशिवाय वर्तमानपत्रांना बरेच वाटत नाही की काय कोण जाणे ! का तुम्हा–आम्हांलाच त्या वाचल्याशिवाय अन्न गोड लागत नाही ? जगातल्या सगळ्याच घडामोडी तर्काला धरून, बुद्धीला पटणाऱ्या आणि नेहमीच्या असल्या तर त्यात स्वारस्य कसले ? कुठेतरी काहीतरी विचित्र ऐकले-वाचले की मनाला कसा उल्हास वाटतो. आता हीच बातमी पाहा ना. वाचलीत ना तुम्ही ? अक्कलकोट तालुक्यातल्या सापरे नावाच्या कुठल्याशा एका खेडेगावात ग्रामदैवत हनुमानाचे देवालय आहे. नुकताच त्याचा–म्हणजे देवळाचा–जीर्णोद्धारही झाला आहे. या देवळासमोर म्हणे एक जुनीपुराणी शिळा आहे. त्या शिळेवर एक कागद ठेवून तो कागद नंतर अर्धांगवायू झालेल्या माणसाला चिकटवला की अर्धांग-वायू बरा होतो म्हणतात. लोकांना याचा अनुभव येतो आहे, इतकेच नव्हे तर आतापर्यंत नव्वद टक्के लोकांना त्याचा गुण आलाही आहे. नास्तिक लोकांना मात्र याचा गुण आला नाही, अशीही बोलवा आहे. अर्धांगातून उठलेल्या रोग्यांनी देवळाच्या जीर्णोद्धारासाठी फक्त पाच रुपये द्यायचे. बाकी अट वगैरे काही नाही.

अर्धांगवायू, शिळा, कागद, पाच रुपये आणि बजरंगबली यांचा परस्परसंबंध काय असावा, हे माझ्यासारख्या पामराला कळणे कठीण आहे. आता ही गोष्ट खरी की, हा बजरंगबलीचा वैयक्तिक प्रश्न आहे. त्याने जर असे ठरवले असले की या सगळ्या गोष्टींचा संबंध लावायचाच, तर त्याला अशक्य काही नाही. हनुमंताचे सामर्थ्य अचाट आहे.

**' हनुमंत महाबळी ! रावणाची दाढी जाळी '**

हे स्तोत्र लहानपणीच ऐकले आहे. [ त्या वेळी हनुमंताच्या शक्तीचा बोध यामुळे काहीच झाला नव्हता. रावणाला दाढी होती ही एक चमत्कारिक वार्ता मात्र नव्यानेच कळली. असो. ] प्रश्न एवढाच पडला की हा कागद शिळेवर ठेवून मग रोग्याला चिटकवण्याची दगदग त्याने कशाला निर्माण केली ? [ हा कागद नेमका कुठे चिटकावयाचा याचा बातमीत काहीच उल्लेख नाही. चिटकवण्यासाठी डिंक, गोंद, खळ वगैरे वस्तूंचा उपयोग करावयाचा की काय, हेही नमूद नाही. तेही असो. ] पण साध्या दर्शनाने रोग बरा होण्याची युक्ती त्याने का बरे काढली नाही ? शिवाय त्याने आपली ही करुणा केवळ अर्धांगवायूच्या रोग्यापुरतीच मर्यादित

ठेवली हे तरी बरे आहे काय ? सगळ्याच रोगावर हा ' अक्सर इलाज ' ठेवायला काही हरकत होती का ? अर्धांगवायूच्याच रोग्यांचा त्याला एवढा पुळका का बरे यावा ? का तो वायुपुत्र असल्यामुळे अर्धांगवायू त्याला जवळचा आहे ? तसे असेल तर मात्र आम्हांला हर्षवायू होईल हे मी कबूल करतो. देवा, काय आहे ती वस्तुस्थिती एकदा स्वप्नात येऊन सांगा तर खरी !

शेकडा नव्वद लोकांना याचा गुण आला म्हणतात, पण नास्तिक लोकांना मात्र काही फायदा झाला नाही, ही यातली घटना मात्र विचार करावयास लावणारी आहे खास ! नास्तिक लोकांबद्दल माझे मत पहिल्यापासूनच चांगले नाही. देवाबद्दलची त्यांची मते ' प्रेज्युडिसड् ' असतात असे मी ऐकले आहे. काही नास्तिकांचा तर देवावर अजिबात विश्वास नसतो म्हणतात ! हे जर खरे असेल तर मग घडले ते ठीकच म्हटले पाहिजे. हनुमंतावर विश्वास नाही तर त्याने तरी तुमच्या मदतीला काय म्हणून धावून यावे ? त्याला काही दुसरा उद्योगधंदा नाही काय ? रोग बरा व्हावा वाटत असेल तर वैद्यावर विश्वास पाहिजे. नाहीतर औषधाचा उपयोग काडीमात्र होणार नाही. म्हणून नास्तिक मंडळींना मला या निमित्ताने एकच विनंती करावयाची आहे. कृपा करून आपल्याला अर्धांगवायू होऊ देऊ नका. झाल्यास आम्ही जबाबदार नाही. मग साडेतीन हात लांबीचा कागद जरी तुमच्या देहावर चिटकवला तरी गुण येणार नाही. गुण हवा असेल तर मुकाट्याने आस्तिक व्हा पाहू कसे ! म्हणजे अर्धांगवायू खलास !

नास्तिक लोकांच्याप्रमाणेच मला त्या सर्व शक्तिमान मारुतीलाही एक शंका विचारावयाची आहे. हा दुर्धर रोग आधुनिक डॉक्टर-वैद्यांनासुद्धा बरा करता येत नाही. हे काम तुम्ही करता ही आनंदाची गोष्ट आहे. पण हे काम तुम्ही कुठल्याशा एका तालुक्यातील एका कुग्रामात बसून (किंवा उभा राहून) का चालवले आहे ? आपण कृपा करून मुंबईसारख्या शहरात या. तेथे नाना प्रांतातले, नाना तऱ्हांचे रोगी येतात. तुमच्या दयाळू वृत्तीला तेथे केवढातरी स्कोप आहे. [ मुंबईत कागदही भरपूर उपलब्ध आहे. ] मुंबईत तुम्ही हे काम सुरू केलेत तर तुमची प्रसिद्धीही अधिक होईल आणि पैसाही चांगला मिळेल. एका नव्हे अनेक देवळांचे जीर्णोद्धार सहज होऊन जातील. सर्वशक्तिमान मारुतिराया माझी ही विनंती आनंदाने मान्य करील अशी मला आशा वाटते.

## ☐ गोठ्यात भरणारी शाळा

आपल्या पुण्याजवळ हडपसर, मुंढवा, डोवडवाडी ही लहानलहान गावे आहेत. आता अलीकडे ही गावे पुणे महापालिकेच्या कक्षेत आली आहेत. मुंढव्याजवळ डोवडवाडी हे जे गाव आहे. तिथली शाळा गोठ्यात भरत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. ही शाळा महापालिकेची आहे. पूर्वी ज्या ठिकाणी अक्षरशः गोठा होता

तेथे शाळा चालू आहे. शाळेत विद्यार्थी आहेत ऐंशी आणि शिक्षक एकच आहेत. असा हा प्रकार गेली कित्येक वर्षे चालू आहे. शाळेची ही स्थिती तर गावात वीज नाही, पाण्याची सोय नाही हे काही निराळे सांगावयास नकोच ! ......

डोबडवाडीच्या या शाळेचा हा वृत्तांत वाचला आणि अंतःकरण अनिर्वचनीय भावनेने भरून आले. सध्या आपल्या देशात नुसत्या इमारती बांधण्याचे काम चालू आहे, आज कामकाज होण्याच्या दृष्टीने काहीच प्रगती नाही अशी ओरड सतत चालू आहे. शाळा-कॉलेजच्या नावाने तर आपले मोठमोठे नेते एकसारखे सांगताहेत की, नुसती टोलेजंग इमारत म्हणजे शिक्षणसंस्था नव्हे; तर तेथील शिक्षण हे खरे महत्त्वाचे. पण हे म्हणणे कानाआड टाकूनही नव्यानव्या इमारती सतत बांधल्या जाताहेत. त्यामुळेच शिक्षणाचा ऱ्हास होत आहे. अशा वेळी ' इमारतीवाचून चालणारी शाळा ' असे वर्णन कोठे वाचले म्हणजे जिवाला अंमळ विरंगुळा वाटतो. कोठेतरी खरे शिक्षण चालू आहे अशी खात्री पटून थोडासा धीर येतो. त्यातून ही शाळा तर शुद्ध गोठ्यात. पडक्या, जुन्यापुराण्या वाड्यातसुद्धा नाही ही गोष्ट उत्साहवर्धक आहे. ' गोठा ' ही जागा शाळेसाठी अगदी योग्य आहे हे कुणीही कबूल करील. सध्या बैलजोडीचे राज्य चालू आहे. बैलांची कर्मभूमी गोठा हीच आहे. त्यांचे राज्य अबाधित चालू राहावे असे वाटत असले तर गोठ्यातच काही वर्षे घालवलेली पिढी निर्माण होणे आवश्यक नाही काय ? या शाळेत शिकलेल्या विद्यार्थ्यांना बैलांचे जितके प्रेम आणि महत्त्व वाटेल तितके इतर शाळेतल्या मुलांना वाटेल काय ?

गोठ्यात शाळा भरवण्याचा महापालिकेचा हेतू मोठा उच्च असला पाहिजे. शहरात प्राथमिक शाळेपासून चांगल्या चांगल्या इमारतींची चळत सुरू होते. नवे कोरे वर्ग, बसावयास बाकडी, काळाकुट्ट फळा, खिडक्या-दारे, खेळण्यासाठी प्रशस्त क्रीडांगण या सर्व थाटामुळे मुलांचे अभ्यासाकडे कितपत लक्ष लागत असेल ते देव जाणे ! माझा तर अनुभव असा आहे की, अशा उंची शाळांमधली पोरे अभ्यासाकडे मुळीच लक्ष देत नाहीत. इतरच उद्योग जास्ती करतात. मग त्यांना खरे शिक्षण कसे मिळणार ? खरे शिक्षण हवे असेल तर हा फापटपसारा बंद केला पाहिजे. गोठ्यात मुले बसली की त्यांचे लक्ष अभ्यासाकडे लागलेच पाहिजे. कारण त्या वातावरणाचा विसर पडण्यास त्यांना अभ्यास हाच एकमेव विरंगुळा राहतो. दुसरी काही भानगड त्यांच्या डोक्यात राहत नाही. दुसरे असे की, या देशातल्या दारिद्र्याचा संस्कार त्यांच्या मनावर फार प्रभावीपणे उमटल्याशिवाय राहणार नाही. या दारिद्र्याचे दर्शन झाले तरच त्याच्याशी मुकाबला करण्याची जिद्द त्यांच्यांत निर्माण होईल. खाली खडे, दगडधोंडे टोचताहेत, जवळपास वास सुटलेला आहे, नैसर्गिक ऊनपाऊस अंगावर पडतोच आहे या वातावरणातील शिक्षणाची माधुरी काही वेगळीच आहे. त्यातून ऐंशी मुलांत एक शिक्षक ठेवून महापालिकेने आणखी बहार उडवून

दिली आहे. इतक्या सगळ्या मुलांना हा एक शिक्षक एकटा काही सतत शिकवू शकणार नाही हे उघडच आहे. मुलांना स्वयंप्रेरणेनेच शिक्षण घेण्याची तरतूद यामुळे झाली आहे. ती फारच उत्कृष्ट आहे. आपले ज्ञान आपणच मिळवणे, आपला गुरू आपणच होणे यासारखी अत्युत्तम गोष्ट नाही. निसर्गाच्या सहवासात मिळणारे शिक्षण सर्वश्रेष्ठ होय असे शिक्षणतज्ज्ञ म्हणतात. गुरुदेव रवीन्द्रनाथांनी आपले शांतिनिकेतन याच तत्त्वावर स्थापन केले. आमच्याकडे बंगालसारखा निसर्ग कोठला ? इथे आमच्या खेड्यात असाच निसर्ग मिळायचा ! कसा का असेना, निसर्गाच्या सहवासात मुले राहिली म्हणजे पुरे. या सगळ्या दृष्टींनी गोठ्यातील शाळेचा जो अभिनव प्रयोग पुणे महापालिकेने चालवला आहे त्याचे मला कौतुक वाटते. शिक्षणप्रेमी लोकांनी या प्रयोगाची योग्य ती दखल घेतली पाहिजे आणि ठिकठिकाणी शाळा अशाच कोठेकोठे—उकीरड्यावर, पडक्या भुताटकीच्या वाड्यात, ओढ्यानाल्यात भरवून त्याचा काय परिणाम होतो हे अवश्य पाहिले पाहिजे. ○



# आयूब राजवटीस आव्हान

वा. दा. रानडे

पाकिस्तानचे अध्यक्ष फील्ड मार्शल आयूबखान यांच्या राजवटीला दहा वर्षे पुरी झाल्याबद्दल पाकिस्तानात सरकारी पातळीवर मोठे समारंभ झाले. वृत्तपत्रांत त्यांच्या कामगिरीची स्तुती करणारे लांबलचक लेख प्रसिद्ध झाले. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत अध्यक्ष आयूब यांच्यावर पेशावर येथे एका सभेत एका तरुणाने गोळ्या झाडल्या. आयूब बचावले पण ही घटना म्हणजे पाकिस्तानात अलीकडे धुमसत असलेल्या सरकारविरोधी असंतोषाचाच उद्रेक होता. आयूब राजवटीला दहा वर्षे पुरी झाल्याबद्दल त्यांच्या कामगिरीची जी स्तुतिस्तोत्रे गायिली गेली ती केवळ सरकारी पातळीवरील भाटगिरी होती. खरी परिस्थिती निराळी आहे हे पाकमध्ये अलीकडे अनेक ठिकाणी झालेल्या निदर्शनांवरून स्पष्ट झाले आहे.

या आयूबविरोधी चळवळीचे वास्तविक स्वरूप काय आहे ? काही निश्चित कार्यक्रमांवर ती उभारलेली आहे काय ? हा कार्यक्रम आयूब यांच्या धोरणापेक्षा अधिक जनहिताचा व पुरोगामी आहे काय ? पाकच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणांत त्यामुळे मोठे बदल होण्याची शक्यता कितपत आहे ? पाकच्या भारताशी असलेल्या संबंधांत त्यामुळे काही फरक पडणार आहे काय ? पाकिस्तानमध्ये खरी लोकशाही आणण्याचा विरोधी नेत्यांचा मनापासून प्रयत्न आहे का ? समाजवादी चळवळीला तेथे कितपत भवितव्य आहे ? की आयूबच्या जागी दुसरा एखादा हुकूमशहा आणावयाचा एवढेच या चळवळीचे मर्यादित स्वरूप आहे ? हे प्रश्न केवळ पाकच्याच नव्हे तर भारत-पाक संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. पाकमधील अलीकडल्या घटनांचा विचार या संदर्भात केला पाहिजे.

पाकचे माजी परराष्ट्र मंत्री व अध्यक्ष आयूब यांचे प्रमुख विरोधक झुल्फिकार अली भुट्टो यांना अटक करण्यात आली. पश्चिम पाकिस्तानात अनेक ठिकाणी भुट्टो यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांची मोठी निदर्शने झाली होती. खुद्द राजधानी रावळपिंडीत त्यांचे एखाद्या वीराप्रमाणे स्वागत झाले. स्वागत सभेस पोलिसांनी

? ? ?

बंदी केली असताही तीन हजार विद्यार्थी बंदीहुकूम मोडून जमले. पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात दोन ठार झाले. यातून दंगलीचे प्रकार झाले. सरकारी वाहने जाळण्यात आली. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी लष्कर बोलवावे लागले. एक आठवडा संचारबंदी पुकारावी लागली. यावरूनच ही निदर्शने केवढी उग्र असली पाहिजेत, त्याची कल्पना येते.

कोणा कम्युनिस्ट नेत्याच्या भाषणातील किंवा निवडणूक जाहीरनाम्यातील ही घोषणा नाही. ही घोषणा आहे, भुट्टोंची. गेल्या १ डिसेंबर १९६७ रोजी त्यांनी 'पाकिस्तान जनता पक्षा'ची (पाकिस्तान पीपल्स पार्टी) स्थापना केली. त्या पक्षाचे पहिले प्रकाशन म्हणून 'पाकिस्तानातील राजकीय परिस्थिती' (पोलिटिकल सिच्युएशन इन् पाकिस्तान) हे पुस्तक भुट्टोंनी लिहिले. त्यात आपल्या पक्षाचा कार्यक्रम विशद करताना ही घोषणा त्यांनी दिली आहे. या पुस्तकाला पाकिस्तान-मध्ये बंदी करण्यात आली आहे.

बंदी करण्यासारखे या पुस्तकात काय आहे ? सबंध पुस्तक मला पाहायला मिळू शकले नाही, पण त्याचे पहिले प्रकरण चार लेखांच्या रूपाने कलकत्त्याच्या 'हिंदुस्थान स्टँडर्ड' या दैनिकाच्या १७ ते २० नोव्हेंबर १९६८ च्या अंकांत प्रसिद्ध झाले, त्यावरून त्यात आक्षेपार्ह असे काही असावे असे वाटत नाही. आयूब राजवटीवर त्यात कडक टीका आहे हे खरे. पण यापेक्षासुद्धा कडक टीका आपल्या-कडे इंदिरा गांधींच्या राजवटीवर विरोधी पक्षांचे नेते करीत असतात. पाकमध्ये अशी टीका दडपली जाते, याचाच अर्थ तेथे खरी लोकशाही नसून 'मूलभूत लोकशाही'च्या बुरख्याखाली अध्यक्ष आयूब यांची हुकूमशाहीच अस्तित्वात आहे.

**इस्लाम आमचा धर्म.**
**लोकशाही आमची राज्यपद्धती.**
**समाजवाद आमची अर्थव्यवस्था.**
**सर्व सत्ता जनतेच्या हाती.**

१४ डिसेंबर १९६८

या चतु:सूत्रीत आपल्या पक्षाची भूमिका भुट्टो यांनी मांडली आहे. इस्लाम, लोकशाही आणि समाजवाद यांची एकच मोट भुट्टो यांनी कशी काय बांधली? पण भुट्टो यांच्या दृष्टीने त्यात विसंगत काही नाही. ते लिहितात, "इस्लाम समतेचा पुरस्कार करतो आणि समाजवाद हा ती साध्य करण्याचे आधुनिक तंत्र आहे. पाकिस्तान म्हणजे समाजवादी पद्धती असलेले इस्लामी राष्ट्र होईल असे डॉ. महंमद इक्बाल यांचे स्वप्न होते. ते अंशत: साकार झाले. पाकिस्तान इस्लामी राज्य झाले पण त्याची भांडवलशाही पद्धती इस्लामी तत्त्वांविरुद्ध आहे. पाकिस्तान हे समाजवादी स्वरूपाचे सरकार असलेले इस्लामी राज्य होईल असे पाकिस्तानचे संस्थापक महंमद अली जिनांनी अनेकदा जाहीर केले आहे." (पण आपल्या म्हणण्यास आधार म्हणून जिनांचे एक वाक्यसुद्धा भुट्टोंनी या प्रकरणात उद्धृत केलेले नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. जिनांचे नाव घेतल्याशिवाय आपले म्हणणे लोकांना पटणार नाही, असे वाटून समाजवादाच्या पुरस्कारासाठीसुद्धा जिनांचा आधार भुट्टो यांनी घेतला आहे असे दिसते.)

## परदेशी भांडवलाची पकड

भांडवलदारांबद्दल 'हे लोक इतके स्वार्थी असतात की त्यांच्याशी युक्तिवाद करणे कठीण असते,' असे जिनांचे एकच निसटते वाक्य उद्धृत करून भुट्टो म्हणतात, "मूठभर भांडवलदारांकडे जबाबदारी सोपविणे म्हणजे पाकिस्तानची तत्त्वप्रणाली परकीय प्रभावाखाली जाऊ देणे होय......या भांडवलदारांचे परदेशी भांडवलदारांशी समान हितसंबंध असतात. पाकिस्तानात परदेशी प्रभावाचा शिरकाव खोलवर झालेला असून अनेक प्रसंगी महत्त्वाच्या राष्ट्रीय हितसंबंधांची परदेशी दडपणाखाली तडजोड करण्यात आली आहे. हे थांबले पाहिजे."

देशात औद्योगिक पायाच अजून तयार झालेला नाही. परदेशी मदत केवळ कारखाने उभारण्यासाठीच नव्हे तर ते चालविण्यासाठीसुद्धा लागते. त्यात कपात होताच कारखाने बंद पडण्याची किंवा एकच पाळी चालू ठेवण्याची वेळ आली. शेतकी उत्पादनातील तूट भरून न काढता पी. एल. ४८० कराराखाली मिळणाऱ्या अमेरिकन गव्हावर अवलंबून राहण्याचे सरकारने ठरविले आणि आता त्या धोरणाची जबर किंमत आपणांस द्यावी लागत आहे, अशी टीका भुट्टो यांनी केली आहे.

पृथ्वीवर गरीबीचे सर्वांत जास्त प्रमाण पाकिस्तानात आहे. हा कलंक समाजवादाने धुऊन काढला पाहिजे. उत्पादनाची साधने खासगी मालकीची न ठेवता समाजाच्या मालकीची केली पाहिजेत. खासगी उद्योगधंद्यांना वाव राहील, पण त्यातून मक्तेदारी निर्माण होऊ दिली जाणार नाही. तसेच उद्योगधंद्यांच्या सामाजिक मालकीचे रूपांतर सरकारी भांडवलशाहीत होऊ दिले जाणार नाही, असे भुट्टो यांनी म्हटले आहे. लोकांचे दारिद्र्य दूर करावयाचे असेल तर लोकशाही

आणि समाजवाद हातात हात घालून गेली पाहिजेत, असे मत त्यांनी प्रतिपादिले आहे.

अध्यक्ष आयूब यांची ' मूलभूत लोकशाही ' म्हणजे हुकूमशाहीचेच दुसरे नाव आहे. विधिमंडळांची निवड सध्या अप्रत्यक्ष पद्धतीने होते. प्रथम मतदार ८० हजार ' बेसिक डेमोक्रॅटस 'ची निवड करतात व हे ८० हजार प्रतिनिधी विधिमंडळांची व अध्यक्षांची निवड करतात. अप्रत्यक्ष पद्धतीच्या निवडणुकीत दडपण आणून किंवा आमिषे दाखवून बेसिक डेमोक्रॅटसवर प्रभाव पाडता येतो. ही पद्धत बदलून प्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत सुरू केली पाहिजे, अशी भुट्टो यांची मागणी आहे.

" मी ज्या तत्त्वांसाठी मंत्रिपद सोडले त्या तत्त्वांसाठीच आता निवडणुका लढविणार आहे, " असे भुट्टो यांनी या भाषणात सांगितले. पण ती तत्त्वे कोणती ते मात्र विशद केले नाही.

भुट्टो यांनी ' पाकिस्तान पीपल्स पार्टी ' दि. १ डिसेंबर १९६७ ला स्थापन केली. पाकिस्तानात इस्लामिक समाजवाद स्थापण्याच्या कार्यास हा पक्ष वाहून घेईल, असे त्यांनी त्या वेळी जाहीर केले. ' इस्लामिक समाजवाद ' हे शब्द वास्तविक परस्परविरोधी आहेत. त्यातून भुट्टो व त्यांच्या पक्षाची वैचारिक भूमिका स्पष्ट होण्याऐवजी वैचारिक गोंधळ मात्र दिसून येतो. पाकिस्तानी जनमतावर अजूनही धर्माचा पगडा मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा इस्लामला आवाहन केल्याशिवाय लोकांचा पाठिंबा मिळणार नाही. पण त्याचबरोबर आजच्या तरुण पिढीस समाजवादाबद्दल वाटणारे आकर्षण विसरूनही चालणार नाही. म्हणून त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी इस्लामिक समाजवादाची घोषणा भुट्टो यांनी केली. निवडणुकीत मते मिळविण्यापलीकडे या घोषणेस फारसा अर्थ नाही.

अध्यक्ष आयूब यांच्या मूलभूत लोकशाही पद्धतीवर भुट्टो कडक टीका करीत आहेत. पण दोन वर्षांपूर्वीपर्यंत याच पद्धतीचा ते पुरस्कार करीत होते, तेव्हा त्यांच्या आताच्या भूमिकेमागे लोकशाहीबद्दलच्या खऱ्या प्रेमापेक्षा लोकांची मते मिळवून निवडणूक जिंकण्याचाच उद्देश मुख्यत: आहे हे उघड आहे.

पाकिस्तानची राज्यघटना संघराज्य स्वरूपाची असावी, की एककेंद्रित (युनिटरी) असावी, तेथे अध्यक्षीय पद्धतीची लोकशाही असावी की संसदीय पद्धतीची असावी, की दोन्हींचे विशेष तीत असावेत, प्रदेशांना स्वायत्तता असावी या सर्व प्रश्नांवर जनतेला निर्णय घ्यावयास लावावा व त्यावरचा दीर्घकाळ चाललेला वाद थांबवावा, असे भुट्टो यांचे म्हणणे आहे; पण या वादग्रस्त प्रश्नांवर स्वत: भुट्टो यांचा कल कोणत्या बाजूला आहे ? आयूब यांच्या ' मूलभूत लोकशाही 'ला त्यांनी आपला विरोध दर्शविला आहे. संसदीय लोकशाहीकडे त्यांचा कल असल्याचे दिसते. संसदीय लोकशाही ताबडतोब स्थापन करण्यात यावी. लोकप्रतिनिधींचे सरकार स्थापन करण्यासाठी निश्चित कार्यक्रम व कालमर्यादा आखण्यात यावी

आणि लोकशाही पद्धती स्थापन करण्यासाठी घटनेत सुधारणा करण्यात यावी, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.

पूर्व पाकिस्तानच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. तेथील जनतेची गाऱ्हाणी रास्त आहेत, असे भुट्टो यांनी म्हटले आहे; पण तेथील जनतेच्या स्वायत्ततेच्या मागणीचा त्यांनी स्पष्टपणे पुरस्कार केलेला नाही.

## आयूब राजवटीची खोटी स्थिरता

" आयूब राजवटीची स्थिरता खोटी आहे. या सरकारच्या धोरणामध्ये सुसंगतीचा मागमूस नाही. या सरकारची अंतर्गत व परराष्ट्रीय दोन्ही धोरणे अनिश्चित आणि परस्परविसंगत आहेत. लंबकाच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला ती झुकत गेली आहेत, " अशी टीका भुट्टोंनी या पुस्तकात केली आहे.

अध्यक्षांच्या आजारपणाच्या दोन महिन्यांच्या काळात घटना धाब्यावर बसवून कारभार चालला होता, असा आरोप भुट्टो यांनी केला असून एक उदाहरण दिले आहे. नॅशनल असेंब्लीचे स्पीकर यांनी सुप्रीम कोर्टाच्या एका जज्जांकडून शपथ घेतली. घटनेप्रमाणे स्पीकरने उपाध्यक्ष नेमल्याचे जाहीर झाल्यानंतरच त्यांना वरील अधिकार पोचतो. पण तसे काही घडलेले नसताना झालेला हा शपथविधी म्हणजे उघड उघड घटनाभंग होता. हा घटनाभंग डोळ्यांवर येऊ नये म्हणून स्पीकराना परदेशी दौऱ्यावर पाठविले.

भारतविषयक धोरणाबद्दल भुट्टो या पुस्तकात लिहितात, " परदेशी मित्रांच्या सल्ल्याने भारताने पाकबाबत अलीकडे सौम्य धोरण स्वीकारले आहे. व्यापक तडजोडीचा आणखी एक प्रयत्न केला जाईल असा याचा अर्थ लावायचा का ?"

" भारत-पाक संबंधांत ही काही नवी घडामोड नव्हे. लियाकत अलीपासून प्रत्येक पंतप्रधानाने असे प्रयत्न केले. आयूब राजवटीत वाटाघाटी व संघर्ष यांनी कमाल व किमान पातळी गाठली. आता हेच चक्र पुन: फिरत आहे. एकच फरक म्हणजे भारताला त्यामुळे संधी मिळत असून पाकिस्तान कमकुवत होत आहे. " भुट्टोंचा भारताशी तडजोडीस किती तीव्र विरोध आहे हे यावरून स्पष्ट होईल.

काश्मीरबाबत तर वाटाघाटी अधिकच निरर्थक असून हा प्रश्न ताबडतोब सुरक्षा समितीकडे न्यावा, असे भुट्टो यांनी सुचविले आहे.

चीनबद्दल ते लिहितात, " आपण भोवती पाहिले तर पाकिस्तानच्या हितसंबंधांशी ज्यांचे हितसंबंध जुळते आहेत आणि जो पाकिस्तानला मदत करू शकेल, असा एकच मोठा देश म्हणजे चीन असल्याचे दिसून येईल. लष्करी मदत करून किंवा राजकीय मार्गाने किंवा दोन्ही मार्गांचा अवलंब करून तोच एक देश पाकचा ढळलेला तोल सावरू शकेल. भारतास तोंड देताना पाकजवळ नेहमीच जमेच्या बाजूला काहीतरी हवे. सरकारला आवडो वा न आवडो चीन हा तो जमेच्या

बाजूचा घटक आहे. तो काढून टाकला तर पाकिस्तानला नेहमी तीन बडी राष्ट्रे व भारत यांच्या मर्जीनुसार चालावे लागेल. "

पुढच्या निवडणुकीत आपला पक्ष आयूब यांच्या नेतृत्वास आव्हान देणार हे जाहीर करताना अटकेपूर्वी केलेल्या एका भाषणात भुट्टो म्हणाले, " इस्लामाबाद-मधील अध्यक्षीय प्रासादापर्यंत पोचण्याच्या मार्गात दुर्लंघ्य अडचणी आहेत, याची मला जाणीव आहे. पण त्यामुळे मी कच खाणार नाही. लोकांमध्ये जागृती निर्माण करणे हे माझे मुख्य उद्दिष्ट आहे. जयाची किंवा पराजयाची मी पर्वा करीत नाही. पूर्ण लोकशाही आणि सर्व प्रौढांना मताचा हक्क हा माझा निवडणूक कार्यक्रम आहे. त्याचा पुरस्कार मी करीत राहीन. मग तुरुंगात जावे लागले तरी हरकत नाही. "

भुट्टो यांच्या तुफानी प्रचार मोहिमेमुळे दुसऱ्या कोणत्याही विरोधी पक्षापेक्षा त्यांच्या पक्षाने अवघ्या एका वर्षाच्या काळात अधिक लोकप्रियता मिळवली आहे. त्यांना अटक करून, त्यांच्यावर देशद्रोहाच्या आरोपाखाली खोटे खटले भरून त्यांना आपण बदनाम करू असे आयूब यांना वाटत असेल, पण प्रत्यक्षात या दडपशाहीचा उलट परिणाम होऊन भुट्टो यांची लोकप्रियता अधिक वाढण्याचाच संभव आहे.

## भुट्टो आणि समाजवाद

आयूब यांच्या जागी भुट्टो अधिकारावर आले तर प्रत्यक्ष परिस्थितीत काय फरक पडेल ? समाजवादाच्या घोषणा ते कितपत अंमलात आणू शकतील, याची शंका आहे; कारण लष्करी व मुलकी अधिकारी, शहरांतील उद्योगपती आणि खेड्यांतील जमीनदार हा पाकच्या सध्याच्या राजवटीचा मुख्य आधार आहे. अध्यक्ष आयूबनी त्या वर्गांच्या हितसंबंधांना धक्का लावला नाही. म्हणूनच गेली दहा वर्षे ते अधिकारावर राहिले. समाजवाद आणायचा म्हणजे भुट्टो यांना या वर्गांना दुखवावे लागेल. तसे झाल्यास ते वर्ग उठाव करून भुट्टोंनाच खाली ओढण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीत. भुट्टो समाजवादाची भाषा अलीकडे दोन वर्षांत बोलत आहेत. समाजवादाचा खरा आधार असलेल्या कामगारवर्गाच्या आणि गरीब शेतकरी व शेतमजुरांच्या संघटना त्यांनी उभारलेल्या नाहीत. त्यांचे लढे लढवलेले नाहीत. त्यांचे वजन विद्यार्थी व मध्यमवर्गापुरतेच मर्यादित आहे. पाकिस्तानात वीस वर्षांत समाजवादी चळवळ मूळ धरू शकली नाही, ती भुट्टो यांच्या नेतृत्वाखाली उभी राहील, अशी आशा करणे भाबडेपणाचे ठरेल. तसेच ते अधिकारावर आल्याने समाजवादी क्रांती होईल ही अपेक्षाही भाबडेपणाची होईल.

भुट्टोंचे समाजवादाबद्दलचे प्रेम त्यांच्या चीनबद्दलच्या प्रेमातून उद्भवलेले आहे. अमेरिका, रशिया, चीन या परस्परविरोधी राष्ट्रांकडून लष्करी मदत मिळवून, त्या सर्वांशीच सलोख्याचे संबंध ठेवू पाहणाऱ्या आयूबखानांपेक्षा आपला खात्रीचा हस्तक पाकच्या अधिकारपदी चीनला हवा आहे. त्या पदासाठी भुट्टोंसारखा दुसरा लायक

नेता चीनला मिळणार नाही. चीनच्या दृष्टीने भुट्टो यांचा मोठा गुण म्हणजे त्यांचा कट्टर भारतद्वेष. भारताशी कोणतीही तडजोड न करता नेहमी संघर्षाचे—युद्धाचे—वातावरण तापत ठेवले पाहिजे, असे भुट्टो यांचे धोरण आहे. अध्यक्ष आयूब यांनी नुकतीच ' युद्ध नको ' करार करण्याची तयारी दर्शविली. पण या सूचनेला त्यांनी एवढ्या अटी घातल्या आहेत की, त्या अटींसह भारतास ती मान्य होणे शक्य नाही. तरीसुद्धा नुसती अशी सूचना केल्याबद्दल भुट्टोंनी आयूब यांच्यावर टीकेची झोड उठविली. एका बाजूला पाक व दुसऱ्या बाजूला चीनशी संघर्ष सतत चालू राहून भारत कमकुवत व्हावा, हेच चिनी नेत्यांना हवे असून, ते साधण्यासाठी भुट्टो त्यांना मदत करीत आहेत.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता आयूब यांच्या जागी भुट्टो आल्याने भारताच्या दृष्टीने हिंद-पाक संबंध सुधारणार नसून, उलट संघर्ष वाढवून चीनला अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

## अशगरखान यांचे आव्हान

अध्यक्ष आयूब यांचे दुसरे मोठे विरोधक म्हणजे हवाईदल प्रमुख एअरमार्शल महंमद अशगरखान हे होत. काही महिन्यांपूर्वीच ते निवृत्त झाले. हिंद-पाक युद्धात त्यांनी गाजविलेल्या वैयक्तिक धैर्याच्या व शौर्याच्या गोष्टी अजूनही पाकमधील लोकांच्या तोंडी आहेत. अशगरखान मूळचे जम्मूमधील पंजाबी. तरुण लष्करी व मुलकी पंजाबी अधिकाऱ्यांत ते लोकप्रिय आहेत. डेहराडूनचे मिलिटरी कॉलेज, लंडनचे इंपीरिअल डिफेन्स कॉलेज, फायटर लीडर्स स्कूल व जॉइंट सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये त्यांचे लष्करी शिक्षण झाले. वयाच्या ३६ व्या वर्षी—१९५७ मध्ये—हवाईदलाचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या जागेवर १९६५ पर्यंत ते होते. नंतर पाकिस्तान इंटरनॅशनल एअर लाईन्सचे चेअरमन म्हणून त्यांनी काम केले.

आयूब यांची राजवट भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशिलेबाजी व अकार्यक्षम कारभाराने सडलेली आहे, असा आरोप त्यांनी केला. सरकार सुधारण्याची चळवळ करण्याकरता व लोकमत जागृत करण्यासाठी आपण लौकरच देशभर दौरा करणार आहोत, असे त्यांनी सांगितले. पण आपल्या सुधारणा कार्यक्रमाची रूपरेषा त्यांनी विशद केली नाही. ' स्वतंत्र व प्रगतिपर समाज ' स्थापण्यासाठी आपण प्रयत्न करणार, एवढेच त्यांनी सांगितले. विरोधकांना सामील झालेले ते सर्वांत मोठ्या लष्करी हुद्याचे अधिकारी आहेत.

आपला निर्णय जाहीर करताना पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत अशगरखान म्हणाले, " सामाजिक व आर्थिक विषमता वाढत असून श्रीमंत व गरीब यांच्यांतील दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. या परिस्थितीमुळे आपली जबाबदारी पार पाडण्याच्या सरकारच्या पात्रतेवरील लोकांचा विश्वास उडाला आहे. " भुट्टो व इतर नेत्यांची

धरपकड दुःखद असल्याचे सांगून ते म्हणाले, "लोकांना आपली मते व्यक्त करण्याची मोकळीक दिली पाहिजे." भाषणस्वातंत्र्य आणि वृत्तपत्रस्वातंत्र्य यांची अशा पद्धतीने गळचेपी करण्यात आली आहे की, सर्वसाधारण मतप्रदर्शन करणेही फार कठीण झाले आहे. परिस्थिती एवढी बिघडली आहे की, बळाचा वापर आणि दडपशाहीच्या जोरावरच हे सरकार अधिकारावर टिकून आहे, अशी टीका त्यांनी केली.

दहा वर्षांपूर्वी आयूबखान यांना अधिकारावर आणण्यात असगरखान यांचा महत्त्वाचा भाग होता. सैनिकांना त्यांच्याबद्दल मोठा आदर असून त्यांच्या निर्णयाचा परिणाम लष्करी अधिकाऱ्यांवरही झाल्याशिवाय राहणार नाही. लष्कर हा तर आयूब राजवटीचा मुख्य आधार आहे, तोच ढासळला तर ती राजवट कोसळायला वेळ लागणार नाही.

असगरखान यांचे लष्करी अधिकाऱ्यांवरील वजन लक्षात घेता अध्यक्षीय उमेदवारीसाठी भुट्टोपेक्षा त्यांना अधिक पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. असगरखान अधिकारावर आले तर, आयूब राजवटीतील लाचलुचपत, वशिलेबाजी, अकार्यक्षमता दूर करण्यासाठी कडक उपाय योजतील. लष्कराच्या बळावर प्रथम आयूब यांनी सत्ता हाती घेतल्यावर त्यांनीही प्रथम असेच उपाय योजले होते. पण पुढे अधिकारपदावर स्थिर झाल्यावर पुन्हा या दोषांनी डोके वर काढले. असगरखान आज लोकशाही व लेखन–भाषण स्वातंत्र्याची भाषा बोलत असले तरी त्यांची लष्करी परंपरा लक्षात घेता ते निवडून येण्याने आयूबच्या जागी दुसरा लष्करी हुकूमशहा अधिकारावर आला, एवढाच बदल होण्याचा संभव आहे. असगरखान यांनी आपली राजकीय मते स्पष्टपणे मांडलेली नाहीत. पण त्यांचा कल अमेरिकेकडे असल्याचे बोलले जाते. पण हुकूमशहांचे सर्वसाधारण तंत्र लक्षात घेता आयूब यांच्या पद्धतीपेक्षा फारशा निराळ्या पद्धतीचा ते कारभार करतील, अशी शक्यता दिसत नाही.

विरोधी पक्षांच्या नेत्यांपैकी दुसरे दोन प्रमुख नेते म्हणजे पूर्व पाकमधील अवामी लीगचे शेख मुजीबुर रहमान आणि वायव्य सरहद्द प्रांतातील सरहद्द गांधी खान


**शिलंगणाचे सोने**

**ब. मो. पुरंदरे**

नवीन आवृत्ती लवकरच प्रकाशित होत आहे.

अब्दुल गफारखानांचे चिरंजीव वलीखान. पण हे दोघेही मुख्यतः प्रादेशिक नेते आहेत. दोघेही आज तुरुंगात आहेत. बहुसंख्य पाकिस्तानी जनतेचा पाठिंबा मिळविण्याइतके त्यांचे वजन नाही.

पूर्व पाकिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत ही पाकच्या स्थापनेपासूनच असंतोषाची व चळवळीची केंद्रे आहेत. पण आता ही असंतोषाची लाट पाकच्या इतर भागांतही पसरली आहे. त्यामुळेच आयूब यांची राजवट गेल्या दहा वर्षांत कधी नव्हती एवढी अस्थिर झाली आहे.

पश्चिम पाकिस्तानचा एक घटक मोडून त्याचे पूर्वीप्रमाणे वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब, सिंध असे घटक करावे यासाठी चळवळीने पुनः जोर धरला आहे. सबंध पाकिस्तानवर पूर्व पाकिस्तानचे वर्चस्व होऊ नये, म्हणून पश्चिम पाकिस्तानातील सर्व प्रांतांचा एक घटक तेथील जनतेची इच्छा डावलून करण्यात आला. पण अशी जनतेची इच्छा डावलून केलेले प्रयोग फार काळ टिकत नसतात हा अनुभव आपणांस महाराष्ट्र-गुजरात महाद्विभाषिकाच्या बाबतीत पूर्वी आलेलाच आहे. पाकमध्येही तेच घडत आहे. पश्चिम पाकचा एक घटक मोडून पूर्वीप्रमाणे प्रांत निर्माण होणे अटळ आहे. तसे न केल्यास असंतोष वाढत जाईल. पूर्व पाकिस्तानचीही स्वायत्ततेची मागणी राजकर्त्यांना फार काळ डावलता येणार नाही.

सध्याची राज्यघटना अध्यक्ष आयूब यांना सोयीची आहे. ८० हजार बेसिक डेमोक्रॅटस्वर दडपण आणून ते सहज निवडून येतात. म्हणूनच ही निवडणूक पद्धत बदलून प्रौढ मतदानाने विधिमंडळे निवडण्याची मागणी सर्व विरोधी पक्षांनी एकजुटीने केली आहे. शांततेच्या मार्गाने हा बदल घडवून आणण्याचे अध्यक्ष आयूब यांनी मान्य केले तर पाकिस्तानात कदाचित् दुसरी लष्करी क्रांती होण्याचा संभव आहे.

बहुसंख्य पाकिस्तानी जनतेचा पाठिंबा मिळवू शकेल, असा एकही राजकीय पक्ष आज पाकिस्तानात नाही. संसदीय पद्धतीची लोकशाही पाकमध्ये आली तरी अनेक छोटया राजकीय पक्षांच्या अस्तित्वामुळे संमिश्र मंत्रिमंडळे बनवावी लागतील व त्यातून पुनः काही काळ अस्थिरता निर्माण होईल. पण आयूब यांच्या हुकूमशाही राजवटीला लोक आता एवढे विटले आहेत, की या हुकूमशाहीपेक्षा लोकशाहीतील ती अस्थिरता परवडली असे त्यांना वाटत आहे. या अस्थिरतेतूनच निश्चित धोरण व कार्यक्रमाच्या पायावर उभारलेला पक्ष हळूहळू संघटित होईल. असे होण्यास किती काळ लागल हे सांगणे कठीण आहे. खऱ्या लोकशाहीशिवाय आपली प्रगती नाही हे पाकमधील जनतेला आता पटू लागले आहे. पण धर्मवेडेपणाचा प्रभाव दूर करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करणारे नेते पाकमध्ये निर्माण होत नाहीत तोपर्यंत पाकमध्ये खऱ्या लोकशाहीचा विकास होणे कठीण आहे. ○

# दोन पाकिस्तानांतील विषमता

लोकसंख्येच्या दृष्टीने पाकिस्तानचा सर्वांत मोठा घटक असलेल्या पूर्व पाकिस्तानला पाकमध्ये सापत्नभावाने वागविण्यात येते. विजेचा वापर पश्चिम पाकमध्ये पूर्व पाकच्या एकोणीसपट होतो. चहा व पेट्रोलचा खप आठपट होतो. सिगारेटस् सहापट जास्त आणि कापड व साखर तिप्पट जास्त खपते. पूर्व पाकपेक्षा पश्चिम पाकमध्ये दहापट जास्त मोटारी व सातपट जास्त रेडिओ आहेत.

पाकच्या आर्थिक योजनेत शेती-पाटबंधारे, वीज, खाणी, रस्ते, दळणवळण, शिक्षण या क्षेत्रांतील विकासासाठी पश्चिम पाकिस्तानला ६२२ कोटी २६ लाख रु. व पूर्व पाकिस्तानला ४५७ कोटी ९ लाख रु. मंजूर करण्यात आले. एकूण खासगी भांडवलगुंतवणुकीच्या फक्त १० टक्के वाटा पूर्व बंगालला मिळाला आणि आयात केलेल्या यंत्रसामग्रीपैकी फक्त २८ टक्के यंत्रसामग्री त्याच्या वाटयास आली.

पाकिस्तानला ५८ टक्के परदेशी चलन पूर्व पाक मिळवून देतो असे असताही औद्योगिक विकासासाठी त्याच्या वाटयास मात्र फक्त २७ टक्के परदेशी चलन येते. परदेशी मदतीच्या बाबतीत तोच पक्षपात. एकूण परदेशी मदतीपैकी फक्त २० टक्के मदत पूर्व पाकला दिली जाते. शिक्षणाच्या बाबतीत तोच अनुभव. पश्चिम पाकमध्ये चार विद्यापीठे आहेत पण पूर्व पाकमध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त असूनही फक्त दोनच विद्यापीठे आहेत. गॅझेटेड अधिकाऱ्यांमधील ३५००० सीनियर गॅझेटेड अधिकारी पश्चिम पाकिस्तानचे आहेत तर पूर्व पाकच्या अधिकाऱ्यांची संख्या अवघी ११,००० आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर रशिया आणि अमेरिका या दोन राष्ट्रांच्या तुलनेने बाकीची राष्ट्रे अत्यंत कमजोर झाली. भिन्न तत्त्वज्ञानाचा आणि समाज-व्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या या दोन राष्ट्रांमध्ये साहजिकच सत्तासंघर्ष सुरू झाला. एकमेकांवर मात करण्याचे प्रयत्न प्रत्येक क्षेत्रात सुरू झाले. सैनिकी सामर्थ्याचे क्षेत्र हे अर्थात सर्वात महत्त्वाचे क्षेत्र. त्यामुळे परस्परांची सैनिकी गुपिते मिळवण्यासाठी हेरगिरीचे अखंड सत्रच या दोन राष्ट्रांना चालवावे लागत असले पाहिजे.

रुडॉल्फ एबेल हा रशियाचा अमेरिकेतील स्थायी हेर होता. जवळजवळ दहा वर्षे त्याने मोठ्या हिकमतीने आपली कामगिरी पार पाडली. पकडला गेल्यानंतर तोंडावाटे त्याने एक शब्दही काढला नाही. तीस वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेचा स्वीकार त्याने धीरोदात्तपणे केला. या सुमारास गॅरी पॉवर्स या अमेरिकन हेराचे विमान रशियात पाडण्यात आले आणि यथाकाल या दोन हेरांची अदलाबदल करण्यात आली.

एबेलच्या हेरगिरीचे तंत्र, त्याच्या मदतनिसाची फितुरी, एका झुंझार अमेरिकन वकिलाने केलेला त्याचा शर्थीचा बचाव, त्याच्या पत्नीची व मुलीची हृदयस्पर्शी पत्रे, गॅरी पॉवर्सशी त्याची झालेली नाट्यपूर्ण अदलाबदल आणि या साऱ्या घटनांतून व्यक्त होणारे त्याचे बहुरंगी, धीरोदात्त व्यक्तिमत्त्व यांमुळे एबेलची ही सॉंशे द ग्रॅमॉं यांनी आपल्या ‘ दी सीक्रेट वॉर ’ या पुस्तकात सांगितलेली कथा अत्यंत वेधक झाली आहे.

तिचा हा दोन अंकांत मिळून सादर केलेला अनुवाद वाचकांना आवडेल, असा विश्वास वाटतो...............



# रुडॉल्फ एबेल
## दोन चेहऱ्यांचा हेर...

| | | | पूर्वार्ध | | | | | | | | | | | | | | | अनन्त भावे | | | |

एकोणीसशे सत्तावन्न सालातील एकवीस जूनची सकाळ होती. न्यूयॉर्क शहरातील अठ्ठाविसाव्या रस्त्यावर असलेल्या लाथाम हॉटेलला नुकती कोठे जाग येत होती. इतक्यात अमेरिकन गुप्तहेर खात्याचे तीन अधिकारी हॉटेलात शिरले. सरळ आठव्या मजल्यावर जाऊन आठशे एकूणचाळीस क्रमांकाच्या खोलीचा दरवाजा त्यांनी ठोठावला. या खोलीत मार्टिन कॉलिन्स नामे कोणी सद्गृहस्थ राहत होता. उंच आणि मध्यमवयीन कॉलिन्सवर हॉटेल मालक खुश होता. कारण तो भाडे वेळच्या वेळी देत असे. त्याला भेटायला फारसे कोणी येत नसे. तसेच व्यवस्थेबद्दल तो कधी कसली तक्रारही करत नसे.

कॉलिन्सने दरवाजा उघडला. अधिकारी सरळ आत शिरले. शिरल्याबरोबर त्यांच्यापैकी एकजण कॉलिन्सला म्हणाला, "कर्नल, तुम्ही आमच्याशी सहकार्य कराल अशी आशा आहे." आपल्याला मोठा सैनिकी दर्जा बहाल केल्याबद्दल आश्चर्याचा कोणताच भाव कॉलिन्सने व्यक्त केला नाही. ब्रुकलिनमध्ये एमिल गोल्डफुस या नावाने एखादा स्टुडिओ त्याने भाड्याने घेतला आहे काय, असे कॉलिन्सला प्रश्नकर्त्याने विचारले. कॉलिन्सने या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले.

साडेसात वाजता इमिग्रेशन इन्व्हेस्टिगेटर रॉबर्ट स्कोएनबर्गर तेथे आले. त्यांनी कॉलिन्सला आणखी एका नावाच्या बाबतीत पृच्छा केली, "आपण अॅन्ड्र्यू कायोटिस या नावाने एकोणीसशे अठ्ठेचाळीस साली कॅनडामधून अमेरिकेत प्रवेश केला होता काय ?" कॉलिन्सने होकार दिला. त्यावर, बेकायदेशीररीत्या अमेरिकेत

प्रवेश केल्याबद्दल त्याला अटक करण्यात आली आहे, असे कॉलिन्सला सांगण्यात आले.

गुप्तहेरखात्याच्या अधिकाऱ्यांना कॉलिन्सची संपूर्ण माहिती होती. मार्टिन कॉलिन्स, एमिल गोल्डफुस, अॅन्ड्र्यू कायोटिस अशा अनेक नावांनी वावरणारा हा मध्यमवयीन मनुष्य खरोखर रशियन हेरखात्यातील एक अत्यंत चाणाक्ष हेर रुडॉल्फ आयव्हॅनोव्हिच एबेल होता ! ज्या रशियन हेर खात्यात बढती मिळणे मोठे कठीण असे त्यात 'कर्नल'चा मानाचा हुद्दा एबेलने संपादिला होता. त्याचा कर्नलचा हुद्दा खराच होता; पण 'एबेल' हे नावदेखील इतर नावांप्रमाणेच बनावट असावे. कारण एकोणिसशे वीस सालच्या सुमारास फ्रान्समध्ये असलेल्या अनेक रशियन हेरांनी 'एबेल' हेच नाव धारण केलेले होते. कर्नल रुडॉल्फ एबेल त्याच्या हस्तकांना 'मार्क' या टोपण नावाने परिचित होता. त्याचे खरे नाव कधी कळलेच नाही.

हॉटेलच्या खोलीत मार्टिन कॉलिन्स ऊर्फ एमिल गोल्डफुस ऊर्फ अॅन्ड्र्यू कायोटिस ऊर्फ कर्नल एबेल ऊर्फ 'मार्क' गुडघ्यावर कोपरे टेकवून आणि डोके हातात पकडून बिछान्यावर स्वस्थ बसला होता. रशियन हेरखात्यातील तो एक बडा अधिकारी आहे हे कोणाला सांगूनही पटू नये इतका तो सीधासाधा दिसत होता.

## रशियन हेरसंघाचा कर्णधार

परंतु जवळजवळ दहा वर्षे अमेरिकेतील रशियन हेरगिरीचे कौशल्याने सूत्रचालन करणाऱ्या कर्नल एबेलने या क्षेत्रातील आपला अधिकार निःसंशय सिद्ध केला होता. अमेरिकन गुप्तहेर खात्याचे प्रमुख अॅलन डलेस एबेलबद्दल म्हणाले की, असे एखाद-दोन अमेरिकन हेर आम्ही मॉस्कोमध्ये ठेवू शकलो असतो तर काय बहार झाली असती !

एबेल हा आपल्या जाळ्यात अडकलेला सर्वांत मोठा रशियन हेर आहे अशी स्वच्छ कबुली अमेरिकन गुप्तहेरखात्याने दिली. विसाव्या शतकातील सर्वांत हिकमती रशियन हेर, असे एबेलचे वर्णन त्यांनी केले होते. त्यांच्या मते, महायुद्धकाळात जपानमध्ये, नाझी परराष्ट्रीय वार्ताहर असल्याचा देखावा करून जर्मन राजदूताचा विश्वास संपादन करणारा रिचर्ड सॉर्ज आणि जर्मन फौजांची इत्थंभूत हालचाल रशियाला कळवणारा झेक कम्युनिस्ट रुडॉल्फ रॉसलेर हेदेखील एबेलची बरोबरी करू शकत नव्हते.

एबेल रशियाचा अमेरिकेतील स्थायी हेर होता. त्याचे कायम वास्तव्य न्यूयॉर्क शहरातच होते. परंतु उत्तर अमेरिका, इतकेच नव्हे तर मेक्सिको आणि मध्य अमेरिकेतील रशियन हेरगिरीचे सूत्रचालन तो करीत असे. अमेरिकेतील रशियन हेरसंघाचा तो कर्णधार होता म्हणा ना. माहितीची संपादणी तो स्वतः करत नसे. ते काम त्याच्या सर्वत्र पेरलेल्या हस्तकांचे असे. त्यांच्याकडून माहिती गोळा करणे, तिची छाननी करणे, खास प्रक्षेपण व्यवस्थेप्रमाणे ती मॉस्कोला पाठवणे आणि जटिल हेरव्यवस्थेचे गुंतागुंतीचे अर्थकारण सांभाळणे ही एबेलची कामे होती. दोन-चार जवळच्या हस्तकां-

शिवाय इतरांना त्याचे दर्शनदेखील कधी होत नसे. शांततेच्या आणि शीतयुद्धाच्या काळात ही हेरयंत्रणा सुरळीत चालू ठेवणे आणि प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागताच पंचमस्तंभी कारवायांसाठी तिला राबवणे असे एबेलच्या जबाबदारीचे स्वरूप होते.

अटक झाली तरी एबेल अगदी निर्विकार होता. जणू प्रथमपासूनच अटकेची शक्यता त्याने गृहीत धरली होती. त्याचे मन स्वच्छ होते. केवळ देशप्रीतीने प्रेरित होऊनच त्याने ही जोखमीची कामगिरी स्वीकारली होती. शिवाय तो पकडला गेला तोही त्याच्या स्वतःच्या चुकीमुळे वा हलगर्जीपणामुळे नव्हे. रायनो हेहानेन हा एबेलचा हस्तक फितुर झाला होता आणि त्याने एबेलला अमेरिकन गुप्तहेर-खात्याच्या जाळयात ढकलले होते. एकोणीसशे सत्तावीस साली एबेल रशियन हेर-खात्यात दाखल झाला होता आणि तो पकडला गेला तेव्हा त्याच्या मागे हेरखात्या-तील तीस वर्षांची कर्तबगार कारकीर्द उभी होती.

## भरभक्कम पुरावा

एबेलने आपले कपडे बॅगमध्ये काळजीपूर्वक भरायला सुरुवात केली. बॅग भरता भरता काही वस्तू तो कोपऱ्यातील कचऱ्याच्या टोपलीत फेकून देत होता. खोलीभर रंगपेटया, वेगवेगळया आकारांचे ब्रश, कागद आणि पेन्सिली पडलेल्या होत्या. एका टेबलावर शॉर्ट-वेव्ह रेडिओ होता. दुसऱ्या टेबलावर प्रेमकथांपासून गणितशास्त्रा-वरील ग्रंथांपर्यंत विविध विषयांवरील पुस्तके होती.

बॅग भरता भरता, मनगटाजवळ, आपल्या सदऱ्याच्या बाहीत एक कागदाचा कपटा सरकवताना एबेलला स्कोएनबर्गरने पाहिले. त्याने पुढे होऊन तो कागदाचा कपटा काढून घेतला. कागदावर पाच आकडयांच्या काही संख्या गटवार व्यवस्थित लिहिलेल्या होत्या. तो एक सांकेतिक संदेशच होता. त्यानंतर एबेलला हातकडया चढवण्यात आल्या आणि त्याला हॉटेलमधून बाहेर नेण्यात आले. खोलीत मागे राहिलेल्या गुप्तहेरखात्याच्या अधिकाऱ्यांनी कोपऱ्यातील टोपलीमधील वस्तूंची बारकाईने पाहणी केली. त्यात त्यांना एक छोटासा लाकडी ठोकळा आढळला. वरवर पाहता त्यात संशयास्पद काहीच नव्हते. परंतु अधिक कसोशीने पाहणी केल्यानंतर तो एकसंध लाकडी ठोकळा नसून ती एक छोटीशी पेटीच आहे, असे त्यांच्या लक्षात आले. प्रयत्नांती त्यांनी ती पेटी उघडली. पेटीत एक अगदी छोटी दोनशेपन्नास पानांची पुस्तिका मिळाली. प्रत्येक पानावर पाच आकडयांच्या काही संख्या लिहिलेल्या होत्या. गुप्त संदेश लिहायला मदत करणारी संदर्भ-पुस्तिका होती ती. एबेलच्या गुप्तसंदेश-व्यवस्थेची ती कळच होती. त्यातील संकेत-कल्पना अगदी साधी होती. अक्षरांऐवजी विशिष्ट आकडयांची योजना त्यात केलेली होती. त्यानुसार प्रत्येक शब्दाच्या तयार होणाऱ्या सांकेतिक संख्येच्या पुढे एक निरर्थक अंक ठेवण्याची अधिक काळजीदेखील घेतलेली होती. वरवर पाहता एखाद्या

संस्थेच्या उत्पन्नाचे वा एखाद्या राज्याच्या लोकसंख्या गणनेचे ते आकडे आहेत असेच कोणालाही वाटले असते. आकड्यांत छापलेला संदेश कोणाला कसा कळणार ?

त्या वस्तूत एक अंगचेच खोडरबर असलेली जाडीजुडी पेन्सिल सापडली. त्या पेन्सिलीच्या पोकळीत अठरा मायक्रोफिल्म्स होत्या. बहुतेक साऱ्या मायक्रोफिल्म्स कर्नल एबेलला त्याच्या पत्नीने आणि कन्येने पाठवलेल्या पत्रांच्या होत्या. एका फिल्मवर मॉस्कोला संदेश पाठवण्याचे वेळापत्रक दिलेले होते.

एबेलकडे दोन जन्मदाखले, सहा हजार डॉलर्सची रोख रक्कम, एक बँक-बुक, सेफ डिपॉझिट बॉक्सची एक किल्ली आणि रोगप्रतिबंधक लसी टोचून घेतल्याची नोंद ठेवणारा एक आंतराष्ट्रीय दाखला इतक्या वस्तू मिळाल्या. एक जन्मदाखला एमिल रॉबर्ट गोल्डफुस या नावाचा असून त्यात तो न्यूयॉर्क शहरात दोन ऑगस्ट एकोणीसशे दोन रोजी जन्मल्याची नोंद होती. ही जन्मतारीख कर्नल एबेलच्या स्वतःच्या खऱ्या जन्मतारखेहून बरोबर एक महिना पुढची होती. त्याचे खरे जन्म स्थल मॉस्को होते. आरोग्यखात्याकडे चौकशी करता अशी माहिती मिळाली की खरा एमिल रॉबर्ट गोल्डफुस, जन्मल्यावर चौदा महिन्यांनी, म्हणजे नऊ ऑक्टोबर एकोणीसशे तीन रोजी मृत्यू पावला होता ! दुसरा जन्मदाखला मार्टिन कॉलिन्सच्या नावे होता. त्यात पंधरा जुलै अठराशे सत्याण्णव ही त्याची जन्मतारीख नोंदवली होती. हा दाखला मात्र सर्वथैव बनावट होता. बँक-बुकात एकोणीसशे पन्नासपासून एकोणीसशे सत्तावनपर्यंत वेळोवेळी पैसे भरल्याची नोंद होती. त्यातच तेराशेशाहाऐंशी डॉलर्सची शिलकी रक्कम दाखवली होती.

एबेलने आपल्या मित्राच्या नावावर घेतलेल्या सेफ डिपॉझिट बॉक्समध्ये पंधरा हजार डॉलर्स मिळाले. या रकमेचा हिशेब सांगताना प्रथमच एबेलने एखाद्या सर्वसामान्य हेरासारखी एक कल्पनारम्य कथा सांगितली. तिच्याप्रमाणे, अमेरिकन चलनांतील ही एवढी मोठी रक्कम त्याला म्हणे रशियामध्येच एका मोडकळीला आलेल्या घरात सापडली होती. त्यानंतर म्हणे डेन्मार्कमध्ये एक बनावट परवाना विकत घेऊन त्याच्यावर एकोणिसशे अठ्ठेचाळीस साली कॅनडामार्गाने त्याने अमेरिकेत प्रवेश केला होता.

बनावट पेन्सिली आणि गुप्तसंदेशांसारखा भरभक्कम पुरावा आपल्या निवासस्थानी कायम बाळगल्याबद्दल अमेरिकन गुप्तहेरखात्याच्या अधिकाऱ्यांना एबेलचे आश्चर्यच वाटले. " इतका सावध मनुष्य अस्तनीत असे निखारे बांधून कसा राहील ? " एकजण उद्गारला.

## जनसामान्यांपैकी एक

त्यानंतर अधिक चौकशीसाठी एबेलची टेक्सासला मॅकॅलन तुरुंगात रवानगी करण्यात आली. त्यापूर्वी शिरस्त्याप्रमाणे त्याची छायाचित्रे घेण्यात आली. ती पाहून, ती इतक्या मातबर हेराची असतील अशी कल्पनाही कोणी केली नसती, इतका

त्यातील चेहरामोहरा वैशिष्टयहीन होता. "चारचौघांसारखे दिसणे एबेलला छान साधून गेले होते," असे कोणीतरी त्या छायाचित्रांकडे पाहून म्हटले ते खरेच होते. रस्त्यांतून जाणाऱ्या सहस्रावधी जनसामान्यांपैकी एक असे एबेलचे स्वरूप होते.

तो पाच फूट दहा इंच उंच होता. सडपातळ होता. त्याचे कपडे साधे असत. इंग्रजी भाषेवरील हुकूमतीमुळे अमेरिकेतील वास्तव्यात त्याचा कोणाला संशय येणे फारसे शक्य नव्हते. हेरखात्यात शिरण्यापूर्वी मॉस्को येथे तो भाषाशिक्षक होता. पाच-सहा भाषा तो अस्खलित बोलू लिहू शकत असे.

त्याला पकडल्यानंतर मात्र, त्याला ओळखणाऱ्या काहींनी, त्याच्या उच्चारणात एक स्कॉटिश किंवा डब्लिनकडील आणि आँक्सोनियन ठसका आहे, असे मत व्यक्त केले. ब्रुकलिन इमारतीमध्ये, त्याच्या शेजारीच स्टुडिओ थाटून असलेल्या एका चित्रकाराने त्याच्या उच्चारणात ब्रुकलिनी लकबी आलेल्या होत्या असे सांगितले. कसेही असले तरी एबेलने आपली निवासस्थाने शहरातील अशा विशिष्ट परिसरात निवडली होती की जेथे त्याच्या वेगळया, ठसकेबाज उच्चारणाकडे कोणाचे सहज लक्ष जाऊ नये.

मॅकॅलन तुरुंगात एबेलला इतर कैद्यांपासून वेगळे ठेवण्यात आले होते. त्याच्या भोजनाची खास व्यवस्था करण्यात आली होती. त्याउलट त्याला पुन्हा पुन्हा उलट-तपासणीला तोंड द्यावे लागत होते. या उलटतपासणीत, आपण रशियन नागरिक असून बनावट कागदपत्रांच्या साहाय्याने अमेरिकन नागरिक होऊन राहण्याचा गुन्हा केला अशी कबुली त्याने पुन्हा दिली. अशा उपऱ्या आणि अनधिकृत नाग-रिकांची पुन्हा मायदेशी रवानगी करण्याची व्यवस्था केली जाते. एबेलची तशी व्यवस्था करण्यात आल्यास त्याला त्याची काही हरकत आहे काय, अशी पृच्छा त्याला करण्यात आली. "मी अशा पाठवणीला विरोध करणार नाही," असे एबेलने सांगितले. वॉशिंग्टनमधील रशियन दूतावासाकडून त्याबद्दल लकडा लावायला सुरुवातदेखील झाली होती.

एबेलच्या अटकेपूर्वी आणि नंतरदेखील अनेक रशियन माणसांनी राजकारणाचा खल करण्याच्या निमित्ताने हेरगिरी केली होती. परंतु त्यांना विशिष्ट राजनैतिक दर्जा असल्यामुळे त्यांची पुनश्च रशियाला पाठवणी करण्यापलीकडे त्यांच्याविरुद्ध काही कारवाई करणे अमेरिकन गुप्तहेरखात्याला शक्य नव्हते. एबेलची गोष्ट वेगळी होती. एबेलला कसलाही राजनैतिक हुद्दा नव्हता. मात्र जे खोटे अमेरिकन नागरिकत्व त्याने काही वर्षे धारण केले होते, त्या नागरिकत्वाचे काही हक्क त्याला मिळणे शक्य होते.

रशियाला पाठवणी होणे कठीण असून हेर म्हणूनच त्याच्यावर खटला भरण्यात येईल, असे एबेलला कळविण्यात आले. गुन्हा शाबीत झाल्यास देहान्ताची शिक्षा

मिळण्याचा संभव होता. हां, आता तो फितुर झाला असता तर गोष्ट वेगळी होती. आपल्याकडे वळवण्यासाठी अमेरिकन गुप्तहेरखात्याने मोठमोठ्या रकमांची आणि वैभवशाली भविष्याची लालुच त्याला दाखवली. पण एबेल त्यांना वश झाला नाही. एक तर आपल्या या अग्रगण्य हेराची आणि त्याच्या कुटुंबाची रशियाने मोठी शानदार बडदास्त ठेवली होती. आणि दुसरे म्हणजे वैयक्तिक स्वार्थासाठी कोडगेपणाने देशहितावर निखारे ठेवायला तयार होण्याइतके एबेलचे इमान तकलादू नव्हते.

सात ऑगस्ट एकोणिसशे सत्तावन्न रोजी, म्हणजे एबेलला अटक झाल्यापासून दीड महिन्याने, त्याच्यावर खटला भरण्यात आला. (१) रशियाला सैनिक गुपिते कळविण्याचे कारस्थान रचणे, (२) अशी गुपिते मिळविण्याचा बकायदा कट करणे आणि (३) अमेरिकेत बेकायदेशीर प्रवेश करणे व बनावट अमेरिकन नागरिकत्व धारण करणे, असे तीन आरोप त्याच्यावर ठेवण्यात आले होते. पहिल्या आरोपाला, तो सिद्ध झाल्यास, कमाल शिक्षा देहान्ताची होती. दुसऱ्या व तिसऱ्या आरोपांना कमाल शिक्षा अनुक्रमे दहा व पाच वर्षांच्या बंदिवासाची होती.

खटला चालविण्यासाठी एखादा वकील शोधणे ही एबेलची सर्वांत निकडीची गरज होती. कम्युनिस्ट पक्षाच्या वकिलाने, कार्यव्यग्रतेच्या सबबीखाली खटला चालविण्यास नकार दिला. तेव्हा वकिलासाठी एबेलने ब्रुकलिन बार असोसिएनलाच विनंती केली. हेराच्या बाबतीतदेखील न्यायाची कदर जाते हे श्रेय अमेरिकेतील लोकशाहीपद्धतीचे आहे, असे एबेलला मोठ्या अभिमानाने सांगण्यात आले.

## सहकैद्यांशी दोस्ती

आपला खटला अत्यंत निःपक्षपातीपणाने चालवण्यात आला आणि वकिलाने आपल्या बचावाची शर्थ केली, असे उद्गार खटला संपल्यावर एबेलने काढले होते. परंतु खटला संपल्यावर, त्याच्या वकिलाने, याच परिस्थितीत रशियाच्या हाती लागलेल्या अमेरिकन हेराचे भवितव्य काय झाले असते याची कल्पना करा, असे चेष्टेने सुचविले तेव्हा एबेलने निर्विकारपणे उत्तर दिले, "आपली घटना काही मी बनवलेली नाही."

एबेलला तुरुंगात पाठवताना न्यायखाते आणि पोलिसखाते थोडेसे काळजीत पडले होते. तुरुंगात इतर कैदी एबेलशी कसे वागतील, याची त्यांना चिंता वाटत होती. कारण गुन्हेगार असले तरी ते देशाभिमानाला पारखे झालेले नव्हते; त्यामुळे कम्युनिस्टांइतके त्यांचे दुसऱ्या कोणाशीच वैर नव्हते. कम्युनिस्टांना तुरुंगात इतर कैद्यांनी त्रास दिल्याची, आणि प्रसंगी जीवे मारल्याचीही उदाहरणे अमेरिकेत काही ठिकाणी घडली होती! आणि एबेल साधा कम्युनिस्ट नव्हता तर कारस्थानपटू कम्युनिस्ट हेर होता.

ज्या कैद्याबरोबर एबेलला कोठडीची भागीदारी पत्करावी लागली त्या कैद्याचे

एबेलला पाहिल्याबरोबर पित्त खवळले. त्याने आपली कोठडी बदलून मागितली. परंतु तुरुंगाधिकाऱ्यांनी त्याची मागणी फेटाळून लावली. तेव्हा त्याने एबेलशी असहकार पुकारला. दर दिवशी सकाळी, एबेलच्या अस्तित्वामुळे मलीन झालेली ती कोठडी तो स्वच्छ करीत बसे. वेड लागल्यासारखा तासन तास तो कोठडीची जमीन घासत राही. लेडी मॅकबेथ आपल्या हातावरील रक्तकलंक धुऊन काढण्याचा जसा पुन्हापुन्हा प्रयत्न करते। तशी कम्युनिस्ट एबेलच्या वास्तव्यामुळे कलंकित झालेली कोठडी धुण्याचा त्याचा प्रयत्न असे.

परंतु यथाकाल त्या कैद्याचा निग्रह संपुष्टात आला म्हणा, किंवा आपला हा सहकैदी कम्युनिस्ट असला तरी तितका काही वाईट मनुष्य नाही अशी त्याची खात्री पटल्यामुळे म्हणा, पण त्याची आणि एबेलची चांगलीच मैत्री जमली. बाकीच्या कैद्यांनीदेखील एबेलच्या मित्राचे तत्परतेने अनुकरण केले.

जिनीव्हा कराराप्रमाणे उच्च दर्जाच्या युद्धकैद्यांना जी वागणूक द्यावी असे ठरले होते ती एबेलला बरोबरच्या कैद्यांकडून सहज अनुभवायला मिळाली. ते त्याला 'कर्नल' म्हणून संबोधीत. उलटपक्षी एबेलने आपल्या सहकैद्याला फ्रेंच भाषा शिकवायला सुरुवात केली. अल्पावधीत एबेलच्या उत्साही शिष्याने पुष्कळच प्रगती केली.

एबेल स्वत: भरपूर वाचत असे. आपल्या हेरगिरीच्या व्यवसायाबाबतचे काही लिखाण त्याला आवडेल असे वाटून त्याच्या वकिलाने—जेम्स ब्रिट डोनोवन याने-युद्धकालीन जर्मन हेरगिरीची माहिती देणारे एक वेचक पुस्तक त्याला वाचायला देऊ केले. सुरुवातीला हे पुस्तक एबेलला वाचायला द्यायला तुरुंगाधिकाऱ्यांचा विरोध होता. गुन्हेगाराला आपल्या गुन्ह्याकडे पुन्हा वळवणारे कोणतेही लिखाण वाचायला दिले जाऊ नये, असा तुरुंगाचा नियम होता. परंतु एबेलसारख्या मुरलेल्या रशियन हेरावर त्या अद्भुतरम्य पुस्तकाचा करमणुकीपलीकडे काही परिणाम होणे शक्य नाही, असा डोनोवनने केलेला युक्तिवाद अखेरीस तुरुंगाधिकाऱ्यांना पटून ते पुस्तक एबेलला वाचायला दिले गेले. या काळात एबेलला आवडलेले आणखी एक पुस्तक म्हणजे क्वेंटिन रेनॉल्ड्सने सांगितलेली विली सुटॉन या शर्विलकाची चित्तथरारक चरित्रकथा. सावजासारखी अवस्था झालेल्या माणसाची मन:स्थिती कशी होते, सार्वजनिक बागेत बसून सहज ऐकू येणारी वृक्षपर्णांची निरागस सळसळदेखील त्याच्या अंत:करणात भीतीचे काहूर कसे उठवते, याचे प्रत्ययकारी चित्रण त्या कथेत केले होते.

## हिंमतबहाद्दर वकील

चौदा ऑक्टोबर रोजी एबेलचा खटला उभा राहणार होता. त्यामुळे आता दररोज जेम्स डोनोवन एबेलशी विचारविनिमय करून बचावाची सिद्धता करू लागला होता. ब्रुकलिन बार असोसिएशनने एबेलच्या वकिलाची निवड नि:पक्षपातीपणाने

आणि त्याला खराखरा न्याय मिळावा या बुद्धीने केली होती. वकील जेम्स डोनोवन हार्वर्ड लॉ स्कूलसारख्या नामांकित शिक्षणसंस्थेचा पदवीधर होता आणि वयाने तो लहान म्हणजे अवघा एकेचाळीस वर्षांचा असला तरी हेर–प्रतिहेरांच्या खटल्यांसंबंधीचा त्याचा अनुभव दांडगा होता. जगप्रसिद्ध न्युरेम्बर्ग खटल्यात त्याने भाग घेतला होता एवढे सांगितले म्हणजे त्याच्या योग्यतेबद्दल सहज खात्री पटेल.

न्यूयॉर्कमधील एका प्रतिष्ठित वकिली व्यवसायाचा तो भागीदार होता. आणि त्याची वैयक्तिक ख्याती इतकी मोठी होती की प्रसिद्धीसाठी एबेलच्या खटल्याचा उपयोग करण्याची गरज त्याला नव्हती. खरे तर एबेलच्या खटल्यामुळे त्याला आर्थिक आणि मानसिक जाचच झाला. या खटल्यासाठी त्याने तीन वर्षे जिवाचे रान केले. त्या प्रकारच्या मेहनतीबद्दल दुसऱ्या एखाद्या खटल्यात त्याला दोन–अडीच लाख डॉलर्सची प्राप्ती सहज झाली असती. एबेलच्या खटल्यात त्याला अवघे दहा हजार डॉलर्स मिळाले. मॅकार्थीने कम्युनिस्टांच्या केलेल्या ससेहोलपटीची आठवण एकोणिसशे सत्तावन्न साली ताजी होती. लोकांचा त्या कम्युनिस्ट–उच्छेदाला पाठिंबा होता. त्यामुळे एबेलसारख्या रशियन हेराचे वकीलपत्र घेणारा जेम्स डोनोवनसुद्धा लोकदृष्टीने अंशत: गुन्हेगार होता. त्यामुळे टेलिफोनवरून डोनोवनला इतक्या धमक्या दिल्या गेल्या की शेवटी कंटाळून त्याने स्वेच्छेने टेलिफोन बंद करून घेतला. शाळेत जाणाऱ्या त्याच्या मुलामुलींना दैनंदिन मित्रमैत्रिणींचे विषारी टोमणे ऐकावे लागले. वकिली व्यवसायातील त्याच्या भागीदारांना डोनोवनने स्वीकारलेल्या खटल्यामुळे, आपल्या व्यवसायावर गंडांतर येईल अशी भीती वाटू लागली.

खुद्द डोनोवनला या जनता–विद्वेषाचे आश्चर्य वाटले. या विद्वेषाला शह देण्यासाठी, डोनोवनने खटला चालू असताना, दुसऱ्या महायुद्धात कमावलेले 'लिजन ऑफ् मेरिट' हे पदक सतत अंगावर वागवले. लोकमताचे एक सोडा, पण तो खटलादेखील अत्यंत गुंतागुंतीचा होता. शिवाय अमेरिकन गुप्तहेरखात्याला न सांगितलेली कोणतीही माहिती डोनोवनला देण्याची एबेलची तयारी नव्हती.


मात्र एबेलने आपल्या वकिलाबद्दल कसलाही आकस मनात बाळगला नाही. उलट, खटल्यानंतर वर्तमानपत्रांना दिलेल्या मुलाखतीत त्याने डोनोवनच्या कार्यक्षमतेबद्दल आणि प्रामाणिक हितबुद्धीबद्दल निखळ प्रशंसोद्गार काढले. डोनोवनला आपली एक कलाकृती भेट देऊन एबेलने त्याच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली. एबेलच्या दृष्टीने, बाह्य जगताशी संपर्क साधण्याचा डोनोवन हा दुवा होता. सुरुवातीसुरुवातीला नाही म्हटले तरी एबेलचे वागणे संकोची आणि औपचारिक असे; पण कालांतराने आपोआप त्या दोघांत हार्दिक स्नेहभाव निर्माण झाला.

एबेलसारख्या एका रशियन हेराचे एवढे स्तोम माजवणे अनेकांना पसंत नव्हते. खटला भरण्याचे आणि गुन्हा सिद्ध करत बसण्याचे घटनात्मक सव्यापसव्य करण्या-

पेक्षा सरळ त्याला सुळावर चढवावे, असे त्यांना वाटत होते. या आततायी लोकमताला डोनोवनने पुढीलप्रमाणे उत्तर दिले : " एबेल विदेशी असामी आहे, आणि त्याच्यावर रशियासाठी हेरगिरी केल्याचा गंभीर आरोप आहे. आपले घटनांतर्गत संकेत अशा व्यक्तीलाही न्याय्य संरक्षण देतात, ही गोष्ट अप्रगल्भांना गैरवाजवी इतकेच नव्हे तर आत्मघातकीपणाची वाटेल. परंतु स्वातंत्र्यप्रिय अमेरिकन समाजाच्या अधिष्ठानी असलेल्या सिद्धांतांना ऐतिहासिक परंपरा आहे. येथील भूमीत ते स्वाभाविकच निर्माण झाले आहेत. आणि या स्वतंत्र समाजाने जर आपल्या पूज्य नीतिसिद्धांतांशी प्रतारणा केली तर इतरेजनांना कोठल्याच समाजव्यवस्थेचे आकर्षण उरणार नाही."

## अभूतपूर्व खटला

एबेलवरील खटला अनेक दृष्टींनी अभूतपूर्व होता. अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच एका रशियन नागरिकावर हेरगिरीच्या आरोपावरून खटला भरण्यात


बृहन्मुंबईकरिता वितरक
**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २
बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक
**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

येऊन त्याला शिक्षा झाली होती. त्याशिवाय ज्याच्यावर रोझेनबर्ग न्यायसिद्धांतानुसार खटला भरण्यात आला होता, असा एबेल हा पहिलाच परदेशी इसम होता. या रोझेनबर्ग सिद्धांतान्वये, ज्या देशाशी अमेरिकेचे संबंध शांततेचे आहेत, त्या देशातील नागरिकाने अमेरिकेविरुद्ध केलेल्या आणि शाबित झालेल्या हेरगिरीबद्दल त्याला देहांताची सजा फर्मावण्याची तरतूद झाली होती.

आणखी एक विलक्षण योगायोग असा की, ज्या ब्रुकलिन इमारतीमध्ये एबेलचा स्टुडिओ होता, तिच्यात आणि न्यायालयात फारच थोडे अंतर होते. एका इमारतीमधून दुसरी इमारत सहज दिसत होती.

खुद्द आरोपीने आपल्या बचावासाठी एक शब्ददेखील उच्चारला नाही, ही गोष्टदेखील अभूतपूर्वच म्हटली पाहिजे. एबेलला कसल्याही मदतीची अपेक्षा नव्हती. त्याने हेरगिरीचा अपराध केला होता. त्याबद्दल कसलेही शासन भोगण्याची त्याची तयारी होती. त्यामुळे त्याने कसलेही बचावात्मक निवेदन केले नाही, आणि डोनोवनने त्याच्या वतीने कोणाची साक्षही काढली नाही. सरकारी साक्षीदार अनेक होते; परंतु त्यांच्या उलटतपासणीत असे सिद्ध झाले आहे की, त्यांतील बहुतेकजण एबेलला एक चित्रकार म्हणून ओळखत होते, त्याची चित्रकला लक्षणीय आहे, असे त्यांचे मत होते, आणि चित्रकारांच्या वर्तुळात त्याला बऱ्यापैकी पत होती. या उलटतपासणीत उघड होणाऱ्या गोष्टींची सत्यासत्यता निश्चित करण्यासाठीदेखील एबेलने तोंड उघडले नाही. कारण स्वतःकडे अल्पमात्रदेखील लक्ष वेधून घेणे हे हेरगिरीच्या व्यवसायातील महत्पाप आहे, हे एबेलसारखा मुरब्बी हेर जाणत थोडेच नव्हता ? आणि आपल्या अशिलाला उलटतपासणीच्या तोंडी देणे धोक्याचे आहे, हे डोनोवनलासुद्धा पटले होते.

अशा एकाहून एक कुतूहलजनक वैशिष्ट्यांमुळे एबेल–खटल्याने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. वर्तमानपत्रकर्त्यांना तर ती पर्वणीच वाटली. देशोदेशींच्या वर्तमानपत्रे–मासिकांनी आपापले तज्ज्ञ वार्ताहर पाठवले होते. 'लाईफ' मासिकाने तर वार्ताहरांबरोबर एक रेखाचित्रकारही, न्यायालयात छायाचित्रे घेण्यास असलेली मनाई लक्षात घेऊन, पाठवून दिला होता. रशियाचा अपवाद वगळता जगातील प्रत्येक देशात एबेल–खटल्याची हकीकत वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर झळकली.

खटला चालू असताना एबेल प्रत्येकाचे बोलणे अवधानपूर्वक ऐकत असे. त्याने **शाईने काही व्यक्तींची व प्रसंगांची रेखाटनेदेखील केली.** 'लाईफ'च्या कलावंताने काढलेल्या रेखाटनांपेक्षा ती कमी कुशल पण अधिक ठसठशीत होती.

खटल्याच्या सुरुवातीलाच सरकारने आपला हुकमी साक्षीदार न्यायालयापुढे आणला. तोपर्यंत पाळलेल्या आत्यंतिक गुप्ततेमुळे या माफीच्या साक्षीदाराभोवती गूढतेचे एक वलय निर्माण झाले होते. रायनो हेहानेन असे त्याचे नाव होते. त्यानेच फितुर होऊन एबेलचा ठावठिकाणा सांगितला होता.



खटला चालू असताना

एकोणिसशे बावन्न साली एबेलला मदतीची आवश्यकता वाटल्यामुळे, रशियन गुप्तहेरखात्याने रायनो हेहानेन याची एबेलचा मदतनीस म्हणून अमेरिकेत पाठवणी केली होती. एबेलच्या कार्यक्षमतेच्या कठीण कसोटीला हेहानेन उतरू शकला नाही. म्हणून एकोणिसशे सत्तावन्नच्या एप्रिलमध्ये त्याला विश्रांतीसाठी रशियात परत पाठविण्याचे ठरले. नालायक हेराला देण्यात येणाऱ्या सक्तीच्या 'विश्रांती 'चा अर्थ हेहानेनला अचूक ठाऊक असावा. कारण, प्रवासातील पहिल्या टप्प्यावर म्हणजे पॅरिसला पोहोचताच हेहानेन सरळ अमेरिकन वकिलातीत गेला. चार मे रोजी तो न्यूयॉर्कला परतला आणि एबेलसारखे भले मोठे सावज त्याने अमेरिकन गुप्तहेर-खात्याच्या जाळयात लोटले.


## क्विबेक संदेश

न्यायालयात येताना हेहानेनने काळा चष्मा चढवला होता. त्याने केस आणि मिशा रंगवलेल्या होत्या. आपल्या विशिष्ट लकबीने त्याने एबेलची आणि स्वतःची हेरगिरीची कृत्ये, मायक्रो फिल्मसवरील संदेशांचा उपयोग, गुप्त संदेश ठेवण्याच्या जागा आणि मॉस्कोहून येणाऱ्या आदेशांची अंमलबजावणी, यांची साद्यंत हकीकत सांगितली. त्याच्या साक्षीतील महत्त्वाचा पुरावा म्हणजे ' क्विबेक संदेशा 'ची कथा होय. ' क्विबेक ' हे रॉय ऱ्होड्स या अमेरिकन नागरिकाचे सांकेतिक नाव होते.

तुमच्या मुलाच्या हुशारीला आणि उत्साहाला साजेसं उत्तेजन देणारे तुम्हीच. त्याचं व्यक्तिमत्व चहू दिशांनी फुलू द्या. त्याचं शिक्षण अत्यंत महत्वाचं आहे.

त्याच्या शिक्षणाची निश्चित तरतूद करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विमा! ठराविक वेळी ठरलेले पैसे तुमच्या मुलाला मिळतील व त्याच्या शिक्षणात कधीही खंड पडणार नाही. मग तुम्ही असा वा नसा. आजच विमा उतरवून तुमच्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी आमच्यावर सोपवा.

## याच्या शिक्षणाची वाढती जबाबदारी आमची.




## आयुर्विम्याला पर्याय नाही!

विम्याच्या अनेक योजना आहेत. लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा एजंट आपल्याला योग्य अशी विमा योजना सुचवील. आजच त्याला भेटा.

अमेरिकेच्या रशियातील सैनिकी कार्यालयात एकोणिसशे बावन्न-त्रेपन्नमध्ये दीड वर्ष तो नोकरीला होता. त्या अवधीत त्याने, भरपूर रकमांच्या बदल्यात, रशियन गुप्तहेरखात्याला अमेरिकेची काही तथाकथित सैनिकी गुपिते विकली होती ! ऱ्होड्स आता अमेरिकेत नोकरी करत होता, आपला भाऊ अणुकेंद्रात नोकरीला असल्याची थाप त्याने रशियन गुप्तहेरखात्याला मारली होती. त्यांनी ऱ्होड्सवर संपूर्ण विश्वास टाकला होता. या ऱ्होड्सला गाठून त्याच्याकडून गुप्त माहिती मिळवून ती मॉस्कोला प्रक्षेपित करण्याची महत्त्वाची कामगिरी एबेल आणि हेहानेन या द्वयींवर रशियन गुप्तहेरखात्याने टाकली होती. परंतु या दोघांना ऱ्होड्सचा मुळी पत्ताच लागला नाही.

एबेलचा उजवा हात म्हणून हेहानेनने दिलेल्या या महत्त्वपूर्ण जबानीची उलट-तपासणी करून ती खोटी आहे असे दाखवण्याचा प्रयत्न डोनोवनने केला. अशा प्रकारच्या खटल्यामध्ये, खटला प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी, फिर्यादीपक्षाच्या साक्षीदारांची भेट घेण्याचा जो अधिकार प्रतिवादीपक्षाला असतो त्याचा उपयोग करून घेऊन डोनोवन हेहानेनला भेटला होता. या भेटीत हेहानेन तोंडात मिठाची गुळणी घेऊन बसला होता; परंतु डोनोवनने नंतर स्मरणाने त्याचे रेखाचित्र काढले होते. ते त्याने एका खासगी गुप्तचराच्या स्वाधीन केले होते. त्याने त्या रेखाचित्राच्या साहाय्याने हेहानेनच्या अमेरिकेतील वास्तव्याची तपशीलवार माहिती मिळवली होती. ही माहिती एबेलचा ' उजवा हात ' म्हणून वावरणाऱ्या माणसाला शोभणारी नव्हती ! एबेल या आपल्या सहकाऱ्यावर नाराज झाला होता तो उगाच नव्हे.

डोनोवनने हेहानेनचे चारित्र्य आणि हेर म्हणून त्याची योग्यता यांवर प्रखर हल्ला चढवला. एबेलसारख्या हिकमती हेराचा ' उजवा हात ' इतका पांगळा कसा असू शकेल असा डोनोवनचा सवाल होता. हेहानेन स्वतःच स्वतःला एबेलचा ' उजवा हात ' म्हणवूनच घेत नसेल ना, अशी शंका त्याने व्यक्त केली. हेहानेनच्या जबानीच्या संदर्भात एक विसंगतीदेखील त्याने दाखवून दिली. सरकारी पक्षाचा प्रमुख साक्षीदार या नात्याने जबानी देताना आपण गेली पाच वर्षे रशियासाठी हेरगिरी करत होतो असे निवेदन हेहानेनने केले होते; तर रशियामधील सक्तीच्या रजेला भिऊन जाऊन अमेरिकन पोलिसांच्या स्वाधीन झाल्यानंतर केलेल्या निवेदनात त्याने आपण हेरगिरीत सामील नसल्याचे आणि आपल्याला गेल्या पाच वर्षांत कोणाहीकडून कसलीही गुप्त माहिती कळलेली नाही, असे सांगितले होते. (या विसंगतीचा उलगडा कधी झाला नाही. आणि हेरगिरीतील त्याच्या वाट्या-बद्दल हेहानेनवर कधीच आरोप ठेवण्यात आला नाही.)

डोनोवनच्या मते हेहानेनची अवस्था दोन दरडीवर पाय ठेवलेल्या माणसा-सारखी झाली होती. रशिया आणि अमेरिका दोघांनीही तुच्छ मानलेल्या या बेइमानी माणसाने दयेची भीक लाभावी म्हणून जास्तीत जास्त माणसांना आपल्या

गुन्हेगारीत भागीदार करण्याचा आणि आपल्याजवळची माहिती अत्यंत महत्त्वाची आहे असे भासवण्याचा प्रयत्न चालवला होता.

हेहानेनच्या सनसनाटी जबानीनंतर खटल्याने काही वेगळेच रंग दाखवले. मॉस्को येथे अमेरिकन दूतावासात नोकरीला असताना आपण खरोखरच 'काही खोटी, काही खरी' गुप्त माहिती रशियनांना विकली होती, असे सार्जंट ऱ्होड्सने निलाजरेपणाने सांगितले. ऱ्होड्सला जणू आपण केलेल्या कृत्याचा थोडासा अभिमान वाटत होता. डोनोवनने मात्र 'पैशाकरता आपले देशहित विकून ते निर्लज्जपणे कबूल करणारा अमेरिकेच्या इतिहासातील पहिला सैनिक' अशी सार्जंट ऱ्होड्सची खरमरीत निर्भर्त्सना केली. खटल्याच्या कालावधीतील त्याचे बेशरम वर्तन पाहून तो सार्जंटच्या हुद्यापर्यंत कसा चढला याचेच अनेकांना आश्चर्य वाटले होते. एकवीस फेब्रुवारी एकोणिसशे अठ्ठावन्न रोजी त्याच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात यऊन त्याची सैन्यातून हकालपट्टी करण्यात आली आणि त्याला पाच वर्षांकरता तुरुंगात खडी फोडण्यासाठी धाडण्यात आले. सरकारी पक्षाने अमेरिकन गुप्तहेरखात्याच्या काही अधिकाऱ्यांच्या साक्षी काढल्या होत्या. अटक करण्यापूर्वी अनेक दिवस आपण एबेलवर कशी पाळत ठेवली, त्याला कशी अटक केली, गुन्हा शाबीत करणाऱ्या कोणकोणत्या वस्तू त्याच्याकडे सापडल्या ते त्यांनी सविस्तर सांगितले.

## हे चित्र आणि ते चित्र

खटल्याच्या अखेरीला डोनोवनने एबेलच्या कुटुंबियांनी त्याला लिहिलेली त्याच्या राहत्या खोलीत सापडलेली काही पत्रे न्यायासनाला सादर केली. त्याच्या पत्नीकडून आणि मुलीकडून आलेल्या या पत्रांमुळे, खटल्यामध्ये प्रथमच एबेलचे एक माणूस म्हणून दर्शन घडत होते. कागदाच्या बाहुल्या बनवाव्या तितक्या सहजपणे अनेकविध भूमिकांत वावरणारा हिकमती रशियन हेर असेच एबेलचे स्वरूप आतापर्यंत रेखाटले गेले होते. त्यामुळे या पत्रांतून प्रतीत होणारी त्याची सर्वसामान्य माणसाची प्रतिमा लोकांना एक वेगळाच धक्का देऊन गेली.

आपल्या पत्रांतून एबेलच्या पत्नीने त्याच्या सुरक्षिततेबद्दल आणि प्रकृतीबद्दल पुन्हा पुन्हा काळजी व्यक्त केली होती. तर त्याच्या पंचवीस वर्षांच्या कन्येने आपल्या विवाहाबद्दल आणि नव्या नोकरीबद्दल वार्ता कळवून पुढे आपला पती वडिलांची बरोबरी करू शकणार नाही अशी कबुली देऊन वडिलांबद्दलचा आपला प्रेमादर व्यक्त केला होता. अमेरिकेत मुक्काम ठोकून जीव धोक्यात घालणाऱ्या या रशियन हेराला, त्याने पाठवलेल्या फुलझाडांच्या वाढीची तपशीलवार माहिती, त्याच्या अपचनाबद्दलची काळजी, त्याचे घरात पडलेले गिटार पाहून त्याची तीव्रतेने आठवण येत असे, असे सांगणारी पत्नीची करुण कबुली, घरच्या कुत्र्याची खुशाली, जावयाच्या रूपाने घरात एका मुलाचीच भर पडली असे त्याचे कौतुक, हिवाळा फार कडक होता अशी तक्रार, वाढदिवसाबद्दलच्या हार्दिक शुभेच्छा इत्यादी घरगुती

गोष्टी सरळ सांगणारी भाबडी पत्रे त्याच्या पत्नीकडून आणि मुलीकडून येत होती हे विलक्षणच होते. या पत्रांतून उभे राहणारे कुटुंबवत्सल एबेलचे चित्र कोठे आणि सरकारी पुराव्यांतून दिसणारे वेडर, हिकमती हेराचे चित्र कोठे ? एखाद्या निर्ढावलेल्या खुन्याला फुलपाखरे गोळा करण्याचा छंद असावा, त्यातलाच प्रकार होता तो. न्यायालयात वाचल्या गेलेल्या त्या पत्रांतील जिव्हाळा, एबेलला आपल्या कुटुंबियांना कधी भेटणेही अशक्य होईल या जाणिवेने अधिकच हृदयस्पर्शी झाला होता. या प्रदीर्घ खटल्यामध्ये फक्त एकदा, पत्रवाचनानंतर, एबेल भावनावश झाला होता; एरवी त्याचे वागणे विकारशून्य होते.

एबेलच्या व्यक्तिमत्वातील हृद्य बाजूवर प्रकाश टाकण्यापलीकडे त्या पत्रातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होत होती. ती म्हणजे एकोणिसशे पंचावन्न-छप्पन्नमध्ये एबेल रशियाला जाऊन पुन्हा अमेरिकेला परतला होता.

## हेरगिरीतील कौशल्य

सरकारच्या वतीने खटल्याचे महत्त्व स्पष्ट करताना एबेलच्या हेरगिरीतील कौशल्याचा ठामून उल्लेख करण्यात आला होता. सरकारी वकील म्हणाला होता, " रशियाचा एबेल हा हुकमी हेर होता. एबेल आपण होऊन या जीवघेण्या खेळात सामील झाला होता. त्याला आणि त्याच्या कुटुंबालादेखील या खेळाचे नियम पक्के ठाऊक होते. " एबेलला हे नियम पक्के ठाऊक होते यात संशय नाही. एकदा पकडला गेल्यानंतर हेर एकाकी असतो हा या खेळातील पहिला नियम होता. मॉस्कोला अकस्मात ' एबेल ' या नावाची विस्मृती झाली होती !

मौजेची गोष्ट अशी की एबेल हा कसलेला धंदेवाईक रशियन हेर होता हीच गोष्ट डोनोवनने एका संदर्भात बचावासाठी ठामून सांगितली ! एबेल हेर असेल तर तो एक असामान्य हेर आहे या बाबतीत वादी–प्रतिवादींचे अगदी एकमत होते.

" आपण असं गृहीत धरू. " डोनोवन आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण करताना म्हणाला, " सरकारी पक्षानं रेखाटलेलं एबेलचं चित्र अचूक आहे. तसं असेल तर हे कबूल करणं भाग आहे की या माणसानं देशासाठी अत्यंत धोकादायक कामगिरी अंगावर घेतली होती. आपल्या देशात, अशा कामगिरीवर सैन्यदलातल्या अत्यंत शूर आणि डोकेबाज माणसाचीच योजना करतात. " ऱ्होड्स आणि हेहानेन यांच्या, एबेलच्या कौशल्याला कमीपणा आणणाऱ्या, जबान्या पोकळ आहेत हे सिद्ध करण्यासाठी डोनोवनने वरील मुद्दा मांडला होता. ऱ्होड्स आणि हेहानेन या दोन खोटारड्या आणि भंपक माणसांनी एबेलसारख्या निर्ढावलेल्या आणि हिकमती हेराला आपल्या जबान्यांत अगदीच खालच्या पातळीवर आणले असून, त्यात दिसणारे एबेलचे चित्र विकृत आणि अनुभवाचा आधार नसलेले आहे, असे डोनोवनने सांगितले.

सरकारी पक्षाने एबेलचा हेरगिरीच्या क्षेत्रातील मोठेपणा मान्य केला होता.

पण त्याचाच आधार घेऊन बचावपक्षाने सादर केलेला पत्रांचा पुरावा आरोपीचे मूल्यमापन करताना विचारात घेतला जाऊ नये, असा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला. कारण एक जबाबदार, कनवाळू कुटुंबप्रमुख म्हणून नव्हे तर एक अत्यंत धोकेबाज रशियन हेर म्हणूनच एबेलचा विचार न्यायालयाने करावा, अशी भूमिका त्यांनी घेतली.

## एबेल दोषी ठरला

तेवीस ऑक्टोबर एकोणिसशे सत्तावन्न रोजी दुपारी बारा वाजून पंधरा मिनिटांनी ज्यूरीचे समासद निर्णयनिश्चितीसाठी पडद्याआड गेले. ज्यूरीप्रमुख जॉन डब्लिन याने नंतर सांगितल्याप्रमाणे, साऱ्या समासदांना एक माणूस म्हणून एबेलबद्दल सहानुभूती वाटत होती. परंतु एक हेर म्हणूनच त्याचा विचार करणे त्यांना आवश्यक वाटले. त्या दृष्टीने एबेलविरुद्ध भक्कम पुरावा उपलब्ध झाला होता, अशी त्यांची सर्वसाधारण प्रतिक्रिया होती. मतदान गुप्तपणे घेण्यात आले. निर्णय पाहिला तेव्हा बारा समासदांपैकी एक समासद असा निघाला होता की त्याने आरोपी ' निर्दोषी ' असल्याचे मत नोंदवले होते ! या कल्पनेवर आधारलेले ' ट्वेल्व्ह अँग्री मेन ' हे नाटक विलक्षण गाजले. मात्र नाटकात कथानक वेगळे आहे. आणि शिवाय ' निर्दोषी ' असे मत नोंदवणारा एकमेव सभासद चिकाटीने, विचारविनिमय करून, युक्तिवाद करून बाकीच्या अकरा जणांचे मन वळवतो आणि आरोपीची अन्यायाने फासात अडकलेली मान मुक्त करतो ! एबेलच्या खटल्यातील ' निर्दोषी ' मत नोंदवणाऱ्या एकाकी सदस्याने असे काही केले नाही. फक्त त्याला, महत्त्वाची सैनिकी गुपिते रशियाला पाठवण्याचा कट एबेलने रचला होता हे पुरतेपणी सिद्ध झाले नाही, असे वाटत होते. सरकारी पक्षाने पुराव्यादाखल सादर केलेल्या ' क्विबेक संदेश ' आणि इतर संशयास्पद वस्तूंची त्याने पुन्हा एकदा बारकाईने पाहणी केली. मग मात्र आपले ' निर्दोषी ' हे मत अयोग्य असल्याचे कबूल करून आरोपी ' दोषी ' आहे असाच निर्णय इतरांप्रमाणे त्याने दिला. ज्यूरीच्या सभासदांना एबेलबद्दल सहानुभूती वाटत होती; पण त्यामुळे एबेलने केलेल्या हेरकृत्यातील गुन्हेगारीला शह बसणे शक्य नव्हते. त्यांच्यापैकी प्रत्येकाला हेहानेन आणि ऱ्होड्स यांच्याबद्दल तुच्छता वाटत होती; पण त्यांनी दिलेल्या जबान्या उडवून लावण्यासारख्या नाहीत, हेही त्यांना मान्य करणे भागच होते.

डब्लिनने म्हटल्याप्रमाणे एबेलच्या चारित्र्याची आणि कीर्तीची ग्वाही देणाऱ्या साक्षीदारांच्या साक्षींचा फारसा प्रभाव पडणे शक्य नव्हते. कारण खरे म्हणजे ती ग्वाही एका वेगळ्या व्यक्तीबद्दल होती ! त्यांना माहीत असलेल्या संकोची, सरळ स्वभावाच्या, मनमिळाऊ गोल्डफुस नावाच्या चित्रकाराबद्दलची ती ग्वाही होती ! त्यांना बिचाऱ्यांना एबेल नावाच्या एका धूर्त आणि हिकमती हेराबद्दल काहीच माहिती नव्हती. एबेलच्या दुहेरी जीवनामुळे अशी परिस्थिती निर्माण होणे अपरिहार्य होते.

बचावपक्षाने बचावाची कौतुकास्पद शर्थ केली अशी कबुली ज्यूरीच्या सभासदांनी दिली. परंतु एबेलच्या विरुद्ध पुरावा निर्णायक होता. परिणामतः सभासदांनी एकमताने एबेलला तिन्ही गुन्ह्यांबद्दल दोषी ठरवले. निकाल ऐकण्यासाठी एबेल उभा राहिला. निकाल जाहीर होताच न्यायालयात गडबड उडाली. एबलला त्वरेने बाहेर नेण्यात आले. जाताना त्याची मान ताठ होती. पराभवाचे कसलेही चिन्ह त्याच्या ठिकाणी दृग्गोचर होत नव्हते !

## डोनोवनची भविष्यवाणी

न्यायाधीशांनी प्रत्यक्ष निकाल द्यायला नोव्हेंबरची पंधरा तारीख उजाडली. दरम्यान डोनोवनने न्यायाधीश बायर्सना एक पत्र पाठवले होते. उत्तरकालातील घटनाक्रम पाहता त्या पत्राला एखाद्या शास्त्रपूत भाकिताची योग्यता लाभली. ज्यूरीच्या सभासदांनी एकमताने दिलेला निर्णय मान्य करून एबेलला देहान्ताची सजा मात्र का देण्यात येऊ नये, याबद्दलची कारणमीमांसा डोनोवनने त्या पत्रात केली होती. त्याच्या मते, एखाद्या गुन्ह्यासाठी देहान्ताची सजा देताना, इतर संभाव्य गुन्हेगारांना दहशत बसावी, तसा गुन्हा पुन्हा केला जाऊ नये, हा हेतू असतो. परंतु एबेलच्या शिक्षेच्या बाबतीत तसा विचार करणे युक्त नव्हते. कारण एका हेराला देहान्ताची सजा झाली एवढ्याकरता रशियन हेरगिरीचे प्रयत्न थोडेच थंडावणार होते ? शिवाय इकडे एबेलला देहान्ताची सजा देताना अमेरिकन सरकारने त्याच्या देशातील आपल्या हस्तकांच्या भवितव्याचा विचार करणेही जरुरीचे होते. डोनोवनने दिलेली ही सूचना उघडच रशियामध्ये चालणाऱ्या अमेरिकन हेरगिरीच्या संदर्भात केलेली होती. एबेलने अमेरिकेशी तोपर्यंत कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नव्हते ही गोष्ट खरी होती; तरीही आणखी काही काळ त्याला जिवंत ठेवणे देशहिताच्या दृष्टीने फायद्याचे होते. कोणी सांगावे, कदाचित काही काळानंतर त्याने सहकार्य दिलेही असते.

डोनोवनने पुढे म्हटले होते, " अशीही एक शक्यता या संदर्भात लक्षात घ्यायला हरकत नाही की उद्या समान दर्जाचा एखादा अमेरिकन हेर रशियात वा रशियाप्रेमी देशात पकडला जाईल–अशा वेळी या दोन कैद्यांची अदलाबदल करणे अमेरिकेच्या दृष्टीने अत्यंत हितावह ठरेल ! "...आणि आश्चर्य असे की, खरोखरच एकोणिसशे साठ सालच्या मे महिन्यात अमेरिकन हेर फ्रॅन्सिस गॅरी पॉवर्सचे यू-टू हे विमान रशियात पाडण्यात आले, इतकेच नव्हे तर पुढे पॉवर्स आणि एबेल यांची अदलाबदल करण्यात आली ! डोनोवनचे भाकित अक्षरशः खरे ठरले होते !

एबेलला किती मुदतीची शिक्षा देण्यात यावी या बाबतीत विचार मांडताना डोनोवनने, फ्रान्समध्ये हेरगिरी करणाऱ्या रशियन हेरांना, एकोणिसशे वीसच्या सुमारास, फ्रेंच न्यायालये सुमारे तीन वर्षांची सजा फर्मावीत, या गोष्टीचे स्मरण करून देऊन शिवाय एबेल तब्बल पंचावन्न वर्षांचा होता, त्याने आपल्या देशाची

इमानेइतबारे सेवा केली होती, आणि तत्त्वत: त्या देशाशी अमेरिकेचे संबंध शांततेचे होते या गोष्टीही लक्षात घ्यायला हरकत नाही, असे प्रतिपादन केले होते.

## तीस वर्षे तुरुंगवास

निकाल देताना न्यायाधीश बायर्सनी डोनोवनच्या पत्राचा उल्लेख केला. पण त्या बाबतीत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले, " एबेलचे खासगी आयुष्य आणि व्यक्तिगत चारित्र्य यांची न्यायालयाला जवळजवळ शून्य माहिती आहे. परिणामत: उपलब्ध पुराव्याचा योग्य तो आदर राखायचा असेल तर एक हेर म्हणूनच एबेलचा विचार करणे उचित होईल. हेरगिरीचे क्षेत्र त्याने समजूनउमजून निवडले होते आणि पकडले गेल्यास होणाऱ्या परिणामांचीदेखील त्याला स्पष्ट कल्पना असली पाहिजे."

रशियाला युद्धविषयक गुपिते कळविण्याचे कारस्थान करणे या पहिल्या गुन्ह्याबद्दल तीस वर्षे कद आणि पाच हजार डॉलर्स दंड; ती गुपिते मिळविण्याचा बेकायदा कट करणे या दुसऱ्या गुन्ह्याबद्दल दहा वर्षे कैद आणि दोन हजार डॉलर्स दंड; आणि अमेरिकेत बेकायदेशीर प्रवेश करणे आणि बनावट नागरिकत्व धारण करणे या तिसऱ्या गुन्ह्याबद्दल पाच वर्षे कैद आणि एक हजार डॉलर्स दंड, अशी शिक्षा एबेलला फर्माविण्यात आली. साऱ्या शिक्षा एकदमच भोगावयाच्या असल्यामुळे एबेलला कमाल तीस वर्षे तुरुंगवास घडणार होता.

खटला एबेलपुरता संपला असला तरी डोनोवन स्वस्थ बसला नाही. वरीयस आणि वरिष्ठ न्यायालयांकडे दाद मागण्याच्या त्याच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. एबेलच्या अटकेच्या वेळी त्याच्या काही वस्तू अमेरिकन गुप्तहेरखात्याने बेकायदेशीररीत्या जप्त केल्या आणि खटल्यात पुराव्यादाखल वापरल्या, या अन्यायाची दाद डोनोवनने वरीयस न्यायालयात मागितली. परंतु तेथे एबेलची शिक्षा कायम करण्यात आली. पुढे डोनोवनने वरिष्ठ न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा दिला. डोनोवनने खटल्याच्या फेरसुनावणीसाठी केलेला अर्ज वरिष्ठ न्यायालयाने फेटाळून लावला. हा वेळपर्यंत एकोणिसशे साठ साल अर्धे सरले होते. ○

उत्तरार्ध पुढील अंकी

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

पुस्तके । पुस्तके

वि. शं. पारगावकर

# शब्दसुमनांतून फुललेला

## षड्ज–गांधार

महाराष्ट्रीय मनाला संगीताचे वेड आहे, असे म्हणतात. ती गोष्ट खरी आहे; परंतु मर्यादित अर्थाने खरी आहे. मला वाटते, मानवी मनालाच संगीताचे, सुरांचे, नादब्रह्माचे वेड आहे. मग ते शास्त्रीय-संगीत असो, लोक-संगीत असो, भाव-संगीत असो, नाटय-संगीत असो. या सर्वांचेच मानवी मनाला विलक्षण आकर्षण आहे. ज्या संगीतात शब्दांना दुय्यम महत्त्व असते, असे शास्त्रीय संगीत, ज्या संगीतात सुरांना आणि शब्दांना समान महत्त्व असते, असे भाव-संगीत. याचे उत्तम उदाहरण 'गीत रामायण' होय. ज्या संगीतात सूर, शब्द आणि चाल यांतून नाटयाचा आविष्कार होतो, असे लावणी–पोवाडा संगीत. या साऱ्या प्रकारांचा मानवी मनाला मोह आहे. ते मन अशा सुरांसाठी, सुरांत विरघळलेल्या शब्दांसाठी, आलाप-तानांसाठी आज अनेक वर्षे वेडे होऊन राहिले आहे.

हे वेड फार विलक्षण आहे. फार उच्च प्रतीचे आहे. भक्ताला परमेश्वराच्या रूपाचे जसे वेड, तसे या मनाला संगीताचे वेड. कृ. द. दीक्षित यांचे 'षड्ज-गांधार' वाचल्यानंतर या वेडाची जात कोणती आहे, त्याचा प्रभाव केवढा आहे आणि त्याची महती काय आहे, याची उत्तम प्रचिती येते. या पुस्तकात रंगलेल्या पंधरा मैफली रसिक वाचकाला धुंद करतात. ही धुंदी विलक्षण आहे. एखादी अत्यंत वरच्या दर्जाची कादंबरी वाचीत असता, रसिक वाचकाची जशी भावसमाधी लागते, त्या जातीची ही भावसमाधी नाही. दीक्षितांचे 'षड्ज-गांधार' हे कादंबरीच्या जातीच्या कलाप्रकारासारखे पुस्तक नसूनदेखील वाचकाला धुंद करते. का? यात कोणती कथा आहे? निवेदनाचे कोणते प्रभुत्व आहे? स्वभावविशेषाच्या परिपोषाची कोणती परिसीमा आहे? एखाद्या स्वभावचित्राचा–कथाविश्वासाचा कोणता सलग विकास आहे? हे तर साधे लेख आहेत. संगीत-वाद्य मैफलींचे वर्णन करणारे. त्या इतिहासाला उजाळा देणारे. वेगवेगळ्या परिमाणांची, वेगवेगळ्या क्षणांची, वेगवेगळ्या आलापांची, स्वरपुंजांची, तालांची आणि तानांची कैफियत सांगणाऱ्या वर्णनांचे हे लेख आहेत. परंतु त्यातही विलक्षण जादू आहे, विलक्षण मोहिनी आहे, विलक्षण आकर्षण आहे, आपल्या स्वरवेड्या अंतर्मनाचे या पुस्तकात स्वच्छ, निखळ प्रतिबिंब आहे.

'षड्ज-गांधार 'मध्ये दीक्षितांनी संगीत-शास्त्रविषयक रूक्ष चर्चा फारशी कोठे केलेली नाही. क्वचित प्रसंगी, सहज जाता जाता काही ठिकाणी समीक्षात्मक विचार प्रकट झालेले आहेत. परंतु दीक्षितांच्या लेखनाचा या ठिकाणी तो स्थायी-भाव नाही, इतकेच नव्हे तर, संगीत-शास्त्राच्या समीक्षेचा येथे आविर्भावही त्यांनी आणलेला नाही. या संपूर्ण ग्रंथात त्यांची जी भूमिका आहे, ती फक्त संगीतलुब्ध रसिकाची आहे. तीही सुजाण रसिकाची आहे आणि ही भूमिका सुजाण रसिकाची असल्यामुळे संगीत-शास्त्रविषयक अथवा त्या शास्त्राच्या समीक्षाविषयक त्यांचा स्वतःचा काही दृष्टिकोण येथे प्रतिबिंबित होणे, केवळ अपरिहार्यच आहे. शेवटी आस्वादक हादेखील एक समीक्षक असतोच, ही गोष्ट लक्षात घेतलीच पाहिजे. अशी व्यक्त झालेली त्यांची काही मते, काही मान्य होण्यासारखी असतील तर काही विवाद्य असतील; परंतु ती आक्षेपार्ह आहेत असे मुळीच म्हणता यावयाचे नाही.

कारण 'षड्ज-गांधार ' या त्यांच्या ग्रंथाचे स्वरूप आत्माविष्काराचे आहे; संगीत-समीक्षणाचे नाही किंवा सिद्धांत-चर्चेचे नाही. याचे एक उदाहरण देतो.

## मन्सुरांची कलाचातुरी

'गुरू थोरले खांसाहेब, मुर्जीखां, थोरल्या खांसाहेबांचे ज्येष्ठ पुत्र, नासिरुद्दिनखां आणि इतरही तज्ज्ञ मंडळी जलशाला बसली होती. श्री. मल्लिकार्जुन यांचे गायन होते. पुढे बसलेले एकाहून एक तपस्वी आणि जाणते श्रोते यांमुळे श्री. मल्लिकार्जुनही जबाबदारी ओळखून चीज कसून गायला बसले. त्यांनी कोमल ऋषभ असावरीतली चीज सुरू केली. 'अब हूँ ' ही चीज सुरू केली. गाणे जसजसे रंगू लागले तसतसे खांसाहेब अल्लादियाखां, भुर्जीखां आणि त्यांच्या कुटुंबातली इतर मंडळी यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. इतर श्रोतेही जरा चपापले. गंभीर झाले. या अश्रुधारा होत्या मंजीखांसाहेबांची 'याद ' होत होती म्हणून. श्री. मल्लिाकार्जुन इतके रंगले होते की त्यांच्या गळ्यातून पुरेपुरे मंजीखां अवतरले होते. साऱ्या जाणत्या श्रोत्यांना, स्वतः अल्लादियाखांसाहेबांना असा प्रत्यय यावा, ही श्री. मल्लि-कार्जुन यांची केवढी मोलाची कलाचातुरी ? ज्या वेळी शिष्य गुरूची अशी आठवण करून देतो, त्या वेळेलाच त्या गुरूच्या आशीर्वादाचे साफल्य दिसते. '

मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या मैफलीतील हा प्रसंग. मल्लिकार्जुन हे मंजीखां यांचे शिष्य. आणि मंजीखां ही संगीत-विश्वातली साधीसुधी असामी नव्हे. त्यातही प्रत्यक्ष मैफलीच्या वेळी समोर थोरले खांसाहेब बसलेले. ही कसरत, शिष्याचे हे धाष्टर्य आणि धैर्यही ! मल्लिकार्जुन यांनी बैठक तर रंगविलीच. दाद घेतली परंतु त्याहीपेक्षा अत्यंत मोठी गोष्ट म्हणजे रसिकांची आणि उस्तादाच्या उस्तादांची मने हलविली. संगीत मैफलीचे हे विलक्षण शब्दचित्र श्री. दीक्षित यांनी अत्यंत समर्थपणे रसिक वाचकांच्या मनापुढे उभे केले आहे.

तसेच, यल्लीबाईंच्या गाण्याच्या वेळचा प्रसंग सांगताना दीक्षित लिहितात,

"बाई 'ना मारो पिचकारी' ही प्रसिद्ध ठुमरी म्हणत होत्या. ठुमरीचे आलापी आवर्तन संपून दुगणीला आल्याबरोबर बाईंनी रम्य असा भाव केला आणि माझ्याकडे पाहून एक झकास मुरका मारला, तेव्हा मी लाजलाजून खाली बघून तोंड झाकून घेतले आणि त्या बाई जे दिलखुलास हसल्या ते आज–अजूनही मला आठवते आहे. आदा करताना दाद द्यायला अस्सल तमाखू खाऊन जिवणीच्या टोकाला ओघळ येईल न येईल इतका बेताचा आणि चित्रकाराने कुंचल्याने रेखावा असा लालचुटूक रंग असला पाहिजे, डोळयांत सुरमा हवा, कानात मंद सुवासिक अत्तराचा फाया हवा, डाव्या हातात गजरा हवा, नुसती समेला मान तुकविणे वेगळे आणि आदा करणाऱ्या कलावंतिणीला–कलावंताला–साद देणे वेगळे. 'ना मारो पिचकारी' असे म्हणून कलावंतीण जर राधा झाली तर आपण 'सास ननंद' सुद्धा न मानणारा श्रीकृष्ण व्हायला हवे. नुसता सुराचा नव्हे, नुसत्या शब्दांचा नव्हे, नुसत्या लयीचा नव्हे, नुसत्या रूपाचा नव्हे,–तर या साऱ्यांचा समन्वय साधणाऱ्या कलावंताच्या आविष्काराचा रसिक हा एकमेव प्रतिसाद झाला पाहिजे."

दीक्षितांची ही शब्दरचना पाहा. संगीताच्या आविष्काराबरोबरच मैफलीच्या कर्तव्याची-उत्स्फूर्त नुसती जाणीवच ते जागी करून जात नाहीत तर अशी जाणीव जागृत झाल्यानंतरच्या आविष्काराचे रम्य चित्र ते वाचकांच्या डोळचांपुढे सहजपणे उभे करतात. वरील चित्र शृंगाराचे, एका विशिष्ट प्रीतीच्या आविष्काराचे, सुरांतून व्यक्त होणाऱ्या, रूप घेणाऱ्या विश्वाचे. हे चित्र उभे करणे ही सोपी गोष्ट नाही. एखाद्या कलावंताने मूर्ती घडवावी, रंगसंगतीतून जिवंत चित्र उभे करावे किंवा कादंबरीकाराने आपल्या कलाकृतीमधून एक नवे विश्व उभे करावे असे हे कलावंताचे सामर्थ्य दीक्षित यांच्या लेखणीत आहे. 'षड्ज-गांधार' मधून ते ठायी ठायी प्रत्ययाला येते. संगीताची एक दुनियाच ते वाचकांपुढे उभी करतात. म्हणूनच मी वर म्हटले आहे की दीक्षितांची 'षड्ज-गांधार' मधील भूमिका संगीत समीक्षकाची नाही तर संगीतावर लुब्ध झालेल्या रसिकाची आहे. अतिशय खोल जाण असणाऱ्या रसिकाची आहे. अर्थात कुठलीही एखादी अगम्य गोष्ट वाचकापुढे शब्दरूपाने तंतोतंत उभी करायची असते तेव्हा लेखकाची साहजिकच फार दमछाट होत असते. शब्दरूप देण्याची अंतर्यामी पेटलेली जिद्द ( एक प्रकारची आग), मनातील शब्दहीन कैवल्याला शब्दरूप देण्याची जिद्द चालू असते तेव्हा शब्दसंपत्तीने हे रूप साकार होत असताना उपमांचा आधार घेतल्यावाचून गत्यंतर नसते. अपरिचित अव्यक्ताला व्यक्त करण्यासाठी परिचित उपमांच्या साह्याने हे रूप नितळ करण्याचा प्रयत्न कलावंत करीत असतो. 'षड्ज-गांधार' मध्ये दीक्षित अशा उपमांचा आधार घेताना दिसतात. परंतु त्यांच्या उपमा कार्यसिद्धी करीत नाहीत तर कित्येक वेळा रसहानी करतात असे मला वाटते. मी येथे त्यांच्या सर्व उपमांचा प्रपंच करीत बसत नाही. फक्त या पाठीमागची माझी भावना लक्षात

यावी म्हणून एकच उदाहरण देतो. एके ठिकाणी ते प्रेक्षकांना बुटुकुल्यात शिजून वर फुगून आलेल्या भाताची उपमा देतात. ही उपमा रसहानी करते.

## गालबोट !

असाच दुसराही एक दोष, जो या उत्तम ग्रंथाला हमखास गालबोट लावणारा आहे तो म्हणजे, दीक्षित जेव्हा एखाद्या मैफलीचे शब्दचित्र साकार करायला लागतात तेव्हा त्या वर्णनात आजच्या कै. व्यक्ती तेव्हाही ते त्यांना कै. म्हणून संबोधितात. एखाद्या संगीत मैफलीची रंगत वाचकासमोर उभी करीत असता वर्तमानकाळ आणि भूतकाळ यांची विचित्र रसमिसळ त्यांच्या हातून होते. त्यामुळे ज्या एका अननुभूत भावतंद्रीत ते वाचकाला घेऊन गेलेले असतात त्या तंद्रीला अशा वर्णनाने (उल्लेखाने) तडे जातात. एखादा चित्रपट पाहत असताना एकदम फिल्म तुटावी आणि थिएटरमधले दिवे लागून वर्तमानकाळ डोळ्यांपुढे यावा; किंवा दिवे तसेच लागलेले असतानाच फिल्म सुरू व्हावी आणि चित्रपटाची आणि वर्तमानकाळाची विचित्र रसमिसळ व्हावी तशी येथे होते. उदाहरणार्थ ( पृष्ठ ४१ वर) ' एका बाजूला कै. गंगाधरपंत लोंढे व दुसऱ्या बाजूला क. शांता आपटे अशा दोन कलावंतांच्यामध्ये मी बसलो होतो......' ही वाक्यरचना किती विचित्र वाटते ! मफलीतल्या भूतकाळाला वर्तमानकाळातील ( म्हणजे आजच्यादेखील भूतकाळातील ) कटू आठवणींचे ठिगळ जोडले जाते.]

तसाच ' षड्ज-गांधार 'मध्ये आणखी एक दोष असा आहे की, ज्या मैफलींचा ताजमहाल श्री. दीक्षित रसिक वाचकाच्यापुढे उभा करतात, त्याला ते नेमक्या काळवेळात बंदिस्त करीत नाहीत. या साऱ्या लेखांचे स्वरूप कलात्मक असले तरी त्याला ऐतिहासिक महत्त्वदेखील फार आहे. त्याचे स्वरूप एखाद्या त्रिमिती चित्रासारखे आहे. त्यामध्ये नेमक्या काळाचा पैलू स्पष्ट झाल्याशिवाय या त्रिमिती चित्राला संपूर्णपणा येत नाही. त्यांचे कित्येक लेख केवळ या कमतरतेमुळे अस्पष्ट व पुसट वाटतात.

परंतु हे वरील दोष त्यांच्या मूळच्या आविष्काराचा एकच एक अतूट भाग झालेले नाहीत. या उणिवा सहजच दूर करता येण्यासारख्या आहेत. दुसऱ्या आवृत्तीत त्या दूर होतील.

हे सारे सांगून झाल्यावरही ' षड्ज-गांधार 'विषयी पुन्हा पुन्हा जाणवत राहते ते हेच की, श्री. दीक्षित यांचा या क्षेत्रातील अधिकार फार मोठा असूनही दीक्षित नावाच्या या जाणकार रसिकात असलेला कलावंतही तितकाच मोठा आहे.

O

**[ षड्ज-गांधार : कृ. द. दीक्षित : मौज प्रकाशन, : पृष्ठे २३२, किंमत : वीस रुपये ]**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ रडविणारे विदूषक

अमेरिकेतील एका सर्कसवाल्याने वर्तमानपत्रवाल्यांना अशी ताकीद दिली आहे की, त्यांनी अमेरिकेतील राजकारणाला सर्कस म्हणणे सोडून द्यावे, कारण त्यामुळे सर्कशीची बदनामी होते. – " आणि सरकार–दरबारी सगळे विदूषक भरले आहेत असे म्हणणाऱ्यांना तर अमेरिकेच्या विदूषक–संघटनेने चांगले खरमरीत पत्र लिहिले पाहिजे. " अगदी बरोबर ! नेहमी हीच समज हिंदुस्थानात पुष्कळ पत्रकार मंडळींना द्यायला हवी. आपल्याकडे कुठल्याही राजकीय पक्षाचे अधिवेशन म्हणजे एक तमाशा असतो, अशी बेजबाबदार टीका करणाऱ्या वर्तमानपत्रांवर तमाशा करणाऱ्या मंडळींनी अब्रू-नुकसानीचा दावाच करायला हवा. अन् आपल्या मंत्रिमंडळात विदूषक भरले आहेत, असे म्हणणे तर खरोखरीच कोठल्याही विदूषकाला अन्यायाचे ठरेल. कारण, विदूषकाच्या लीला पाहताना हसायचे सांगावे लागत नाही, पण मंत्र्यांच्या लीला पाहताना अनेकदा हसावे की रडावे असा प्रश्न पडतो.

शिवाय, दरवर्षी नियमाने होणारे राजकीय पक्षांचे अधिवेशन 'ऐतिहासिक' कसे ठरते व दर सहा महिन्यांनी एखादा नवीन 'क्रांतिकारक' कवी कसा पुढे येतो, हे दररोज सकाळी इतिहास घडविणाऱ्या अन् संध्याकाळी क्रांती घडविणाऱ्या महाभागांनाच सांगता येईल, ते इतिहास–निर्मात्या शिवाजी किंवा क्रांतिकारक सावरकरांसारख्या येऱ्या गबाळ्याचे काम नोहे. सांगायचे तात्पर्य काय, पत्रकारांनी हे असले अतिरंजित लिहिणे सोडून द्यावे. विशेषतः हिंदुस्थानातील कंगाल जनता कुत्र्याचे जिणे जगत आहे, अशी अपमानास्पद भाषा तर मुळीच वापरू नये. त्यात कुत्र्यांचा अपमान आहे.

## □ व्हिस्कीत बुचकळलेली दारूबंदी

सरकारला वठणीवर आणण्याच्या अनेक मार्गांचे हल्ली हिंदुस्थानात राजकीय संशोधन चालू आहे. निदर्शनापासून प्रदर्शनापर्यंत अन् " धरना "पासून " घेराव " पर्यंत अनेक उपायांची प्रात्यक्षिके करून पाहण्यात येत आहेत. पण फ्रान्समधील एका गावातल्या शेतकऱ्यांनी निषेधाच्या कल्पकतेत भारतीय विद्यार्थ्यांवरही ताण केली आहे. त्यांनी सरकारला अशी धमकी दिली आहे की, आमच्या तक्रारीं–

कडे लक्ष दिले नाहीत तर आम्ही रस्त्यावर मण-मण मध ओतू अन् आमच्या मध-माशांना मोकाट सोडू! एखाद्या समस्येचे एकीकडे इतके गोड अन् दुसरीकडे तितकेच बोचक उत्तर शोधून काढणे खरोखरीच कठीण आहे. हिंदुस्थानातही अशी कल्पकता वापरायला बराच वाव आहे, असे मला वाटते. उदाहरणार्थ, दुधाचे भाव वाढवू दिले नाहीत तर राजा गोपीचंदाप्रमाणे प्रत्येक मंत्र्याला दुधाने आंघोळ घालण्यात येईल, अशी दूधवाल्यांनी धमकी द्यावी. दिल्लीच्या न्हाव्यांची लायसेंस–फी वाढविण्यात आली आहे, ती पुन्हा कमी झाली नाही तर प्रत्येक माणसाला बीटल् करून टाकू, अशी त्यांनी भीती दाखवावी. अन् संपूर्ण दारूबंदी घातली तर प्रत्येक मंत्र्याला त्याच्या हुद्याप्रमाणे (–आणि आवडीप्रमाणे) बियरपासून व्हिस्की-पर्यंतच्या पिंपात बुचकळून काढण्यात येईल, असा परमिटवाल्यांनी कडक इशारा द्यावा.

## □ राणीला हुकूम !

इंग्लंडच्या राणीच्या घरी नुकताच एक पोस्टमन पत्र टाकायला गेला, तेव्हा त्याला म्हणे राणीचा कुत्रा चावला. झाले, इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये लगेच मागणी करण्यात आली–आपल्या राजवाड्याच्या बाहेर "कुत्र्यापासून सावध राहा" अशी पाटी लावायचा राणीला 'हुकूम' करण्यात यावा. म्हणजे आता आहे की राजनिष्ठ साहेबाची कमाल? "किंग कॅन डू नो राँग" अशी श्रद्धा बाळगणारा साहेब "क्वीन कॅन डू नो राँग" असे कबूल करायला तयार दिसत नाही. अन् समर्थाघरचे श्वान असमर्थाला चावले तरी चालते, हा भारतीय शिष्टाचाराचा नियम इंग्लंडात दिसत नाही. ते काही असले तरी लंडनमध्ये जगातल्या पहिल्या पार्लमेंटात जर राणीच्या कुत्र्यावर चर्चा होऊ शकते, तर दिल्लीत जगातल्या शेवटच्या पार्लमेंटमध्ये मंत्र्याच्या मनीवर खडाजंगी व्हायला काहीच हरकत नाही.

## □ दातखीळ बसलेला माओ-विचार

चिनी पाणबुड्यांतल्या खलाशांना इंजिनच्या प्रचंड घरघराटात माओच्या विचारांचे अध्ययन करण्यास त्रास होतो, म्हणून त्यांनी खुणांच्या द्वारे माओ-विचार प्रकट करण्यास आरंभ केला आहे, अशी बातमी आहे. आश्चर्य आहे! यःकश्चित् पाणबुडीच्या यंत्रापुढे माओ-विचाराची वाचा बसली? छे छे! माओ-विचाराने मोटारी चालतात, तर पाणबुड्या चालल्याच पाहिजेत. या पाणबुड्यांत अमेरिकन इंजिने बसविण्याचे कृष्णकृत्य एखाद्या नतद्रष्ट लिऊ-शाओ-चीवाद्याने तर केले नसेल ना? तसे असेल तर प्रत्येक पाणबुडीतल्या प्रत्येक इंजिनला चिनी पद्धतीनुसार जाहीर आत्मनिंदा करायला लावली पाहिजे. इतके करूनही ती गप्प बसायला शिकली नाहीत, तर असल्या माओ-विरोधी पाणबुड्यांना दयामाया न दाखविता पाण्यात बुडविणे, हा एकच तरणोपाय आहे. O

# भुक्कड.........साथी

बक्कळ नाव झालेले कलावंत, याच गटातला संगीत दिग्दर्शक आणि अनेक वेळा अनेकांच्या हृदयाला स्पर्श करूनही सदा सतेज राहणारी पटकथा. एवढ्या बेगमीवर आर्थिकदृष्ट्या यशस्वी ठरणारे चित्रपट काढण्यात मद्रासी निर्माते तरबेज खरे. एखाद्या वेळी हे गणित फसते. पण असे अपयश हा नियमाचा अपवाद समजून मंडळी सेवाभावाने भय्या, भाभी, देवर, बहू यांसारख्या विषयांभोवतीचा पिंगा तसाच चालू ठेवतात.

'साथी' हे व्हीनस प्रॉडक्शन्सचे ताजे चित्र. आता चित्रपटाचे कथानक पाहा हं. एका धनाढ्य करोडपतीला मुलगा नसतो. पण मुलगी असते. तीही एकुलती एक. वाया जाणाऱ्या उदंड लक्ष्मीला थोडेफार तरी सत्कारणी लावावे म्हणून हा करोडपती दोन अश्राप मुलांचा सांभाळ करतो. दोघेही हुशार निघतात. उच्च शिक्षण घेऊन परदेशांतून परतलेल्या 'रवी'वर त्याचा सांभाळ करणाऱ्या लखपतीची कन्या प्रेम करू लागते. पण बिलंदर 'रवी' तिच्याकडे दुर्लक्ष करून आणि स्वतःचे घर सोडून दूरवरच्या एका हॉस्पिटलमध्ये रुजू होतो. असे चालत आलेले भाग्य कोणतेही तर्कशुद्ध कारण नसताना तो लाथाडून का जातो, हे एक परमेश्वर आणि दुसरे 'साथी'चा लेखक– दिग्दर्शकच जाणे! त्याचीच वाट पाहत 'नर्स'चे काम करणाऱ्या वैजयन्तिमालेशी–चुकलो–शान्ती या तरुण, सुंदर, गरीब आणि अविवाहित मुलीशी-गाठ पडते. 'रवी'चे आगमन झाल्याने आतापर्यन्त तिचा सांभाळ करणाऱ्या आईची गरज संपते. त्यामुळे तिला कॅन्सर होतो. आणि रवीच्या हातून कॅन्सरचे ऑपरेशन चालू असतानाच ती

मरते. शान्तीशी लग्न ही पुढील वाटचाल. पण त्यात अडथळा आणते ती ज्या शेटजींनी रवीला वाढवलेले असते त्यांची मुलगी सिमी. पण शेटजी उदार मनाने रवीला लग्नाला परवानगी देतात. लग्न होते आणि हनीमून स्पेशल काश्मीर दौरा आणि दोन अस्सल फिल्मी गीते होऊनही रवी-शान्तीची जोडी ठिकाणी येत नाही. मग हॉस्पिटलचे मोठे डॉक्टर शान्तीला रवीच्या कर्तव्याची जाणीव करून देतात आणि दोन मिनिटांच्या उपदेशाने शान्तीचे मत परिवर्तन होते. कॅन्सरवरील इलाज शोधण्यासाठी ती आपल्या पतीला पुन्हा उद्युक्त करते इतकेच नव्हे तर स्वत: त्याला साहाय्य करते. कामाच्या अति-रेकीपणामुळे शान्ती गंभीर स्वरूपाच्या आजाराने बेजार होते. पतीच्या संशोधनात व्यत्यय येऊ नये म्हणून आपला आजार ती नवऱ्यापासून लपवून ठेवते. संशोधनाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्याबद्दल (म्हणजे नक्की काय?) रवीचा गौरव होतो. आपल्या आजारामुळे आपल्या पतीचा पाय मागे ओढला जातो आहे हे लक्षात आल्याने शांती घर सोडते आणि पुढे रेल्वे अपघातात तिचे निधन झाल्याचे रवीला समजते. परंतु मृतदेह मात्र मिळत नाही. (कसा मिळणार! मृत इसमाच्या पुन-रागमनाची ही युक्ती वापरून वापरून अगदी साफ झिजून गेली आहे.) या अपघातात शान्तीची फिलिप्स या पेशन्टबरोबर गाठ पडते. तिला मुलीसमान मानणारा हा साहेब तिला थेट स्वित्झर्लंडमध्ये झुरीच येथे घेऊन जातो आणि ठणठणठणीत बरी करतो. (मध्यंतरीच्या काळात रवीला अन्य उद्योग करण्यास पूर्ण संधी मिळावी म्हणून रवीशी पत्रद्वारे संपर्क ठेवण्याचे ती कटाक्षाने टाळते.)

शान्ती नाहीशी झाल्याबरोबर रवीला शेटजी आजारी असल्याची तार येते. तेथे गेल्यावर त्याला कळते की, शेटजींच्या कन्येने अजून लग्न न केल्याने शेटजी आजारी आहेत. शान्ती गेलेली असते. आणि शेटजींचे उपकार उरावर असतात. त्यात सिमी जोर करते. आणि संपूर्णपणे स्वत:च्या मनाविरुद्ध रवीबाबू पुन्हा बोहल्यावर चढ-तात. विवाहित स्त्री-पुरुषांचे संबंध न राहिल्याने दोघांत भांडणे होतात. आणि अशाच एका प्रसंगी लॅबोरॅटरीत काम करीत असताना रवीचे डोळे जातात. नर्सची गरज उत्पन्न होते. आणि विदेशात गेलेली शान्ती योगायोगाने नेमकी शेटजींच्या घरी येते. रवी–शान्तीच्या लग्नाला शेटजी व त्यांच्या घरातील कोणीही गेलेले नसते. लग्नानंतर रवी एकदाही आपली पत्नी दाखवायला वडिलांसमान असलेल्या शेटजींकडे येत नाही अथवा तिचा एखादा फोटोही पाठवत नाही. त्यामुळेच आलेल्या नर्सला कोणी ओळखत नाही. शान्ती पतीला ओळखते आणि शारदा हे

नाव घेऊन घरात वावरते. चित्रपट पूर्ण करण्यासाठी आता दोनच घटनांची आवश्यकता असते–अपघाताने आंधळया झालेल्या नायकाला डोळस करणे, शान्तीचे व रवीचे पुन्हा मीलन घडवणे. हिन्दी चित्रपटाला शोभतील अशी घटनांची वेटोळी फिरवत कथा इच्छीत स्थळी पोचते आणि १८ रिळांचे भले मोठ्ठे पिक्चर पाहिल्याच्या समाधानात प्रेक्षक बाहेर पडतो.

असे हे भुक्कड कथानक दिग्दर्शक श्रीधर यांनी तितक्याच भुक्कड पद्धतीने सांगितले आहे.

पिक्चर थोडेफार सुसह्य होते. ते वैजयंतीमालेच्या सहज सुंदर अभिनयामुळे. बाईचा देहही अजून मर्यादशील आहे. आणि त्यांच्या रूपा-गुणांची लज्जत वाढेल अशी दक्षता कॅमेऱ्याने घेतली आहे. त्यामुळे चित्रपटावर त्यांचाच प्रभाव आहे. राजेंद्रकुमार झुकू लागल्याचे या चित्रपटात जाणवते. चेहऱ्यावरील भावदर्शन घडवण्याची जेव्हा गरज, नेमके त्याच वेळी दोन्ही हातांनी चेहरा लपवण्याची त्याची हातोटी, त्याला स्वतःच्या अभिनय ताकदीची जाणीव असल्याची कल्पना देते. शेटजींच्या छोटया भूमिकेसाठी पहाडी संन्याल या मोठया ताकदीच्या नटाला उगाचच राबवले आहे. डेव्हीड, प्रतिमादेवी, संजय यांच्या वाटयाला आलेल्या भूमिका त्यांनी नेहमीच्या पद्धतीने साकारल्या आहेत.

नौशादमियांचे संगीत चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाला चुकून-माकून आर्थिक यश लाभलेच, तर मिया नौशाद यांचा वाटा त्यात मोठा आहे. त्यांनी बांधलेली गाणी श्रवणीय आहेत. ये कौन आया, आयना हूँ मैं तेरा, आणि जो चला गया, या तीन गीतांचा उल्लेख केला पाहिजे.

चित्रपटाची तांत्रिक अंगे ठाकठीक आहेत. रेल्वे अपघाताचा अनेक वेळा वापरलेला ' स्टॉक–शॉट ' न वापरता नवीन दृश्य चित्रीत केले असते तर ते एकंदर तांत्रिक दर्जाला शोभून दिसले असते.

कुटुंब-नियोजनाचे चिन्ह असलेल्या उलटया त्रिकोणाला पुन्हा एक पलटी मारली की बहुसंख्य हिन्दी चित्रपटांच्या कथांचे मार्गदर्शक चिन्ह निश्चितच तयार होईल, असे हा चित्रपट पाहिल्यावर वाटते. ○

## शुभं करोति

पृष्ठ १४ वरून

मन आत-आत उसळून नाचले, नकार नाही ! मग आतूनच कळले की नकाराचा संभव आहेच. आपल्या पेशातल्या मुलीशी अशा मुलाने लग्न करणे हा चमत्कारच ठरेल. त्यात त्याच्या घरचा प्रश्नही होता. त्याच्या आईवडिलांना ते पटले पाहिजे होते; आणि ते तर तर्काने अगदी अशक्य होते. हे जाणवले आणि पुन्हा आपण भुईवर आलो.

ठरल्या तारखेला त्याने, अगदी सहजपणे, त्याच त्या प्रसन्न मुखाने, ऋजू स्वरांत होकार दिला. (क्रमशः)

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. १४ ते २० डिसेंबरचे राशी-भविष्य

**मेष :** आजवर साडेसाडीतही आपण आवाज उठवलात. आता तर सूर्य-बुध भाग्यस्थानी येत आहेत. शनीला चांगलाच शह बसेल.

या आठवड्यात आपले आणखी एक पाऊल पुढे पडेल, प्रगतीच्या नव्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. तुमचा ध्येयवाद, तुमचा निर्धार घवघवीत यश घेऊन उठेल.

नवे व्यावसायिक क्षेत्र हस्तगत होईल. यांत्रिक–विद्युत क्षेत्रात नवा इतिहास निर्माण करू शकाल.

नोकरीत बदली–बढतीचे योग दिसू लागतील, कौटुंबिक मंगल कार्याचे निश्चित ठरेल, सभासंमेलनात हिरीरीने भाग घ्याल.

दि. १८।१९।२० या कालावर लक्ष केंद्रित करा.

**वृषभ :** शुक्र भाग्यात तर गुरु पंचमात–एक सर्वोत्तम योग तुमच्या वाट्यास येत आहे. एवढा हा एक ग्रहयोगही तुमचा भविष्यकाल उज्ज्वल असल्याची ग्वाही देऊ शकेल.

आपल्या अंगीकृत व्यवसायधंद्याचे स्वरूप अधिकच आकर्षक बनेल, सामाजिक-राजकीय क्षेत्रांत सतत आघाडीवर राहण्याची संधी लाभेल.

स्थावराचा प्रश्न सुटेल, वाहनाची विवंचना मिटेल, प्रगतीचा मार्ग आता कोणा-कडूनही रोखला जाण्याची शक्यता नाही.

या आठवड्याच्या मध्यानंतर सतत धावपळ, धडपड करावी लागेल–आणि त्या आपल्या प्रयत्नांत यशही चांगले लाभेल. दि. १५।१६।१८।१९ या कालात आपले प्रयत्न यशस्वी ठरावेत.

**मिथुन :** चौथ्या मंगळाचा खडतर काल संपुष्टात येत आहे, आल्यासारखाच आहे. सूर्य-बुधाचीही सहानुभूती लाभण्याची शक्यता दिसू लागलेली आहे.

हा आठवडा अनेक बाबतींत उत्साहाचा आशादायक दिसू लागेल. सांपत्तिक अड-चणी या आठवड्यापासून निश्चितच कमी कमी होऊ लागतील.

प्रगतीच्या हुकलेल्या संधी पुन्हा डोळ्यांसमोर दिसू लागतील. अनेकांचे सहकार्य घेऊन नवा धंदा उभारण्याचे तुमचे स्वप्न याच आठवड्यात आकार घेऊ लागेल.

मंगल कार्यासाठी प्रवास घडेल, राजकीय क्षेत्रात अधिकार लाभेल. कोर्टकचेरीच्या भानगडी मिटतील. दि. १६।१८।१९ या काली अनेक कामे हातावेगळी केली जातील.

**कर्क :** चौथ्या मंगळाची कारकीर्द सुरू झाली– जंग शुरू हुवा है। अनेक अड-चणीवर मात करणे आता, पूर्वीइतके सोपे नाही. गुरू अनुकूल आहे म्हणून प्रतिष्ठा धोक्यात येणार नाही इतकेच. साध्यासुध्या गोष्टीसाठी निर्धाराने झगडावे लागेल.

सांपत्तिक ताण कमालीचा वाटू लागेल, स्थावराच्या नव्या विवंचना जाणवू लागतील, अनारोग्याची डोकेदुखी मधून मधून सहन करणे भाग पडेल. तरीसुद्धा वेळ निभावून जाईल.

आगामी १५।२० दिवसांत नव्या जबाबदाऱ्या वाढवून घेऊ नका. दूरच्या प्रवा-साचे ठरवू नका. फार मोठ्या कार्याला हात घालू नका. सामाजिक–सार्वजनिक क्षेत्रापासून चार हात दूरच राहा. दि. १७ ते १९ थोड्याफार अनुकूल घटना घडू लागतील.

**सिंह :** मंगळ पराक्रमात येत आहे. आणि सूर्य–बुध अधिकाधिक अनुकूल बनू लागणार आहेत.

या वेळी तुम्ही काहीही केलेत तर अपयशाची धास्ती बाळगण्याचे मुळीच कारण नाही.

आजवरचे तुमचे सारे प्रयत्न या आठवड्यापासूनच आकार घेऊ लागतील. मंगल कार्याचा प्रश्न सुटेल, व्यावसायिक वातावरण अधिक आशादायक वाटू लागल.

नोकरीत बदली-बढतीची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

तुमच्या सामाजिक प्रतिमेची उंची वाढवणाऱ्या अनेक घटना या आठवड्या-पासून घडू लागतील. हा सर्वच आठवडा घाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल.

दि. १८ ते २० अपेक्षा सफल करणारा काल.

**कन्या :** मंगळाचे तुमच्या राशीतून उच्चाटन झाले. आता तुमच्या राशीतील गुरूला तुमच्याकरता काही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल. शनी–राहूंचा तीव्र विरोध असूनही या कालापासून आपल्या प्रयत्नाला यश येण्याची आशा वाटू लागेल. अनारोग्य नाहीसे होईल, भागीदारीतील संघर्ष मिटण्याची लक्षणे दिसू लागतील.

आपले व्यवसाय-धंद्याचे घसरलेले गाडे अनेकांच्या मदतीने मार्गावर आणण्यात यशस्वी व्हाल.

नवे घर लाभेल, वाहनाची विवंचना मिटेल, प्रगतीची आशा स्पष्टपणे दिसू लागेल. तरीसुद्धा शनी वक्री असेपर्यंत काही काल जपूनच वागायला हवे. दि. १७, १९ व २० थोडेफार आशादायक दिवस.

तूळ : आजवर मंगळ व्ययस्थानी होता आता तो तुमच्या राशीतच येणार आहे. या दोन्हीही अवस्था सारख्याच तापदायक. प्रतिष्ठेवर परिणाम होणार नाही पण पैसा–प्रकृतीवर त्याचे सारखे हल्ले व्हायला लागतील. अशा वेळी माघार घेण्यावाचून, जपून वागण्यावाचून गत्यंतरच नाही.

उद्योगधंद्याचे नेहमीचे तंत्र पालटावे लागेल, थोरामोठ्यांच्या मुलाखतीच्या वेळी अधिकाधिक नम्रता स्वीकारावी लागेल.

मन काही ना काही कारणामुळे त्रस्त व उदास बनेल. बारीकसारीक कारणावरून संघर्ष वाढू लागतील. वाढत्या खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केलात तर भविष्यकाळात पेचप्रसंग निर्माण होणार नाहीत.

दि. १४।१५।१९ अनेकांचे सहकार्य लाभावे.

वृश्चिक : सध्या आपले ठीक चालले असावे. मंगळ बारावा येणार म्हणून काही आपले फारसे बिघडणार नाही. अवास्तव खर्चाला थोडा आळा घातलात आणि प्रत्येक गोष्ट आत्मविश्वासाने केलीत तर अपयशाची धास्ती बाळगण्याचे कारण नाही.

गुरू एकादशात असेपर्यंत तुमची प्रगती रोखण्याचे धाडस कोणी करू शकणार नाही. साहित्य–कला क्षेत्रांत आवाज उठवाल, औद्योगिक क्षेत्रातील अडून राहिलेली सारी कामे भराभर हातावेगळी कराल.

सांपत्तिक लाभ चांगले होतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. सामाजिक क्षेत्रांतील प्रतिष्ठेचे स्थान लाभेल.

दि. १४।१५।१९।२० आपेक्षासाफल्याचे दिवस.

धनू : तुमचा अनिष्ट काल झपाट्याने ओसरू लागल्याची लक्षणे या आठवड्यापासूनच दिसायला लागतील.

शनी लवकरच मार्गी होणार आहे आणि मंगळासारखा समर्थ ग्रह एकादशांत आलेला आहे.

आता प्रयत्नांची शिकस्त केलीत तर अपेक्षित यश पदरी पाडून घेता येईल. कौटुंबिक अनारोग्य, व्यावसायिक अपयश आणि सामाजिक अप्रतिष्ठा या साऱ्या गोष्टी आता इतिहासजमा व्हाव्यात.

नोकरीतील प्रगतीची हुकलेली संधी पुन्हा दार ठोठावू लागेल आणि आपण तत्परता दाखवलीत तर निश्चितपणे प्रगतीचे स्थान आपणांस मिळू शकेल.

दि. १५ ते १७ या काली अनेक आशा अंकुरायला लागतील.

**मकर :** व्यवसायधंद्यात, नोकरी-चाकरीत सर्वत्र आघाडीवर दिसणारी माणसे फक्त मकर राशीचीच असावीत असे म्हणणे फारसे अतिशयोक्तीचे ठरू नये. भाग्यातील गुरूचे आणि पहिल्या शुक्राचे सामर्थ्यच असे अनन्यसाधारण असते.

शनीही आता मार्गी होण्याच्या विचारात आहे. आपण या वेळी साहित्य, शिक्षण, अर्थशास्त्र, राजकारण—कोणत्याही क्षेत्रात पाऊल टाकले, तरी तुमचे अनन्यसाधारणत्व निरपवादपणे सिद्ध होऊ शकेल. आजवर सुटलेला नसेल तर मंगल कार्याचा तुमचा प्रश्न चुटकीसारखा सुटेल.

व्यावसायिक प्रगतिकडे वेगाने वाटचाल करू लागाल.

दि. १७ ते १९ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** आठव्या मंगळाची डोकेदुखी एकदाची थांबली. आता आपणास निःशंकपणे प्रगतीकडे वाटचाल करता येईल. या आठवड्यात आपल्या अनेक व्यावसायिक व सांसारिक योजना आकार घेऊ लागतील. आरोग्य, स्वास्थ्य, पैसा—सारे काही सुधारू लागेल. वक्री शनीची जी काही थोडीफार कटकट आहे ती एकदा मिटली की, तुमचा प्रगत मार्ग कोणीही रोखू शकणार नाही.

कला, विज्ञान, संशोधन या क्षेत्रांत काही संशोधनात्मक कार्य करण्याकडे कल वळेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. प्रगतीचा मार्ग निष्कंटक बनेल.

दि. १८ ते २० या काळाची नोंद करा.

**मीन :** मंगळाच्या राश्यंतराला तुमच्या कार्यक्षेत्रावर, आरोग्यावर फारसा चांगला परिणाम घडेल असे दिसत नाही.

शुक्र एकादशात, गुरू सप्तमात यांच्या अनुकूलतेमुळे एवढेच घडेल की, सांपत्तिक ताण थोडाफार कमी जाणवेल आणि स्थगित कामांत थोडीफार चालना मिळू लागेल.

जवळपासचा प्रवास सतत घडेल, नवी कामे हाती घेतली जातील, कलाक्षेत्रात थोडेफार यश पदरी पडेल. दि. २१ला शनी मार्गी झाला की, साडेसातीची अनिष्टता बरीचशी ओसरू लागेल.

दि. १७ ते १९ हे दिवस खूपच घाईगर्दीचे जाणवतील.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग
माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९